CMYK

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही


dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर | रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक ८० | पाने १२+८ | किंमत रु. ६/-

**आज महाशिवरात्री**



## विचारपुष्प



आपले राष्ट्र आणि आपले भारतीयत्व हे या कुरुक्षेत्रातून उदयास आलेल्या आपल्यातील ईश्वरतत्त्व जागृत करण्याचा प्रयत्न आहे. हे ईश्वरतत्त्व आहे- 'एकोऽहम् बहुस्यामि' एकातून अनेकत्व हे भारतीय राष्ट्र, धर्म, कला आणि अध्यात्माचे सार आहे. हीच दृष्टी कालिदासाच्या मेघदूताला भारतीय जीवनाच्या निरीक्षणाची सूक्ष्म दृष्टी प्रदान करते. ही जीवनदृष्टी आपल्या कलेच्या केंद्रस्थानी आहे.

**अमीरचंद**
संस्कार भारतीचे पूर्व अ. भा. महामंत्री


# टिपूला शिवरायांच्या समकक्ष मानायला हवे

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांची मुक्ताफळे

**बुलढाणा, १४ फेब्रुवारी**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि म्हैसुरचा शासक टिपू सुलतान यांना समकक्ष संबोधून नव्या वादाला तोंड फोडले आहे. ''टिपू सुलतान हे शौर्य गाजविणारे योद्धे आणि भूमिपूत्र होते. शौर्याचे लक्षण पाहता त्यांना शिवाजी महाराज यांचे समकक्ष मानायला हवे,'' असे बाष्कळ विधान सपकाळ यांनी केले. या वादग्रस्त विधानानंतर सपकाळ यांच्यावर टीकेचा भडीमार सुरू झाला आहे.

### विधानावरून सर्वत्र टीकेची झोड



काहीना काही विचित्र विधाने करून अंगावर वाद ओढवून घेण्याची काँग्रेस नेत्यांना सवय आहे. अशा नेत्यांच्या रांगेत आता सपकाळ जाऊन बसले आहेत. मालेगांव महानगरपालिकेत उपमहापौरांच्या दालनातील टिपू सुलतानच्या फोटोवरून वाद निर्माण झाला आहे. अशातच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्या वादग्रस्त विधानाने आणखी हा वाद चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सपकाळ म्हणाले,''छत्रपती शिवाजी महाराज यांचं शौर्य ज्याप्रकारचे आहे, त्यांनी जो स्वराज्याचा विचार दिला, त्याच मांदियाळीत, त्यांच्यानंतर बऱ्याच वर्षांनी टिपू सुलतान यांनी इंग्रजांच्याविरोधात लढा पुकारला होता. त्या अर्थाने टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे योद्धे होऊन गेले.

# काँग्रेसकडून शेतकऱ्यांची दिशाभूल

## राहुल गांधी अपरिपक्व, अर्थकारणाची समज नाहीः पीयूष गोयल

**मुंबई, १४ फेब्रुवारी**

राहुल गांधी हे सत्यापासून हजारो मैल दूर आहेत. तसेच काँग्रेस पक्ष निराश झाला असून या पक्षाकडे कोणतीही ठोस योजना किंवा उपाय नाहीत. त्यामुळे चुकीची आणि भ्रामक माहिती पसरवून शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे, अशी खोचक टीका केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी शनिवारी केली.

केंद्रीय अर्थसंकल्प आणि भारत-अमेरिका व्यापार कराराच्या संदर्भात राहुल गांधी यांनी भारत-अमेरिका व्यापार करारामुळे देशाच्या ऊर्जा आणि डेटा सुरक्षेला तसेच शेतकऱ्यांच्या भवितव्याला धोका असल्याचा आरोप केला होता.



गांधींच्या या वक्तव्यांवर मंत्री गोयल यांनी मुंबईतून जोरदार पलटवार केला.

### युरोपियन बाजारपेठेतही संधी

युरोपियन युनियनकडून सुमारे २२-२३ लाख कोटींची खरेदी केली जाते. तसेच युरोपियन युनियन, न्यूझीलंड आणि युनायटेड किंग्डममध्ये वस्त्रोद्योग उत्पादने शून्य शुल्काने निर्यात करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. अमेरिका दरवर्षी सुमारे ४८० दशलक्ष पाऊंड कापूस उत्पादन करते. (वृत्तसंस्था)

### वस्त्रोद्योगाला मोठी संधी

**भारताची कापूस उत्पादन क्षमता आणि गरज दोन्ही वाढत आहेत. कच्चा माल आयात करून त्यावर प्रक्रिया करून निर्यात करणे ही जागतिक व्यापारातील जुनी पद्धत आहे. भारताच्या एकूण निर्यातीत वस्त्रोद्योगाचा वाटा सुमारे ३.६० लाख कोटींचा असून तो आगामी काळात दुपटीने वाढण्याची शक्यता आहे. अमेरिकेची वार्षिक वस्त्रोद्योग खरेदी सुमारे ९ लाख कोटींची आहे. भारताला या करारामुळे मोठी बाजारपेठ खुली झाली आहे, असे गोयल यांनी सांगितले.**






CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना देणार मोफत दप्तर

## १६५ कोटींच्या योजनेस प्रशासकीय मान्यता

◆ **मुंबई, १४ फेब्रुवारी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना मोफत शालेय दप्तर देण्यास राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे या उपक्रमांतर्गत ही योजना राबविण्यात येणार असून यासाठी १६५ कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.याबाबतचा शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने जाहीर केला आहे.

शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविण्याच्या विद्यमान योजनेअंतर्गतच या दप्तरांचा खर्च भागविण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला अधिक सक्षम करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

**४१ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना लाभ**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील सुमारे ४१ लाख ४३ हजार ५४ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ होणार आहे. ज्या महानगरपालिका स्वतःच्या निधीतून मोफत दप्तर योजना राबवतात, त्या शाळांतील विद्यार्थ्यांना या योजनेतून वगळण्यात आले आहे.

(तभा वृत्तसेवा)

### शिक्षण हक्क कायदा व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत

'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९' आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व आनंददायी शिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे. त्याच अनुषंगाने शालेय विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.



## महत्त्वाचे

### तीन रेल्वेमार्गांना मंजुरी

**नवी दिल्ली :** १८५०९ कोटी रुपयांच्या तीन महत्वपूर्ण रेल्वे प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आर्थिक व्यवहार समितीची बैठक झाली. या बैठकीत झालेल्या निर्णयांची माहिती रेल्वे तसेच माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी शनिवारी पत्रपरिषदेत दिली.



मुबई हावडा रेल्वे मार्गावरील कसारा ते मनमाड घाटादरम्यान, दिल्ली ते अंबाला दरम्यान तसेच बेल्लारी ते होसपेट दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वेमार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली, असे वैष्णव म्हणाले. कसारा ते मनमाड या १३१ किमी लांबीच्या विभागात तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वेमार्गाच्या कामाला १०१५४ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून हे काम ५ वर्षात पूर्ण केले जाईल, असे स्पष्ट करत वैष्णव म्हणाले की, हा अतिशय आव्हानात्मक रेल्वेमार्ग असून यात २८ किमी लांबीच्या ५ बोगद्यांचाही समावेश आहे. तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वेमार्गाचे काम पूर्ण झाल्यामुळे मालवाहतुकीत ४ कोटी ६१ लाख टनांची वाढ होणार आहे.

### जम्मूमध्ये ४० कोटींचे मादकपदार्थ जप्त

**जम्मू :** आंतरराष्ट्रीय सीमेवर सीमेपलीकडून अंमली पदार्थांच्या तस्करीचा मोठा प्रयत्न उधळून लावण्यात आला. जम्मूमधील आर एस पुरा सेक्टरमध्ये सुमारे ४० कोटी रूपयांपेक्षा जास्त किंमतीचे ६.५ किलोहून अधिक हेरॉइन जप्त करण्यात आले. हे ड्रग्ज सीमेपलीकडून ड्रोनने टाकण्यात आले होते. याबाबत माहिती मिळताच सीमा सुरक्षा दलाच्या १६५ व्या बटालियन आणि पोलिसांनी संयुक्त कारवाई करत बसपूर परिसरातील करोताना गावातून अंमली पदार्थ जप्त केले. १३ व १४ फेब्रुवारीच्या मध्यरात्री पोलिसांना संशयास्पद ड्रोन हालचालीची माहिती मिळाली, असे प्रवक्त्याने सांगितले. शोध मोहिमेदरम्यान आंतरराष्ट्रीय सीमेजवळील शेतात ६.५८२ किलो हेरॉइन असलेले दोन पिवळ्या रंगाचे पॅकेट सापडले. ते जप्त करण्यात आले. ही कामगिरी अंमली पदार्थ तस्करीविरोधात महत्त्वपूर्ण मानली जात आहे. याप्रकरणी एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त केलेल्या अवैध अंमली पदार्थाचा नेमका स्त्रोत आणि गंतव्यस्थान शोधण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

### राष्ट्रीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेत क्रीडा प्रबोधिनीचा रवींद्र पाडवी देशात प्रथम




सुवर्ण पदक विजेता रवींद्र पाडवी

**बंगळूरू :** स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया, डिपार्टमेंट ऑफ स्कूल एज्युकेशन प्री युनिव्हर्सिटी बंगळुरू व डिपार्टमेंट ऑफ स्कूल एज्युकेशन (प्री- युनिव्हर्सिटी) बंगळुरू नॉर्थ डिस्ट्रिक्टतर्फे आयोजित ६९ वी नॅशनल बॉक्सिंग चॅम्पियनशिप ४ ते ९ फेब्रुवारी दरम्यान बंगळुरू येथे आयोजित करण्यात आली होती. यात राष्ट्रीय शालेय बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये क्रीडा प्रबोधिनी अकोल्याचा रवींद्र पाडवी देशात प्रथम आला. या स्पर्धेत ४९ ते ५२ किलो वजनगटात बॉक्सिंग खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करीत रवींद्र पाडवी याने सुवर्ण पदक प्राप्त केले. रवींद्रने आंतरराष्ट्रीय स्पर्धेपूर्व शिबिरात सहभाग घेतला आहे. रवींद्रला जिल्हा क्रीडा अधिकारी तसेच बॉक्सिंग कोच सतीशचंद्र भट्ट यांचे मार्गदर्शन लाभले.



### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,५६,३०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. २,४८,४०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३४.८ | १८.२ |
| अमरावती | ३५.८ | १६.७ |
| भंडारा | ३२.० | १८.६ |
| बुलडाणा | ३३.५ | १८.४ |
| चंद्रपूर | ३४.० | १८.० |
| गडचिरोली | ३२.६ | १६.० |
| गोंदिया | ३२.० | १६.० |
| नागपूर | ३३.८ | १७.५ |
| वर्धा | ३४.५ | १७.५ |
| वाशीम | ३३.२ | १५.६ |
| यवतमाळ | ३४.० | १९.५ |

# टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवरायांशी! हर्षवर्धन सपकाळांना लाज वाटली पाहिजे

## त्यांनी माफी मागावी : मुख्यमंत्री

**नागपूर, दि.१४ फेब्रुवारी-**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रमाणेच टिपू सुलतान यांनाही मान दिला गेला पाहिजे असे वादग्रस्त विधान केले आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली असून, त्यांना लाज वाटली पाहिजे. टिपू सुलतानसारख्या नराधमाची तुलना छत्रपती शिवरायांशी करण्याचे जे काम त्यांनी केले आहे ते अतिशय निंदनीय असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.



देवेंद्र फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवरायांनी स्वराज्य तयार केले. मुघलांच्या जोखडातून सामान्य जनतेला मुक्त करण्याचे काम केले. खऱ्या अर्थाने सामान्य रयतेचे राज्य तयार करणारे छत्रपती शिवराय होते. आणि त्याच वेळी हजारो लाखो हिंदूंची हत्या करणे टिपू सुलतान. या दोघांची तुलना करून दोघांना सारखे सन्मान द्या म्हणणे यापेक्षा जास्त लांगूलचालन, जोडे चाटणे मी या जन्मान बघितले नाही. आम्ही हे बिलकुल सहन करणार नाही. टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवरायांशी केळकी त्याबद्दल त्यांनी माफी मागितली पाहिजे, अशी मागणी फडणवीस यांनी केली आहे. तसेच अशा पद्धतीने ते बोलत असतील आणि काँग्रेस पक्षाने जरा जरी थोडी जरी नैतिकता राहिली असेल तर त्यांनी त्यांची भूमिका मांडली पाहिजे.

**मुलुंड अपघातावर मुख्यमंत्र्यांची प्रतिक्रिया**

मुलुंडमध्ये जो अपघात झाला त्याविषयी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुलुंडमध्ये जो अपघात झाला हा अत्यंत दुर्दैवी आहे. त्या ठिकाणी जे काम चालले होते, त्यात स्लॅब पडला. त्यात दुर्दैवी मृत्यूदेखील झाला आहे, त्यांच्या कुटुंबीयांसोबत आमच्या प्रार्थना आहेत. जे जखमी झाले आहेत त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची सगळी काळजी ही एमएमआरडीएच्या माध्यमातून आणि राज्य सरकारच्या माध्यमातून घेतली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे. चौकशीनंतर कारवाई केली जाईल आणि तात्काळ जिथे जिथे काम चालू आहे तिथे सेफ्टी ऑडिट करून त्या ठिकाणी अशी घटना घडणार नाही या प्रकारचे प्रयत्न केले जातील. मृतकांच्या परिवाराला शासनाकडून मदत केली जाणार असल्याचेही फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

# राष्ट्रवादी विलीनीकरणावर शशिकांत शिंदे यांचे नो कॉमेंट्स्

**मुंबई, दि.१४ फेब्रुवारी-**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चेला नव्याने उधाण आले असताना, शशिकांत शिंदे यांनी अचानक या विषयावर पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे. अजित पवार यांच्या अकस्मित निधनामुळे अनेक राजकीय प्रश्न अनुत्तरित राहिले असून, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया देखील त्यामुळे रखडल्याचे ते म्हणाले. अजित पवार आणि शरद पवार यांच्यात एकत्र येण्याबाबत चर्चा सुरू होती, याबाबत दोन्ही बाजूंच्या नेत्यांकडून वेगवेगळे दावे होत असताना शिंदे यांनी मात्र आता या विषयावर काहीही भाष्य करणार नाही, अशी भूमिका जाहीर केली आहे.



अजित पवार गटातील नेत्यांच्या मते, दोन्ही नेत्यांमध्ये काय चर्चा झाली होती याबाबत स्पष्ट माहिती नाही. मात्र शरद पवार गटातील काही नेत्यांचे म्हणणे असे की, विलीनीकरणाची चर्चा अंतिम टप्प्यात पोहोचली होती आणि १२ फेब्रुवारी रोजी पक्ष एकत्र आणण्याची तयारीही झाली होती. या पार्श्वभूमीवर शशिकांत शिंदे यांनी राष्ट्रवादी, या मासिकात लेख लिहून अनेक खुलासे केले. त्या लेखात दोन्ही पक्षांचे विलीनीकरण होऊन नेतृत्व अजित पवारांकडे देण्याचा प्रस्ताव चर्चेत असल्याचा उल्लेख करण्यात आला होता. या दाव्यांमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली.लेख प्रसिद्ध झाल्यानंतर शशिकांत शिंदे चर्चेच्या केंद्रस्थानी आले. माध्यमांनी त्यांच्याशी संपर्क साधून अधिक माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांनी सांगितले की, दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणासंदर्भात काही निर्णय झाले होते आणि अजित पवार गटातील नेतेही त्याबाबत बोलत आहेत. आम्हीच मागे लागलोय असे चित्र निर्माण केले जात आहे, पण आमच्याकडून कोणतीही गडबड नाही. आम्ही जे बोललो ते सत्य बोललो. मात्र आता हा विषय आम्ही बंद केला आहे, असे ते म्हणाले.यासोबतच त्यांनी अजित पवारांविषयीच्या आपल्या पूर्वीच्या वक्तव्याबाबतही स्पष्टीकरण दिले. मी जर अजितदादांची चूक झाली असे म्हटले असेल, तर मी माझे शब्द मागे घेतो, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या मते, अजित पवारांना पक्षाच्या विभाजनाबाबत काही दुरुस्ती करायची होती आणि ते त्या विषयावर भावनिक होते. शरद पवार यांच्यासोबत झालेल्या भेटीतही अजित पवारांनी कधी नजरानजर केली नाही, असे शिंदे यांनी सांगितले. या विधानांमुळे दोन्ही गटांतील संबंध किती गुंतागुंतीचे होते, याची झलक मिळते.

शिंदे यांनी पुढे सांगितले की, राष्ट्रवादी पक्ष पुन्हा जोमाने काम करण्याच्या भूमिकेत आहे. त्यामुळे विलीनीकरणावर आता भाष्य करणे योग्य नाही, असे त्यांचे मत आहे. निवडणुकीनंतर या विषयावर अंतिम निर्णय घेण्याची चर्चा होती. विलीनीकरणाचे सूत्र काय असेल, नेतृत्वाची रचना कशी असेल, हे सर्व चर्चेत ठरवले जाणार होते. मात्र आता चर्चा करणारे प्रमुख नेतेच आपल्यात नाहीत, त्यामुळे जर-तर वर बोलण्यात अर्थ नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

# विलीनीकरणाचा विषय आमच्यापुढे नाही : भुजबळ

**मुंबई, दि.१४ फेब्रुवारी-**

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी शनिवारी राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाचा विषय आमच्यापुढे नसल्याच स्पष्ट केले आहे. रोज विलीनीकरण, विलीनीकरण, विलीनीकरण ही काय चर्चा आहे का? ही चर्चा आज, उद्या, महिना किंवा २ महिन्यांनीही करता येईल. या प्रकरणी घाई करण्याची काहीच गरज नाही, असे ते म्हणालेत.

अजित पवार यांचेच गत २८ जानेवारी रोजी झालेल्या एका विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघाले आहे. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने आमची अजित पवारांशी विलीनीकरणाच्या मुद्यावर चर्चा सुरू होती व १२ फेब्रुवारी रोजी विलीनीकरणाची अधिकृत घोषणा होणार होती असा दावा केला आहे.




पण अजित पवारांच्या पक्षाने त्यांचा हा दावा फेटाळून लावला आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री छगन भुजबळ यांनीही सध्या आपल्या पक्षाचे प्राधान्य विलीनीकरणाला नव्हे तर सुनेत्रा पवार स्थिर स्थावर होण्याला असल्याचे स्पष्ट केले. छगन भुजबळ पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, रोज विलीनीकरण, विलीनीकरण, विलीनीकरण ही काय चर्चा आहे? ही चर्चा आजही करता येईल, महिन्याने करता येईल किंवा दोन महिन्यानेही करता येईल. घाई करण्याचे कारण काय? सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्यात. राष्ट्रीय अध्यक्ष म्हणूनही आम्ही त्यांची निवड करणार आहोत. त्यानंतर त्या पक्षाचे जे काही प्रमुख लोक आहेत किंवा त्यांना जे योग्य वाटतील त्यांना बोलावून या मुद्यावर चर्चा करतील. शेवटी एवढा मोठा निर्णय दोन्ही बाजूंच्या लोकांशी चर्चा करूनच होईल. त्यावर एवढी घाई करण्याची गरज नाही. परंतु आज ते ठरलेच होते, ते झालेच पाहिजे असे म्हणण्याला काहीच अर्थ नाही. तिथे नवीन कॅप्टन आलेत. त्यांना बसू द्या. त्यांना काम करू द्या. त्यांना समजून घेऊ द्या. त्यानंतर त्या काय करायचे ते पाहतील. आज आमच्यापुढे हा विषय खरोखरच नाही. सुनेत्रा पवार स्थिर स्थावर होणे व त्यांची पक्षाच्या अध्यक्षपदी निवड करणे हाच आमच्यापुढे प्राधान्यक्रमाचा विषय आहे, असे ते म्हणाले.

# महाशिवरात्री : गुरुदेव सेवा मंडळातर्फे आज महाआरती

सोलापूर : गुरुदेव सेवा मंडळ (नेहरू नगर) श्री काशी विश्वेश्वर लिंगाची महाशिवरात्री निमित्त रविवार १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता महापूजा व महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे.

उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, गटनेते नरेंद्र काळे, नगरसेवक राजशेखर पाटील, सत्यजीत वाघमोडे, आरती वाकसे, अश्विनी चव्हाण, मधुसूदन जंगम, संगीता जाधव, गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार शिवशरणअण्णा बिराजदार-पाटील, विक्रम खेलबुडे, प्रशांत जोशी,आप्पासाहेब गंचिनगोटे, उमेश कदम आदी मान्यवरांच्या उपस्थितीत महाआरती संपन्न होणार आहे.

यावेळी श्री काशीविश्वेश्वर लिंगाची तांदूळ पूजा करण्यात येणार आहे तसेच प्रसाद वाटप ही करण्यात येणार आहे. सर्व नागरिकांनी या महाआरती व महापूजा कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे असे आवाहन गुरुदेव सेवा मंडळ व भक्त मंडळाच्या वतीने मदन पोलके, निवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी अशोक भांजे, सुरेश स्वामी, तुकाराम बिराजदार, गंगाधर पाटील, विश्वनाथ आमणे आदींनी केले आहे.

# मुंबईत मेट्रोचा स्लॅब कोसळून एक ठार

## तीन गंभीर जखमी

◆ **मुंबई, १४ फेब्रुवारी**

मुंबईतील मुलुंड परिसरात शनिवारी दुपारी बांधकाम सुरू असलेल्या मेट्रो रेल्वे लाईन चारच्या गर्डर पुलाचा स्लॅब काही वाहनांवर कोसळून एकाचा मृत्यू झाला, तर तीन जण जखमी झाले, अशी माहिती पोलिस आणि महसूल अधिकाऱ्यांनी दिली. मृताच्या वारसाला ५ लाख रुपये देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

दुपारच्या सुमारास एलबीएस रोडवरील जॉन्सन अॅण्ड जॉन्सन कारखान्याजवळ गर्डर पुलाच्या पॅरापेट वॉलचा स्लॅब ऑटोरिक्षा आणि स्कोडावर कोसळला. यात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

रामधन यादव, महेंद्र प्रताप यादव आणि दीपा रुहिया, अशी या अपघातात जखमी झालेल्यांची नावे असल्याचे अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्याने सांगितले. यातील जखमी राजकुमारची प्रकृती गंभीर आहे आणि तो जवळच्या रुग्णालयात अतिदक्षता विभागात आहे, तर महेंद्र आणि रुहियाची प्रकृती स्थिर असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

मुलुंड अग्निशमन केंद्राजवळील मेट्रो लाईन बांधकामाच्या घाट क्रमांक १९६ जवळ दुपारी सव्वाबारा वाजता पॅरापेट वॉलच्या स्लॅबचा एक भाग जाणाऱ्या वाहनांवर पडला, असे मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने एका निवेदनात म्हटले आहे.

(वृत्तसंस्था)

# युरोपच्या सुरक्षेची हमी राहिलेली नाही

## अमेरिकेच्या धोरणावर जर्मन चान्सलर यांचे ताशेरे ● नियमांवर आधारित जग संपले

◆ **म्युनिक, १४ फेब्रुवारी**

बदलती जागतिक परिस्थिती आणि सध्याचे अमेरिकेचे धोरण युरोपच्या सुरक्षेसाठी मोठे आव्हान आहे. युरोपच्या स्वातंत्र्याची हमी राहिलेली नाही, त्यामुळे इतरांच्या मदतीवर अवलंबून न राहता संरक्षणासाठी स्वावलंबी होण्याची वेळ आल्याचे जर्मन चान्सलर फ्रेडरिक मर्ज यांनी म्हटले आहे.




म्युनिक सुरक्षा परिषदेला संबोधित करताना अमेरिकेवर निशाणा साधताना मर्ज म्हणाले, युरोपच्या सुरक्षेसाठी इतरांवर अवलंबून राहण्याचा काळ आता राहिलेला नाही. नियमांवर आधारित जग संपले आहे. जागतिक व्यवस्था आता पूर्वीच्या स्वरूपात अस्तित्वात नाही. ज्याच्याकडे शक्ती त्याचेच वर्चस्व या आधारावर जगाची वाटचाल सुरू आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जी जागतिक व्यवस्था निर्माण झाली होती, ती आता संपुष्टात आली आहे. त्यावेळी देश परस्पर नियम आणि समजुतीनुसार काम करत होते, परंतु आता परिस्थिती बदलली आहे. अशा परिस्थितीत युरोप हे गृहीत धरू शकत नाही की त्याची सुरक्षा आणि स्वातंत्र्य आपोआप टिकून राहील. युरोपीय देशांना आता अधिक जबाबदारी घ्यावी लागेल. गरज पडल्यास त्यागही करावा लागेल आणि स्वतःची संरक्षण व अर्थव्यवस्था मजबूत करावी लागेल.

**परस्पर हितांच्या आधारावर निर्णय**

सध्याचे निर्णय सामायिक नियमांनुसार नव्हे, तर ताकद आणि आपापल्या हितांच्या आधारावर घेतले जात आहेत. आजच्या जगात अमेरिका देखील इतर देशांवर आपले निर्णय थोपवू शकत नाही. कोणतीही मोठी शक्ती स्वतःच्या बळावर प्रत्येक आव्हानाचा सामना करू शकत नाही. महासत्तांमधील वाढत्या स्पर्धेच्या या काळात अमेरिकेलाही मित्रपक्षांची गरज आहे. सुरक्षा, संरक्षण, तंत्रज्ञान आणि व्यापार यांसारख्या मोठ्या मुद्यांवर भागीदारी आवश्यक आहे.

(वृत्तसंस्था)

### प्रभावी निर्णय घ्यावे लागणार : मॅक्रॉन

फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन म्हणाले की, आता वेळ आली आहे की युरोपला केवळ आर्थिक शक्तीपुरते मर्यादित न राहता, संरक्षण आणि तंत्रज्ञानातही मजबूत व्हावे लागेल. जागतिक निर्णयांमध्ये अधिक प्रभावी भूमिका बजावणे काळाची गरज आहे. परिषदेदरम्यान, मॅक्रॉन यांनी ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर आणि युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांची भेट घेतली.

### जगभरातील शत्रू आम्हाला घाबरतात : ट्रम्प

**वॉशिंग्टन :** अमेरिकेची लष्करी शक्ती काय करू शकते, हे संपूर्ण जगाने पाहिले आहे. अमेरिकेला आव्हान देण्याची शत्रूमध्ये हिंमत राहिलेली नाही. व्हेनेझुएलावर केलेल्या कारवाईमुळे जगभरातील संभाव्य शत्रू आपल्याला घाबरतील याची खात्री झाली आहे, असे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरक्षा दलाच्या जवानांशी संवाद साधताना सांगितले. उत्तर कॅरोलिना येथील फोर्ट ब्रॅग लष्करी तळाला ट्रम्प यांनी भेट दिली, यावेळी व्हेनेझुएलाचे माजी राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना अटक करणाऱ्या जवानांची भेट घेतली. अमेरिकन सशस्त्र दलांचे अभिनंदन करताना ट्रम्प म्हणाले, अमेरिकेला आव्हान देणाऱ्यांचे परिणाम काय होतात, हे व्हेनेझुएलाच्या कारवाईवरून जगाने पाहिले. सुरक्षा दलाने दाखविलेल्या शौर्याने जगभरातील शत्रू अमेरिकेकडे वाकड्या नजरेने पाहणाची हिंमत करणार नाही.

# 'उद्योगबोध २०२६' मध्ये संजीव पेंढारकर यांचे मार्गदर्शन

◆ **मुंबई, १४ फेब्रुवारी**

सॅटर्डे क्लबने मुंबई येथे आयोजित केलेल्या 'उद्योगबोध' या कार्यक्रमात उद्योगक्षेत्रातील मान्यवर संजीव पेंढारकर यांना पॅनलिस्ट म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. या चर्चासत्रात रविंद्र प्रभू देसाई, वंदना दातार यांसारख्या मान्यवरांची उपस्थिती होती.




पत्रकार सुधीर गाडगीळ आणि त्यांच्या मुलाने घेतलेली मुलाखत अत्यंत रंजक, प्रभावी आणि ऊर्जादायी ठरली. संजीव पेंढारकर यांनी आपल्या यशस्वी प्रवासाची कहाणी अत्यंत प्रभावी शब्दांत मांडली. विशेषतः त्यांनी सांगितलेली न्यूझीलंडमधील एका ग्राहकाची प्रेरणादायी कथा उपस्थितांच्या मनाला भिडली आणि सर्वांच्या टाळ्यांचा कडकडाट झाला. त्यांनी ब्रँडिंग आणि मार्केटिंग यातील फरक सोप्या शब्दांत स्पष्ट केला. 'ब्रँडिंग' म्हणजे ग्राहकांच्या मनात विश्वास, ओळख आणि भावनिक नाते निर्माण करणे. 'मार्केटिंग' म्हणजे त्या उत्पादनाची प्रभावीपणे बाजारात विक्री करण्यासाठी केलेले नियोजन आणि प्रयत्न. त्यांच्या विचारांची स्पष्टता, अनुभवाधारित उदाहरणे आणि प्रेरणादायी शैलीमुळे उपस्थित सर्वजण भारावून गेले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी समाधान आणि उत्साह व्यक्त करत भरभरून दाद दिली. 'उद्योगबोध २०२६' हा कार्यक्रम प्रेरणा, ज्ञान आणि व्यावसायिक दृष्टी देणारा ठरला. संजीव पेंढारकर यांचे मार्गदर्शन हे संमेलनाचे विशेष आकर्षणबिंदू ठरला.

वा

# न्यायालयात जाताना वकिलाची गोळी झाडून हत्या

◆ **शिवपुरी, १४ फेब्रुवारी**

मध्य प्रदेशच्या शिवपुरी जिल्ह्यात न्यायालयात जाताना एका वकिलाची गोळी झाडून हत्या करण्यात आली. दिवसाढवळ्या झालेल्या या हत्येमुळे खळबळ उडाली आहे. जमिनीच्या वादातून ही घटना झाल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले.

करैरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत दुचाकीवरून आलेल्या तीन हल्लेखोरानी वकील संजय कुमार सक्सेना यांच्या वाहनाला अडविले आणि त्यांच्यावर दोन गोळ्या झाडल्या. स्थानिकांच्या मदतीने त्यांना तत्काळ रुग्णालयात नेले, जिथे डॉक्टरांनी मृत घोषित केले. कुटुंबाने पोलिसांना सांगितले की सक्सेना यांचा काही लोकांशी जमिनीचा वाद होता. या वादातूनच त्यांची हत्या करण्यात आल्याचा संशय आहे. सक्सेना घिरियाली मोहल्ला, पुराणा बाजार येथील रहिवासी आहे.

(वृत्तसंस्था)

# भारताने बांगलादेशविरोधी शक्तीला पाठिंबा देऊ नये

## संबंध सुधारण्यासाठी रहमान यांची घातल्या अटी

◆ **ढाका, १४ फेब्रुवारी**

बांगलादेश प्रथम या अजेंड्याला नवीन सरकारचे प्राधान्य राहणार आहे. लोकांच्या हिताला पूरक ठरणारे आमचे परराष्ट्र धोरण असेल. आम्हाला भारतीय भूमीवरून बांगलादेशला अस्थिर करणारी कोणतीही कृती नको आहे. शेख हसीना भारतात राहून कारवायांमध्ये सहभागी झाल्या आणि भारत सरकारने त्यांना रोखले नाही, तर हा प्रकार आम्ही खपवून घेणार नाही. भारताने कोणत्याही प्रकारच्या अस्थिरतेला पाठिंबा देण्यापासून दूर राहायला हवे अशा शब्दांत बीएनपीचे अध्यक्ष तारिक रहमान यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

भारतासोबतचे संबंध सुधारण्यासाठी त्यांनी काही अटी घातल्या आहेत. यात शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाचा मुद्दा देखील आहे. बांगलादेशच्या सार्वत्रिक निवडणुकीत अभूतपूर्व यश मिळाल्यानंतर बीएनपीचे अध्यक्ष तारिक रहमान यांनी शनिवारी प्रसार माध्यमांशी बोलताना म्हटले की, भारत, चीन आणि पाकिस्तानसारख्या देशांसोबत संतुलित संबंध राखेल जाईल. समानता आणि परस्पर आदरावर आधारित संबंधाला प्राधान्य दिले जाईल. हसीना यांचे खटले न्यायव्यवस्थेच्या कक्षेत ठेवले जातील. कोणतीही कायदेशीर प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पुढे जाईल. सरकार न्यायालयाच्या आदेशांनुसार काम करेल. भारत आणि बांगलादेशमध्ये प्रत्यार्पण करार आहे, परंतु अंतिम निर्णय न्यायालयीन प्रक्रियेवर आधारित असेल. आम्हाला शेजारी देशांकडून कोणत्याही प्रकारचा अतिरेकीवाद अस्वीकार्य आहे. दोन्ही देशांनी सुरक्षा सहकार्य वाढवावे आणि माहितीची देवाणघेवाण करावी. आपण भूतकाळात अडकलो तर आपण पुढे जाऊ शकणार नाही. आपण भविष्याकडे पाहिले पाहिजे.

**द्विपक्षीय सहकार्याला प्राधान्य**

आम्ही कोणत्याही प्रकारचा सांप्रदायिक तणाव सहन करणार नाही. प्रत्येक देशाने त्यांच्या अंतर्गत समस्या सोडवणे आणि द्विपक्षीय सहकार्याला प्राधान्य देणे गरजेचे आहे. आर्थिक विकास आणि देशांतर्गत आव्हानांना तोंड देणे ही आमची पहिली प्राथमिकता आहे. भारतासोबत आम्हाला मजबूत द्विपक्षीय संबंध हवे आहेत, मात्र त्यांनी बांगलादेशला अस्थिर करणारी कोणतीही कृती करू नये.

(वृत्तसंस्था)

CMYK



सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

■ रविवार, १५ फेब्रुवारी २०२६

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

# रहमान यांचा पाकिस्तान, चीनकडे कल

## पायाभूत सुविधांचा विकास, व्यापार वाढविण्याचे दिले आश्वासन

◆ **नवी दिल्ली, १४ फेब्रुवारी**

१०७१ मध्ये स्वतंत्र झाल्यापासूनच बांगलादेशात भारतविरोधी आणि समर्थक, असे दोन प्रवाह आहेत. जमाते इस्लामी कट्टरपंथीय संघटना असून कट्टर भारतविरोधी आहे. शुक्रवारी झालेल्या मतमोजणीत विजय झालेला बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी या पक्षाचा कल चीन आणि पाकिस्तानच्या बाजूने राहिला आहे. तथापि, अवामी लीग हा पक्ष भारताच्या बाजूने राहिला आहे. विजयी होताच 'बीएनपी'ने चीन आणि पाकिस्तानसोबत व्यापारी संबंध वाढविण्याचे सुतोवाच केले आहे.

माजी पंतप्रधान दिवंगत खालिदा झिया यांचे पुत्र ६० वर्षीय तारिक रहमान हे बांगलादेशचे पुढील पंतप्रधान असतील. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत रहमान यांच्या नेतृत्वात बीएनपीने प्रचंड यश मिळविले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संदेश पाठवित त्यांचे अभिनंदन केले. चीन आणि पाकिस्तान सरकारने अभिनंदनाचे ट्विट केल्यानंतर बीएनपीने दोन्ही देशांचे धन्यवाद मानले. एवढेच नव्हे तर आगामी काळात पायाभूत सुविधांचा विकास करण्याबरोबरच व्यापार वृध्दीवर भर देण्याचे आश्वासन दिले आहे. चीनचा 'बॉर्डर रोड इनिशिएटीव्ह' हा प्रकल्प भारतासाठी चिंतादायक आहे. भूमार्गाने भारताला चारही दिशांनी घेरण्याचा डाव म्हणून या प्रकल्पाकडे पाहिले जाते. बीआरई सोबतच बांगलादेशात सुरू असलेल्या प्रकल्पांमध्ये चीनच्या सहकार्याने कार्य करण्यास बांगलादेश तयार असल्याचे बीएनपीने म्हटले आहे. सोबतच लष्करी संबंधांमध्येही वाढ झाली आहे. पाकिस्तानचे वरिष्ठ लष्करी अधिकारी सातत्याने ढाक्याला जात असून बांगलादेशची एक लष्करी तुकडी पाकिस्तानच्या भेटीवर गेली आहे. ह्या सर्व घडामोडींवर लक्ष ठेवणे भारताला आवश्यक झाले आहे. (वृत्तसंस्था)



### पाकिस्तानसोबतच्या संबंधात वाढ

शेख हसीना वाजेद यांचे सरकार पाडल्यानंतर मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वातील हंगामी सरकारने भारताशी वितुष्ट घेत पाकिस्तानशी जवळीक साधली. व्यापार आणि संरक्षण संबंध वाढविले. तारिक रहमान यांच्या पक्षानेही हे संबंध आणखी मजबूत करण्याचे आश्वासन दिले आहे. क्षेत्रीय शांतता आणि स्थिरतेसाठी दोन्ही देश काम करतील, असेही बीएनपीच्या प्रवक्त्याने म्हटले आहे. ■

### चीनची बांगलादेशात वेगाने गुंतवणूक

शेख हसीना यांचे सरकार गेल्यानंतर चीनने बांगलादेशात वेगाने हातपाय पसरविण्यास सुरूवात केली आहे. पद्मा नदीवर मोठ्या पुलाची निर्मिती करण्याबरोबरच बांगलादेशातील पाण्याखालून जाणारा पहिला कर्णफुली बोगदा चीनने बांधून दिला आहे. सोबतच २७ वीज प्रकल्पांच्या निर्मितमध्येही सहकार्य केले. १२ रस्ते आणि २१ पूलांच्या बांधकामासाठी चीनने कर्ज दिले आहे. आतापर्यंत चीनने बांगलादेशात ४२ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. ■



काश्मीर खोऱ्यातील पुलवामा जिल्ह्यात झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याला सात वर्षे पूर्ण झालीत. या हल्ल्यात केंद्रीय राखीव पोलिस दलाचे ४० जवान हुतात्मा झाले होते. हुतात्मा जवानांच्या स्मृतीनिमित्त उभारण्यात आलेल्या स्मारकाला अभिवादन करताना सुरक्षा जवान आणि अधिकारी

# खोटे बोला, पण रेटून बोला हेच राहुल गांधींचे धोरण

### अमित शाह यांचा घणाघात

◆ **कराइकल, १४ फेब्रुवारी**

अलिकडे काही देशांसोबत तसेच अमेरिकेसोबत झालेल्या व्यापार करारात भारतातील शेतकरी आणि मासेमारांचे हित पूर्णपणे सुरक्षित आहे आणि काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी याबाबत खोटे बोलत लोकांची दिशाभूल केली आणि त्यांच्या मनात भ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला, असा घणाघात केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी शनिवारी येथे केला.

राहुल गांधी यांनी दररोज खोटे बोलण्याची एक नवीन परंपरा सुरू केली आहे. खोटे बोला पण रेटून बोला, असे राहुल गांधी यांचे धोरण आहे. पण, लोकांनी त्यांच्या खोटेपणाचा कारखाना ओळखला आहे, असे अमित शाह यांनी भाजपाच्या एका मोठ्या सभेला संबोधित करताना सांगितले.

राहुल गांधी देशातील मासेमार आणि शेतकऱ्यांची दिशाभूल करू इच्छितात. खोटे बोलून त्यांना भ्रम पसरवायचा असतो, असा आरोप अमित शाह यांनी केला. भारत-अमेरिका व्यापार करारानिमित्त ब्रिटन आणि युरोपियन युनियनसोबत स्वाक्षरी केलेल्या मुक्त व्यापार करारांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकरी, मासेमार आणि पशुपालकांना १०० टक्के संरक्षण दिले आहे, असे शाह म्हणाले. राहुल गांधी यांनी अगोदर व्यापार करारांमधील तरतुदी काळजीपूर्वक वाचाव्या. यात भारतीय भागधारकांचे हित १०० टक्के सुनिश्चित केले आहे. या व्यापार करारांचा मासेमारांना फायदा होईल, असा पुनरुच्चार अमित शाह यांनी केला.

अमित शाह यांनी भ्रष्टाचाराच्या मुद्यावर व्ही. नारायणसामी (२०१६-२१) यांच्या नेतृत्वाखालील पुडुचेरी काँग्रेस राजवटीवर अमित शाह यांनी टीका केली आणि अलिकडील कॅग अहवालाचा हवाला देत आरोप केला की, पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात केंद्रशासित प्रदेशात १५ हजार कोटी रुपयांचा संपूर्ण विकास निधी गिळंकृत केला. या प्रकरणाची चौकशी सुरू झाली आहे १५ हजार कोटी हे पुडुचेरीचे तीन वर्षांचे बजेट आहे, असे अमित शाह म्हणाले. (वृत्तसंस्था)

### लोकांनी ओळखला खोटेपणाचा कारखाना

#### संपुआच्या काळात शेतकरीहित विकले

दिवंगत मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वातील संपुआ सरकारच्या काळात शेतकऱ्यांचे हित विकले गेले, असा आरोप शाह यांनी केला. मुक्त व्यापार करार आणि व्यापार करारामुळे आपल्या शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. मनमोहनसिंग सरकारच्या काळात अनेक जागतिक करारांवर स्वाक्षरी करण्यात आली होती. यात शेतकऱ्यांचे हित विकले गेले होते. येथे नरेंद्र मोदी यांनी शेतकरी आणि पशुपालकांचे हित सुनिश्चित केले, असे अमित शाह म्हणाले. ■

### स्कॉर्पिओ झाडावर आदळली पाच जणांचा मृत्यू

**गोहाना** : हरयाणातील गोहानामध्ये बरोदा मार्गावर भावड गावाजळ एक भीषण अपघात झाला. या अपघातात पाच तरूणांचा जागीच मृत्यू झाला तर तिघांना गंभीर अवस्थेत रूग्णालयात दाखल करण्यात आले. हे सर्व तरूण एका विवाह समारंभातून परत येत असताना हा अपघात झाला. अंकुश, दीपक, साहिल (रा. खडवाली), गोलू रा. घुसकानी व सागर, अशी मृतकांची तर अंकित, मोहित व एक तरूण, अशी जखमींची नावे आहेत. ■

# अमेरिकी न्यायालयाने निखिल गुप्ताला ठरवले दोषी

### गुरपतवंतसिंग पन्नूच्या हत्येचा कट

◆ **न्यू यॉर्क, १४ फेब्रुवारी**

अमेरिकेच्या भूमीवर एका शीख अतिरेक्याविरुद्ध भाडोत्रींचा वापर करीत हत्येचा कट रचण्याच्या आरोपाखाली भारतीय नागरिक निखिल गुप्ताला अमेरिकी न्यायालयाने दोषी शुक्रवारी दोषी ठरवले आहे.

न्यू यॉकमध्ये खलिस्तानी अतिरेकी गुरपतवतसिंग पन्नूच्या हत्येच्या प्रयत्नासंदर्भात निखिल गुप्ताला खुनासाठी भाडोत्री आणणे, कत्येचा कट रचण्याची सुपारी देणे आणि मनी लॉण्ड्रिंगचा कट रचल्याच्या आरोपांमध्ये दोषी ठरवले. पन्नूकडे अमेरिकी आणि कॅनडा, असे दुहेरी नागरिकत्व आहे.

गुप्तो अमेरिकी मॅजिस्ट्रेट न्यायाधीश सारा नेटबर्न यांच्यासमोर गुन्हा कबूल केला आणि अमेरिकी जिल्हा न्यायाधीश व्हिक्टर मॅरेरो २९ मे रोजी त्याला शिक्षा सुनावणार आहे. गुप्ताने हत्येसाठी सुपारी दिल्याची कबुली दिली यात कमाल १० वर्षांचा तुरुंगवास, सुपारी देऊन हत्येचा कट रचल्याची कबुली दिली यात कमाल १० वर्षांचा तुरुंगवास, मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात कमाल २० वर्षांची शिक्षा आहे, असे न्यू यॉर्कच्या दक्षिणी जिल्ह्याचे युनायटेड स्टेट्स ॲटर्नी जे क्लेटन यांनी एका निवेदनात म्हटले आहे.

गुप्ताने केलेल्या व्यवहारात यादवने नंतर पन्नूची हत्या करण्यासाठी गुप्त अधिकाऱ्याला एक लाख अमेरिकी डॉलर्स देण्याचे मान्य केले. १ जून २०२३ रोजी किंवा त्या सुमारास यादव आणि गुप्ता यांनी एका सहकाऱ्याला हत्येसाठी आगाऊ रक्कम म्हणून अमेरिकी गुप्त अधिकाऱ्याला १५ हजार अमेरिकी डॉलर्स रोख देण्याची व्यवस्था केली होती.

#### विकास यादव सहआरोपी

गुप्तावरील आरोप, सार्वजनिक न्यायालयीन दस्तावेज आणि न्यायालयातील बयाणानुसार, गुप्ताने भारतातील आणि इतरत्र इतरांसोबत काम केले. यात सह-आरोपी विकास यादवसह अमेरिकेच्या भूमीवर पन्नूच्या हत्येचा कट रचला गेला. यादवच्या निर्देशानुसार गुप्ताने एकाशी संपर्क साधला. तो न्यू यॉर्क शहरात पन्नूची हत्या करण्यासाठी मारेकरी ठरवण्यात मदत करण्यासाठी मादकपदार्थ प्रशासनासोबत काम करणारा एक गोपनीय स्रोत होता. (वृत्तसंस्था)

# आसाममध्ये आपत्कालीन लॅण्डिंग सुविधा

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विमान धावपट्टीवर उतरले; ऐतिहासिक क्षण




◆ **गुवाहाटी, १४ फेब्रुवारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी आसामच्या दिब्रुगड जिल्ह्यात सी-१३०जे विमानातून ईशान्येकडील पहिल्या आपत्कालीन लॅण्डिंग सुविधेवर (ईएलएफ) ऐतिहासिक लॅण्डिंग केले.

नरेंद्र मोदी यांनी आगमनानंतर चाबुआ विमानतळावरून उड्डाण केले आणि राष्ट्रीय महामार्ग-३७ च्या एका भागात मोरन येथील ईएलएफ येथे उतरले. ईशान्येकडील भागात आपत्कालीन लॅण्डिंग सुविधा मिळणे ही अत्यंत अभिमानाची बाब आहे, असे उद्घाटनानंतर 'एक्स'वरील एका पोस्टमध्ये नरेंद्र मोदी यांनी म्हटले.

ही सुविधा नागरी आणि लष्करी दोन्ही वापरासाठी उभारण्यात आली आहे. आणिबाणीच्या परिस्थितीत दिब्रुगड विमानतळाला पर्याय म्हणून काम करते, असे त्यांनी सांगितले. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्व सरमा, केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल, एअर चीफ मार्शल ए. पी. सिंग आणि आसाम मंत्रिमंडळातील इतर मंत्र्यांनी नरेंद्र मोदी यांचे ईएलएफवर स्वागत केले. धावपट्टीवर उतल्यानंतर मोदी जवळच्या ठिकाणी गेले. तिथे त्यांनी हेलिकॉप्टरसह भारतीय वायुदलाच्या लढाऊ आणि वाहतूक विमानांचे हवाई प्रदर्शन पाहिले. (वृत्तसंस्था)

### रसद पोहचविणे सोपे

सामरिक दृष्टिकोनातून आणि नैसर्गिक आपत्तीच्या काळात ही सुविधा खूप महत्त्वाची असते, असे ते म्हणाले. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलेल्या मोरन बायपासवरील ४.२ किमी लांबीचा १०० कोटी रुपयांचा ईएलएफ हा मार्ग आयएएफ लढाऊ विमाने आणि वाहतूक विमानांसाठी एक धोरणात्म आणि बहू-कार्यात्मक धावपट्टी म्हणून काम करेल. यामुळे संरक्षण, रसद आणि आपत्ती प्रतिसाद मजबूत होईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. ■

## चित्रपट वार्ता

### 'बॅटल ऑफ गलवान'चे रोमँटिक गाणे प्रदर्शित

**मुंबई** : 'बॅटल ऑफ गलवान' या चित्रपटातील 'मैं हूं' रोमँटिक गाणे प्रदर्शित झाले. हे गाणे सलमान खान आणि चित्रांगदा सिंह यांच्यावर चित्रित करण्यात आले आहे. यात दोघांची प्रेमळ केमिस्ट्री दिसते आहे. हे गाणे सलमान खान फिल्म्सने त्यांच्या अधिकृत प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित केले. यापूर्वी 'मातृभूमी' हे गाणे प्रदर्शित झाले होते. याला ५० दशलक्षाहून अधिक व्ह्यूज मिळाले होते. हे गाणे एका सैनिकाचे आणि त्याच्या कुटुंबाच्या नात्याची भावनिक कथा दर्शवते. चित्रपटाचे संगीत दिग्दर्शक आणि संगीतकार अयान लाल यांनी हे गाणे संगीतबद्ध केले आहे. या ट्रॅकला त्यांनी श्रेया घोषाल यांच्यासोबत आपला आवाजही दिला आहे. याचे बोल अयान लाल आणि शब्बीर अहमद यांनी लिहिले आहेत. ■



### विजय-रश्मिकाने नाकारला नेटफ्लिक्सचा प्रस्ताव

**मुंबई** : अभिनेता विजय देवरकोंडा आणि अभिनेत्री रश्मिका मंदाना यांनी त्यांच्या कथित लग्नाच्या व्हिडिओच्या ओटीटी स्ट्रीमिंग हक्कांसाठी ६० कोटी रुपयांची ऑफर नाकारली आहे. नेटफ्लिक्सने कथितरित्या लग्नाच्या एक्सक्लुझिव्ह स्ट्रीमिंग हक्कांसाठी ६० कोटी रुपयांचा प्रस्ताव दिला होता, जो दोघांनी नाकारला. विजय आणि रश्मिका लवकरच लग्न बंधनात अडकण्याची शक्यता आहे. यामुळे अनेक ओटीटी प्लॅटफॉर्म त्यांच्याकडे लग्नाचा व्हिडीओ खरेदी करण्यासाठी संपर्क साधत आहेत. माहितीनुसार, विजय आणि रश्मिका कोणत्याही किमतीत त्यांच्या लग्नाचा व्हिडीओ विकू इच्छित नाहीत. तो व्हिडीओ ते थेट यूट्यूबवरच प्रदर्शित करतील अशी शक्यता आहे. ■



### 'एक दिन'चे नवीन पोस्टर प्रदर्शित

**मुंबई** : आमिर खान प्रॉडक्शनने 'एक दिन' या चित्रपटाचे नवीन पोस्टर प्रदर्शत केले आहे. या पोस्टरमध्ये साई पल्लवी आणि जुनैद खान दिसत आहेत. दोघे एका किराणा दुकानात बसलेले असून साई पल्लवीने मेणबत्ती असलेला कपकेक धरला आहे. ते हसत आहेत आणि एकमेकांकडे पाहत आहेत. हा छोटासा पण हृदयस्पर्शी क्षण चित्रपटातील त्यांच्या प्रेमकथेची एक गोड झलक देतो. शेअर केलेल्या कॅप्शनमध्ये 'फक्त एक दिवस पुरेसा आहे', असे लिहिले आहे. चित्रपटाचा टीझर आधीच प्रदर्शित झाला आहे. यात जुनैद खान गोंडस आणि लाजाळू दाखवण्यात आला आहे, तर साई पल्लवीची व्यक्तिरेखा खूपच शांत आहे. हा चित्रपट १ मे रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. ■



# शत्रूंच्या हालचालींवर 'हाप्स' ठेवणार लक्ष




◆ **नवी दिल्ली, १४ फेब्रुवारी**

बदलते युद्धक्षेत्र, धोकादायक शेजारी देश आणि शत्रूंकडे असलेले अद्ययावत तंत्रज्ञान यांना तोंड देण्यासाठी आता नवीन पद्धतींचा अवलंब करणे गरजेचे आहे. यासाठीच संरक्षण संपादन परिषदेने भारतीय वायूसेनेसाठी 'एअर-शिप बेस्ट हाय-अल्टिट्यूड स्युडो सॅटेलाईट' खरेदीच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. या छद्म उपग्रहाला 'हाप्स' म्हणतात. याचा अर्थ 'आकाशात टांगलेला चौकीदार' असा होतो.

हा 'छद्म उपग्रह' ३.६० लाख कोटी रुपयांच्या विशाल संरक्षण पॅकेजचा एक भाग आहे. विशेष म्हणजे हे विमान किंवा ड्रोन नाही तर 'छद्म उपग्रह' आहे. याची निर्मिती भारतात होणार आहे. हा उपग्रह पूर्णपणे सौरऊर्जेवर चालतो. हा जमिनीपासून साधारण १८ ते २० किलोमीटर उंचीवर (समताप मंडळात) स्थिर राहतो. हा उपग्रह हवेत झेपावल्यानंतर अनेक महिने सलग एकाच ठिकाणी राहून पाळत ठेवू शकतो. पारंपारिक उपग्रह अवकाशात सोडणे खर्चिक आणि गुंतागुंतीचे असते तसेच ते ठरावीक कक्षेत फिरत असल्यामुळे एकाच ठिकाणी राहून पाळत ठेवण्यास अक्षम ठरतात. ड्रोन उडविण्याची क्षमता देखील मर्यादित असते. या सगळ्या उणीवा 'हाप्स' हा छद्म उपग्रह भरून काढू शकातो. याची क्षमता उपग्रहाप्रमाणे असली तरी खर्च कमी आहे आणि नियंत्रण ठेवणे सहज शक्य आहे. याच्या याच वैशिष्ट्यांमुळे याला 'स्युडो सॅटेलाईट म्हणजे 'छद्म उपग्रह' म्हणतात.

लांब आणि गुंतागुंतीच्या सीमांवर २४ तास नजर ठेवणे सोपे नाही. शत्रूने रस्ता बांधला, पायाभूत सुविधा उभारल्या किंवा सैन्याची तैनाती वाढवली, तर त्याची माहिती रिअल-टाईममध्ये मिळणे आवश्यक आहे. 'हाप्स'मुळे सीमांवरील कोणतीही हालचाल आता लपून राहणार नाही. हे शत्रूवर एक मानसिक दबावदेखील निर्माण करेल. (वृत्तसंस्था)

### येथे तयार होतोय् 'हाप्स'

**बंगळूरची 'नॅशनल एयरोस्पेस लॅबोरेटरी' येथे स्वदेशी 'हाप्स' विकसित करण्याचे काम सुरू झाले असून, प्राथमिक चाचण्या यशस्वी झाल्या आहेत. अनेक डीप-टेक स्टार्टअप्सदेखील या क्षेत्रात उतरले आहेत. यामुळे भारत भविष्यात या तंत्रज्ञानाचा मोठा निर्यातदार बनू शकतो. हाप्स' तंत्रज्ञानाचा उपयोग संरक्षणासह, इतर क्षेत्रांतही होऊ शकतो. आपत्ती व्यवस्थापन, ५जी कनेक्टिव्हिटी आणि विशेषत: शेती आणि हवामान बदलाचा अभ्यास करण्यासाठी होऊ शकतो.** ■

# आमदार केनेकरांच्या कार्यालयात एअरगन

### संभाजीनगर पोलिसांकडून तपासाला वेग

◆ **संभाजीनगर, १४ फेब्रुवारी**

छत्रपती संभाजीनगरमध्ये एक धक्कादायक प्रकार समोर आला. भाजपा आमदार संजय केनेकर यांच्या संपर्क कार्यालयात आज सकाळी एक बॅगमध्ये पिस्तुलासारखी वस्तू आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. ही बॅग शुक्रवारी सायंकाळी एक अज्ञात व्यक्ती कार्यालयात सोडून गेला होता, अशी माहिती तपासात समोर आली आहे. कुणी तरी बॅग विसरला असेल, असा समज करून कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी ती तशीच ठेवली. मात्र, सकाळपर्यंत कुणीही त्या बॅगबाबत संपर्क साधला नाही. त्यामुळे ती उघडून बघितली असता त्यात पिस्तुल आढळले. माहिती मिळताच आमदार संजय केनेकर यांनी याबाबत पोलिसांना कळविले. पोलिसांनी कार्यालयात पोहोचून बॅग ताब्यात घेतली. प्राथमिक तपासात बॅगमध्ये असलेले पिस्तुल ही एअरगन असल्याचे स्पष्ट झाले. एअरगन कार्यालयात कशी आणि केव्हा आणली गेली, याचा पोलिस तपास करत आहे. पोलिस कार्यालय परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासत असून बॅग ठेवणारा व्यक्ती कोण?, तो कुठून आला आणि कोणत्या दिशेने गेला, याचा शोध घेण्यात येत आहे.

#### घातपाताची शक्यता नाकारता येत नाही-केनेकर

या घटनेवर प्रतिक्रिया देताना आमदार संजय केनेकर म्हणाले, मी लव्ह जिहादसह अनेक हिंदूत्ववादी मुद्यांवर स्पष्ट भूमिका घेतली आहे. प्रचारसभांमध्येही कठोर टीका केली आहे. त्यामुळे या घटनेमागे घातपाताची शक्यता नाकारता येत नाही. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रोखठोक

दिनेश गुणे

# गरज, नाईलाज की अपरिहार्यता?

"तुमचे मित्र कोण, विरोधक कोण, शत्रू कोण आणि सहयोगी कोण हे ठरविणे आजच्या जगात अवघड झालेले आहे. कारण, आजकाल कोणीही कोणाचा कायमचा मित्र किंवा कायमचा शत्रू नसतो, कायमस्वरूपी मैत्री किंवा कायमस्वरूपी शत्रुत्व या संकल्पना आता कालबाह्य झाल्या असून त्यांवर विश्वासही ठेवला जात नाही, कारण मैत्री किंवा शत्रुत्व हे केवळ व्यवहारवादाशी निगडित झाले आहे. पटण्याजोगी आणि परवडण्याजोगी देवाणघेवाण शक्य असेल तरच मैत्री शक्य होते. कारण, अनिश्चितता वाढली असून प्रत्येकालाच सुरक्षितता हवी असते. जिथे सुरक्षिततेची हमी असते, तेथे मैत्री अधिक दृढ होते."

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या मित्र आणि विरोधक यावरून जी काही वादळे सुरू झालेली आहेत, ती पाहता ही विधाने याच राजकारणाशी संबंधित असावीत असाच सर्वसाधारण समज होईल. पण मैत्री आणि विरोधक किंवा शत्रू ही केवळ राजकारणाच्या व्यवहारापुरत्या मर्यादित बाबी राहिलेल्या नाहीत. आंतरराष्ट्रीय संबंधांवरदेखील त्याचाच मोठा प्रभाव दिसतो. जिथे व्यापार, पुरवठा साखळी, तंत्रज्ञानाची उपलब्धता आणि महत्त्वाच्या संसाधनांचा धोरणात्मक वापर केला जातो, तेथे हा व्यवहारवाद दिसतो. आंतरराष्ट्रीय स्तरावरील मैत्री किंवा शत्रुत्वाच्या याच लवचीक संकल्पना महाराष्ट्राच्या राजकारणातही आजकाल दिसू लागल्या आहेत. गेल्या दशकभरात महाराष्ट्रात या घडामोडी अनाकलनीयरीत्या आणि अपरिहार्यपणे घडत गेल्या. संघटित राजकीय पक्ष म्हणून ज्या पक्ष, संघटनांकडे पाहिले जात होते, त्यामध्ये उभी फूट पडली, ज्या नेत्यांकडे पक्षाची ताकद म्हणून पाहिले जात होते, ते नेते पक्षाला रामराम (किंवा जय महाराष्ट्र) करून विरोधकांच्या तंबूत दाखल झाले, तेथे त्यांना मानाचे पान मिळाले आणि ज्या मूळ पक्षातून ते बाहेर पडले, तो पक्ष दुबळा करण्याच्या विरोधकांच्या रणनीतीला बळ मिळाले.

आता काळाचे हे चक्र उलटे फिरविण्याचा आटापिटा महाराष्ट्राच्या राजकारणात सुरू झालेला दिसतो. जे पक्ष तुटले, फुटले, वेगळे झाले आणि एकमेकांचे विरोधक म्हणून समोरासमोर उभे राहिले, त्या पक्षांना पुन्हा एकत्र येण्याची गरज दिसू लागली. सध्या सर्वत्र वापरला जात असलेला विलीनीकरण हा शब्द महाराष्ट्राच्या राजकारणात या गरजेपोटी प्रभावी ठरू लागला असून या शब्दाभोवती राज्याचे राजकारण फिरताना दिसत आहे. राजकारणात अनेक घडामोडी घडत असतात. त्यामागे गरज असते, काही वेळा त्या घडामोडी ही राजकीय अपरिहार्यता असते, तर काही वेळा असे घडणे किंवा घडवून आणणे हा अस्तित्व संपुष्टात येण्याच्या भीतिपोटी निर्माण झालेला निव्वळ नाईलाज असतो. महाराष्ट्रातील सध्याच्या विलीनीकरणाच्या चर्चा आणि त्यासोबत उभे राहिलेले वाद पाहता, हे विलीनीकरण म्हणजे नेमकी कोणाची गरज, कोणती अपरिहार्यता आणि कोणाचा नाईलाज आहे, याचे उत्तर महाराष्ट्राचे राजकारण शोधते आहे. सध्याच्या घडीला ते फारसे अवघड नाही. कारण, विलीनीकरण ही कोणाची गरज आहे, याचे उत्तर त्यासाठी उतावीळ झालेल्यांची वक्तव्ये, कृती आणि विधानांतून पुरेसे स्पष्ट होत आहे. ती कोणती अपरिहार्यता आहे, हे भविष्यातील राजकीय घडामोडींवर अवलंबून आहे. आगामी काळात महाराष्ट्रात होऊ घातलेल्या राज्यसभा निवडणुका, काही जागांसाठी होऊ घातलेल्या विधान परिषदेच्या निवडणुका, अलिकडेच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचे निकाल या सर्वांचा एकत्रित आढावा घेतला, तर ती कोणाची अपरिहार्यता आहे, हेही स्पष्ट होऊ शकते आणि विलीनीकरण ही कोणत्या राजकीय पक्षाच्या नाईलाजाची बाब आहे, हे गेल्या काही महिन्यांतील राजकारणातील टाळी देणे, डोळे मारणे वगैरे कृतींवरून स्पष्ट होऊ लागले आहे.

महाराष्ट्रात शालेय शिक्षणात तिसरी भाषा म्हणून हिंदी भाषा सक्तीची करण्याच्या मुद्यावरून उफाळलेल्या भाषावादामुळे शिवसेनेचा उद्धव ठाकरे गट आणि वीस वर्षांपूर्वी शिवसेनेपासून दुरावलेल्या राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी हातमिळवणी करून हिंदीविरोधात राजकीय रण माजविण्यास सुरुवात केली, तेव्हा बाळासाहेब ठाकरे यांच्यावर पराकोटीची निष्ठा असलेल्या जुन्या शिवसैनिकांच्या सुप्त अपेक्षांना नवे धुमारे फुटले. राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व नाकारत २००६ मध्ये बाळासाहेबांच्या शिवसेनेतून बाहेर पडून महाराष्ट्र नवनिर्माण सेना नावाचा 'स्वतःचा' पक्ष स्थापन केला, तेव्हापासून या निष्ठावंतांना ऐक्याची आस लागलेली होती. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकत्र यावे अशी अपेक्षा वेगवेगळ्या वेळी व्यक्त होत होती आणि दरम्यानच्या काळात अनेकांना अनेक राजकीय प्रसंगांतून तशा स्वप्नांचे संकेतही मिळू लागले होते. एखाद्या कौटुंबिक कारणाने राज आणि उद्धव ठाकरे समोरासमोर आले, तरी ऐक्याच्या कल्पनेने ही मने मोहरून जात होती, आता दोघे भाऊ एकत्र येणार, अशा चर्चेला उधाण येत होते. हिंदी सक्तीच्या वादग्रस्त मुद्यावर राज आणि उद्धव ठाकरे एकत्र आले, तेव्हा या स्वप्नपूर्तीचा क्षण जवळ आल्याची या निष्ठावंतांची खात्री पटली आणि ठाकरे गटात उत्सव सुरू झाला. दोघे भाऊ एका मंचावर आले, त्यांनी एकमेकांच्या हातात गुंफलेले हात उंचावून निष्ठावंतांना अभिवादन वगैरे केले, आम्ही एकत्र येत आहोत, असे संकेत देणारी वक्तव्ये उद्धव ठाकरे यांच्यासह त्यांच्या गटातील अनेकांकडून सुरू झाली, 'एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठी' असे सांगत उद्धव ठाकरे यांनी ऐक्याची ग्वाही देण्यास सुरुवात केली आणि नगर पंचायती, जिल्हा परिषदांच्या निवडणुकांमध्ये एकत्र आलेल्या दोन्ही पक्षांचे पानिपत झाले आणि महापालिकेच्या निवडणुकांतही पराभवाचीच पुनरावृत्ती झाली.



एकुणातच, दोन्ही पक्षांची महाराष्ट्राच्या राजकारणातून नगण्य ठरावेत एवढी वाईट स्थिती दिसू लागली. भाषाभिमानाचे निमित्त साधून निव्वळ राजकीय अस्तित्व टिकविण्याकरिता एकमेकांच्या आधाराची गरज म्हणून एकत्र येण्याच्या आणाभाका घेणाऱ्या या पक्षांचा राजकीय अस्तित्व टिकविण्याच्या हेतूला महाराष्ट्रात फारसा प्रतिसाद मिळालाच नाही. आता या दोन्ही गटांत दोन्ही बाजूंनी पुन्हा सुरू झालेली खापर फोडण्याची स्पर्धा पाहता, ऐक्याच्या आशेने डोळे लावून बसलेल्या निष्ठावंतांची निराशा होण्याची शक्यता बळावत चालली असून नव्या उमेदीने ऐक्याची स्वप्ने पाहण्याची तयारी सुरू करावी लागणार आहे. पुढच्या काळात ही प्रक्रिया सुरू झालीच, तर त्यामागे गरज, अपरिहार्यता किंवा नाईलाज यापैकीच एखादे कारण असेल आणि ती कोणाची गरज, कोणाची अपरिहार्यता किंवा कोणाचा नाईलाज, याचे स्पष्ट उत्तर मिळालेले असेल.

शिवसेनेत फूट पडून एकनाथ शिंदे यांनी भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतल्यानंतर, पक्षचिन्ह गेले आणि खरी शिवसेना कोणाची असा वाद सुरू झाला. न्यायालयाच्या निर्णयाआधी जनतेच्या न्यायालयातच याचा फैसला होईल, असा विश्वास उद्धव ठाकरे यांना वाटत होता. नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांत, जनतेने हा फैसला दिला आहे. राज्यात सर्वत्र उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेपेक्षा एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मिळालेला जनाधार अधिक असल्याचे स्पष्ट झाल्याने, नव्या आघाडीची समीकरणे जुळविणे ही उद्धव ठाकरे यांची गरज, अपरिहार्यता आणि नाईलाजदेखील ठरू पाहत आहे. अर्थात, राज ठाकरे यांची मनसे व उद्धव ठाकरे यांची शिवसेना एकत्र येण्याची पुन्हा थंडावलेली प्रक्रिया सुरू झालीच, तरीही आगामी राज्यसभा किंवा विधान परिषदेच्या निवडणुकांत त्याचा कोणताच फायदा कोणालाही होण्याची शक्यतादेखील नसल्याने, महाविकास आघाडीची मांडलेली गाजराची पुंगी पुन्हा वाजविण्याचा प्रयत्न करणे हाच उद्धव ठाकरे यांच्यापुढील पर्याय असेल. पण सद्यःस्थितीत तेदेखील फारसे सोपे राहिलेले नाही. कारण, विधानसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडीचे अस्तित्वदेखील खिळखिळे झाले आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्रित राजकारण सुरू केल्याचे दिसताच काँग्रेसने त्यांच्यापासून अंतर राखण्यास सुरुवात केली आहे, तर शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसला आपल्याच राजकीय अस्तित्वाचा प्रश्न सतावत आहे. राज्यसभेच्या आगामी निवडणुकीत अस्तित्वाच्या मुद्याची झाकली मूठ उघडी पडण्याआधी अजित पवार गटामध्ये विलीन होण्याचा आटापिटा शरद पवार गटात सुरू झालेला दिसतो. अजित पवार यांच्या बंडानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही पक्षचिन्ह आणि मूळचा पक्ष या मुद्यांवरून सुरू झालेल्या वादात शरद पवार गटाची अवस्थादेखील ठाकरे गटाच्या शिवसेनेसारखीच झाल्याचे स्पष्ट झाले होते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शरद पवार गटाची सद्दी महाराष्ट्रातून संपत चालल्याचे चित्र स्पष्ट झाले आणि आता राज्यसभेत जाण्याकरिता पुरेसे संख्याबळ जोडण्याचीदेखील क्षमता राहिलेली नसल्याने, अजित पवार गटासोबतच्या विलीनीकरणाची चर्चा जोरात सुरू झाली आहे. हे विलीनीकरण व्हावे हीदेखील शरद पवार गटाची गरज आहे, अपरिहार्यता आहे आणि नाईलाजदेखील आहे, हे त्या गटातील नेत्यांच्या उतावळ्या राजकारणातून स्पष्ट झालेले आहे. अर्थात, विलीनीकरण ही शरद पवार गटांची गरज आहे हे स्पष्ट झाल्यामुळे, अजित पवार यांच्या पश्चात त्यांच्या पक्षातील धुरिणांकडून विलीनीकरणाचे शरद पवार गटाचे डावपेच सहज परतविण्यावरच भर राहील, असे दिसत आहे. कारण, विलीनीकरण झालेच, तर अजित पवार यांच्या गटासमोर अनेक प्रश्न उभे राहणार आहेत. पक्षाचे नेतृत्व कोणाकडे राहणार, पक्षावर नियंत्रण कोणाचे राहणार आणि मुख्य म्हणजे, अजित पवार यांच्यासोबत पक्षाबाहेर पडलेल्यांचे राजकीय महत्त्व किती राहणार हे प्रश्न मागे ठेवून विलीनीकरण शक्य नाही. शिवाय, अजित पवार यांचा गट भाजपसोबत रालोआचा घटक पक्ष म्हणून सत्तेत असल्याने, शरद पवार यांच्या गटास रालोआमध्ये यावे लागेल व त्यास भाजपची मान्यता असेल का, असाही प्रश्न आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात, युती, आघाडीचे अनेक प्रयोग याआधी झाले आहेत. पण राजकीय पक्षांच्या विलीनीकरणाचा मुद्दा बऱ्याच वर्षांनंतर चर्चेत आला आहे. दोन पक्षांचे एकमेकांत विलीनीकरण होण्याची प्रक्रिया महाराष्ट्रात अनेक वर्षांनंतर चर्चेस आली आहे. भारतातील राजकीय पक्षांचे विलीनीकरण ही प्रक्रिया स्वातंत्र्यानंतर लगेचच सुरू झाल्याचा इतिहास आहे. बहुपक्षीय लोकशाहीमध्ये विचारसरणीतील जवळीक सत्तास्थापनेची गरज, काँग्रेसविरोधी आघाडी किंवा प्रादेशिक हितसंबंध ही त्या काळातील राजकीय गरज होती. त्यामुळे, देशातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या आधी, किसान मजदूर पार्टी (आचार्य कृपलानी), सोशालिस्ट पार्टी या दोन पक्षांचे १९५२ मध्ये विलीनीकरण झाले. काँग्रेसविरोधी पर्याय उभा करण्याच्या गरजेतून व संसदीय प्रभाव वाढविण्याच्या उद्देशाने झालेले देशातील हे पहिले विलीनीकरण मानले जाते. १९६०-७० च्या दशकात काँग्रेसमध्ये फूट पडून नव्या काँग्रेस (ओ) आणि काँग्रेस (आर) असे दोन गट तयार झाले व काँग्रेस (आर) ही मुख्य काँग्रेस ठरली. इंदिरा गांधी गट आणि संघटन गट अशा दोन गटांतील नेतृत्वाचा संघर्ष आणि धोरणात्मक मतभेदातून हे दोन गट तयार झाले होते. १९७७ मध्ये भारतीय लोकदल, भारतीय जनसंघ, काँग्रेस (ओ), समाजवादी गट यांचे विलीनीकरण ही देशातील सर्वांत मोठी विलीनीकरणाची प्रक्रिया होती. आणिबाणीविरोधातील ऐक्य आणि इंदिरा गांधींच्या नेतृत्वावर आव्हान देण्यासाठी एकत्र आलेल्या या पक्षांनी आपले स्वतंत्र अस्तित्व संपवून जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला आणि देशात सत्तादेखील मिळविली. पण मतभेदांमुळे पुन्हा या पक्षाची शकले होऊ लागली. जनसंघ बाहेर पडला आणि भारतीय जनता पार्टी नावाने या पक्षाने जनसंघाच्या राजकारणाची जुनीच वाट पुन्हा धरली. १९९९ मध्ये सोनिया गांधींच्या विदेशी मुळाच्या मुद्यावर आक्षेप नोंदविल्यानंतर शरद पवार यांना काँग्रेसमधून बाहेर पडावे लागले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली, पण पुढे पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने सत्तेसाठी सातत्याने काँग्रेसचेच बोट पकडून राजकारण केले. गेल्या दहा वर्षांत पक्षफुटीच्या राजकारणास वेग आला, त्याबरोबरच लहान, प्रादेशिक पक्षांनी मोठ्या पक्षांत विलीनीकरणाचीही वाट धरलेली दिसते. ईशान्य भारतातील काही प्रादेशिक पक्षांचे भारतीय जनता पार्टीत विलीनीकरण झाले. राष्ट्रीय पक्षांसोबत गेल्यानंतर सत्तेत सहभागाची संधी सोपी होते, संसाधनांची कमतरता भरून काढता येते आणि राष्ट्रीय पक्षांच्या पाठबळावर प्रादेशिक प्रभाव वाढविता येतो, ही त्यामागची या पक्षांची गरज होती. त्यामुळे, राजकीय पक्षांचे विभाजन, विलीनीकरण ही भारतीय लोकशाहीची एक वैशिष्ट्यपूर्ण बाजू ठरली आहे. स्वातंत्र्यानंतर या देशात बहुपक्षीय प्रणाली सुरू झाली, पण त्यामध्ये विभाजन आणि विलीनीकरण हे दोन प्रवाह सातत्याने दिसून येतात. विखुरलेले गट सत्तेची गणिते मांडून एकत्र येणे, सत्ता मिळाल्यानंतर मतभेदांमुळे एकमेकांपासून दूर होणे आणि नवी सत्तासमीकरणे दिसू लागताच, गरज, अपरिहार्यता किंवा नाईलाजापोटी एकत्र येणे ही एक सातत्यपूर्ण राजकीय प्रक्रिया ठरली. महाराष्ट्रात आता याच प्रक्रियेची पुनरावृत्ती दिसत आहे. तुमचे मित्र कोण, विरोधक कोण, शत्रू कोण आणि सहयोगी कोण हे ठरविणे आजच्या जगात अवघड झालेले आहे. कारण, आजकाल कोणीही कोणाचा कायमचा मित्र किंवा कायमचा शत्रू नसतो, कायमस्वरूपी मैत्री किंवा कायमस्वरूपी शत्रुत्व या संकल्पना आता कालबाह्य झाल्या असून त्यांवर विश्वासही ठेवला जात नाही, कारण मैत्री किंवा शत्रुत्व हे केवळ व्यवहारवादाशी निगडित झाले आहे. पटण्याजोगी आणि परवडण्याजोगी देवाणघेवाण शक्य असेल तरच मैत्री शक्य होते, हे आंतरराष्ट्रीय संबंधांचे सूत्र महाराष्ट्राच्या राजकारणात तंतोतंत पाहावयास मिळते, ते त्यामुळेच!

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### समर्थ सद्गुरू श्री विष्णुदास स्वामी महाराज जयंती

**(१६ फेब्रुवारीला महाराजांची जयंती आहे, त्यानिमित्त)**

परमपूजनीय समर्थ सद्गुरू श्री विष्णुदास स्वामी महाराज श्रीदत्त अवतारी असून प्रत्यक्ष दत्तस्वरूपच आहेत. त्यांचा जन्म माघ कृष्ण द्वादशीच्या पावन पर्वावर कोकणातील पटवर्धन घराण्यात १६ फेब्रुवारी १९०१ रोजी साखळी या ग्रामी झाला. वैदिक शिक्षण इचलकरंजी येथे झाले. लौकिक अर्थाने शिक्षण नसून त्यांनी 'निसर्ग' हाच आपला गुरू मानून त्याच्या सान्निध्यात खरे पारमार्थिक ज्ञान प्राप्त केले. व्यावहारिक दृष्टीने त्यांना कलकत्ता विद्यापीठाची 'काव्यतीर्थ' पदवी प्राप्त झाली असली तरी संपूर्ण भारत भ्रमण आसेतुहिमाचल करून संपूर्ण आध्यात्मिक ज्ञान निसर्ग सान्निध्यात प्राप्त केले. वयाच्या १२ व्या वर्षी गृहत्याग करून काशी क्षेत्री आले. तेथे अयाचित वृत्तीने तपश्चर्या करीत असलेल्या प. पू. वासुदेवानंद सरस्वतीचे शिष्य प. पू. श्री प्रज्ञानंद सरस्वती यांच्याकडून २२ व्या वर्षी अनुग्रहित झाले. विष्णुदास महाराजांची संन्यास धर्म स्वीकारण्याची प्रबळ इच्छा असून गुरुआज्ञेप्रमाणे त्यांनी समाजकार्यातूनच अध्यात्म धर्माचा प्रचार केला. १९५०-५१ दरम्यान ते मथुरेला आले. त्या ठिकाणी अनेक भक्त तीर्थयात्रेसाठी आले होते. प्लेगची साथ होती. अनेक भाविक गावी निघून गेले. तेथे एका पातोळे नावाच्या आंधळ्याला सर्व मित्र-नातेवाईक एकटे सोडून गेले होते. विष्णुदास महाराजांनी त्याची व्यथा जाणली. मला विदर्भातील तेल्हारा येथील माझ्या खापरखेडा गावी सोडून द्या, अशी विनंती महाराजांना केली. महाराजांनी पायी प्रवास करून त्याला गावी सोडून दिले. त्याला सोडून महाराज जवळ असलेल्या भांबेरी गावी आले. राम मंदिरात मुक्काम केला. मंदिरात कीर्तनसेवा व प्रवचन केले. तेथून कारंजाला आले. नृसिंह सरस्वतीचे दर्शन घेऊन त्यांच्या आज्ञेने भांबेरी परिसरातच आपली कर्मभूमी आहे, याचा निर्णय घेतला. १९५२ पासून भांबेरी-गाडेगाव-तेल्हारा परिसरात राहून तेथेच 'दत्तवाडी'ची स्थापना केली.

परमार्थाची वाटचाल करताना प्रत्येक साधकाला श्रीगुरुद्वारा अनुग्रहित होणे व श्री गुरुसेवा करणे आवश्यक आहे. श्री सखाराम लोखंडकार यांनी आपला संसार त्यागून जन्मभर महाराजांची अविरत निःस्पृहपणे सेवा केली. धर्मभास्कर प. पू. सद्गुरुदास महाराजांकडून शिवकार्याच्या जोडीला पूरक असे प्रचंड 'धर्मकार्य' करवून घेतले.

प. पू. विष्णुदास महाराजांच्या शिकवणीप्रमाणे उपासकांनी चिंता सोडून सतत श्री गुरूंचे चिंतन करावे, तरच सद्गुरू आपली चिंता वाहतात. आपले आर्थिक व्यवहार पण स्वच्छ पारदर्शक असावे. सच्छील कृतीमुळे कीर्ती प्राप्त होते. गुरुकृपेमुळे अहंकाराचे रूपांतर ॐ मध्ये, बुद्धीचे बोधात, चित्ताचे चैतन्यात, लोभाचे वैराग्यात व क्रोधाचे असिम शांतीमध्ये होते. गुरुभक्तीचे पाठबळ असेल तर प्रतिष्ठा, कीर्ती, मान, सन्मान हे त्या व्यक्तीच्या मागे सहज येतात. आपल्या कृपाप्रसादाने प्रगतीची वाटचाल सुकर होईल हाच आशीर्वाद द्यावा.

॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥

**अरुण कडबे**/लाखनी

### कुटुंब प्रबोधन काळाची गरज

कुटुंब प्रबोधन ही भारतीय संस्कृती आणि संयुक्त कुटुंब पद्धतीचे जतन करणारी संकल्पना आहे. पाश्चात्त्य अनुकरणामुळे निर्माण होणाऱ्या स्वकेंद्रित मानसिकतेला दूर सारून, संस्कारक्षम आणि राष्ट्रप्रेमी समाज घडवण्यासाठी कुटुंबात संवाद, प्रेम व आदर वाढवणे हा याचा मुख्य उद्देश आहे. यात भजन, भोजन, भाषा, भूषा, आणि भ्रमण यातून नातेसंबंध दृढ करण्यावर भर दिला जातो.

आजकाल कुटुंब प्रबोधनाची आवश्यकता घराघरात दिसते. ज्या घरात शिक्षण, संस्कार आहेत अशाही कुटुंबात नात्यांमध्ये दुरावा दिसतो. असं का? हा प्रश्न सतत सतावतो. कुटुंब वर वर खूप सशक्त दिसत असलं तरी आतून मात्र पोखरलेलं असतं. हे समाजाच्या आणि राष्ट्राच्या दृष्टीने अतिशय घातक आहे. छोट्याशा रुसवे फुगवे आणि अहंची ठिणगी वणवा पेटवू शकते. कुटुंबाला एकत्र बांधून ठेवण्यात वयस्कर व्यक्तींचा खूप मोठा सहभाग असतो. पण आजकाल विभक्त कुटुंबामुळे तो सहभाग अत्यंत अल्प झाला आहे. तडजोड करण्याची सवयच राहिली नाही. दुसऱ्यासाठी काही गोष्टी सोडून द्याव्या लागतात याची जाणीव नाही. आता हा सहभाग कसा वाढवता येईल याचा विचार करावा लागेल. त्यासाठी काही नियम स्वतःहून लावून त्याचं पालन करण्याचा प्रयत्न करावा लागेल. जसे आठवड्यातून एक दिवस सर्वांनी सोबत जेवायचं किंवा भेटायचं. गप्पागोष्टींमधून काही गैरसमज असतील तर ते दूर करायचे. अनवधानाने काही चुका झाल्या असतील तर त्या दुरुस्त करायच्या, काहीही मानपान न ठेवता! एक पाऊल वीण सांधून ठेवण्याकडे !!

सोशल मीडियाच्या अतिरेकामुळे कमी झालेला कुटुंबातील संवाद पुन्हा सुरू करावा लागेल. स्वदेशी, नागरिक कर्तव्य आणि सामाजिक समरसता यासारखी मूल्ये रुजवावी लागतील. संयुक्त कुटुंबात राहिल्याने सुरक्षेची भावना वाढते आणि संकटाच्या वेळी भावनिक व आर्थिक आधार मिळतो. थोडक्यात, भारतीय संस्कृतीची मूळ तत्त्वे जपून, उद्याचा सक्षम भारतीय नागरिक घडवण्यासाठी कुटुंबाला सक्षम करणे, ही कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीची जवाबदारी आहे.

**वंदना प्रमोद देशपांडे**/९४२२४४४९७७

### शिवाची महान रात्र म्हणजेच महाशिवरात्री



महाशिवरात्री म्हणजे "शिवाची महान रात्र" हा भारतीय आध्यात्मिक संस्कृतीमधील एक महत्त्वाचा सोहळा आहे. भारतीय संस्कृतीत एके काळी वर्षभरात ३६५ सण साजरे केले जात असत. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे त्यांना वर्षातील प्रत्येक दिवस साजरा करण्यासाठी काही ना काहीतरी कारण हवे असायचे. हे ३६५ सण विविध कारणांसाठी आणि जीवनातील विविध उद्देश डोळ्यासमोर ठेवून साजरे केले जात होते. विविध ऐतिहासिक घटना, विजय किंवा जीवनातील विशिष्ट परिस्थिती. उदा. पेरणी, लावणी आणि कापणी यासाठी ते साजरे केले जात होते. प्रत्येक परिस्थितीसाठी एक उत्सव होता. परंतु महाशिवरात्रीचे महत्त्व वेगळेच आहे.

प्रत्येक चंद्र महिन्यातील १४ वा दिवस किंवा प्रतिपदेच्या आधीचा दिवस शिवरात्री म्हणून ओळखला जातो. वर्षभरात येणाऱ्या १२ शिवरात्रींपैकी फेब्रुवारी-मार्चमध्ये येणाऱ्या महाशिवरात्रीला सर्वाधिक आध्यात्मिक महत्त्व आहे. या रात्री पृथ्वीच्या उत्तर गोलार्धाची स्थिती अशाप्रकारे असते की मानवामध्ये नैसर्गिकरीत्या ऊर्जेचे एक उधाण निर्माण होते. हा असा दिवस असतो जेव्हा निसर्ग एखाद्या व्यक्तीला त्याच्या आध्यात्मिक शिखराकडे ढकलत असतो. याचाच वापर करून घेण्यासाठी या संस्कृतीमध्ये आपण एक विशिष्ट सण स्थापित केला आहे, जो रात्रभर चालतो. या नैसर्गिक ऊर्जेची वाढ होऊ देण्यासाठी, रात्रभर चालणाऱ्या या उत्सवाचा एक मूलभूत उद्देश म्हणजे आपण रात्रभर आपल्या पाठीचा कणा ताठ ठेवून संपूर्ण रात्र न झोपता जागे राहणे. जे लोक आध्यात्मिक मार्गावर आहेत, त्यांच्यासाठी महाशिवरात्र अतिशय महत्त्वाची आहे. कौटुंबिक व्यक्ती तसेच जगातील महत्त्वाकांक्षी लोकांसाठी देखील ती अतिशय महत्त्वाची आहे. कुटुंबात रममाण होणाऱ्या व्यक्ती हा दिवस शिवाच्या विवाहाचा उत्सव म्हणून साजरा करतात. जे लोक अतिशय महत्त्वाकांक्षी आहेत ते हा दिवस शिवाने त्याच्या सर्व शत्रूंवर मात करून विजय मिळविल्याचा दिवस म्हणून साजरा करतात. पण संन्यासी अर्थात योगी लोकांसाठी शिव कैलास पर्वतासोबत एकरूप झाल्याचा दिवस आहे. तो पर्वतासारखाच पूर्णपणे अचल म्हणजेच स्थिर झाला. यौगिक परंपरेत शिवाला देव म्हणून पूजले जात नाही तर त्यांना आदिगुरु म्हणजे ज्यांच्यापासून योगशास्त्राची उत्पत्ती झाली ते प्रथम गुरू असे मानले जाते. अनेक सहस्र वर्षे ध्यानावस्थेत राहिल्यानंतर एक दिवस ते पूर्णपणे निश्चल म्हणजे स्थिर बनले, तो दिवस म्हणजे महाशिवरात्री. त्यांच्या सर्व हालचाली थांबल्या आणि तो पूर्णपणे अचल झाला, म्हणून संन्यासी लोक महाशिवरात्रीला निश्चलतेची अर्थात स्थैर्याची रात्र मानतात.

महाशिवरात्रीचे आध्यात्मिक महत्त्व पौराणिक कथांव्यतिरिक्त योग परंपरेमध्ये या दिवसाला आणि रात्रीला इतके महत्त्व दिले जाते. महाशिवरात्री ही एक संधी आणि शक्यता आहे. ती विशाल शून्यता अनुभवण्याची जी प्रत्येक मानवाच्या आत आहे, जी सर्व सृष्टीचा स्रोत आहे. एकीकडे शिव संहारक म्हणून ओळखला जातो. तर दुसरीकडे तो सर्वांत कृपाळू म्हणून ओळखला जातो. तो सर्वांत श्रेष्ठ दाता म्हणूनही ओळखला जातो. योग पुराणात शिवाच्या कृपाळू स्वभावाबद्दल अनेक कथा आहेत. त्याचा कृपाळूपणा व्यक्त करण्याची पद्धत अद्भुत आणि त्याचवेळी विचित्र आहे. त्यामुळे महाशिवरात्र ही कृपा ग्रहण करण्यासाठी एक खास रात्र आहे. ही रात्र आपल्यासाठी फक्त जागरणाची रात्र नाही, तर जागृतीची रात्र होवो हीच सदिच्छा..!

**सुनील शिरपुरे**/७०५७१८५४७९

### स्थिर मती रमती नित्य प्रार्थती

सगुण-निर्गुण स्वरूपात ईश्वराशी अनुसंधान साधण्यासाठी 'प्रार्थना' हे सर्वोत्कृष्ट माध्यम होय. प्रार्थना म्हणजे नम्र निवेदन. या निवेदनातून भाविक व्यक्तिगत, कौटुंबिक, सामूहिक हित व्हावे अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. सर्व धर्म, पंथ, समुदायामध्ये प्रार्थनेला अनन्यसाधारण महत्त्व असून फक्त सनातन धर्मात सगुण रूपाची प्रार्थना केली जाते. गुण-कर्मानुसार देवता मूर्तीची संकल्पना साकार होऊन त्या देवतेशी तादात्म्य पावण्यासाठी प्रार्थना फलद्रुप होते. प्रार्थनेत ईश्वराच्या सगुण रूपाचे वर्णन, गुणगौरव व स्तुतीपर रचना समर्पित भावनेने व्यक्त होतात. उपासना फलद्रुप होण्यासाठी चित्त, बुद्धी स्थिर असावी लागते. त्यासाठी नित्य सराव, बैठक, वेळ दिल्याने मनाची चंचलता शनै-शनै कमी होत जाते आणि उपासक त्यात रमतो आणि सात्त्विक आनंद प्राप्त करून घेत असतो. उपासना ही व्यक्तिगत आणि सामूहिकसुद्धा असते. उपासनेने मानसिक बळ प्राप्त होऊन एकटेपणाची भावना नष्ट होते. मानसिक अस्वास्थ्य, भ्रम, नैराश्य आणि चंचलता कमी होऊन सकारात्मक भावना वृद्धिंगत होते. भौतिक सुखाची आसक्ती कमी होते. मती स्थिर होते, आचार-विचारात प्रगल्भता येऊन जीवन व्यापन सुखकर होते. प्रापंचिक जीवनात लालसा, प्रलोभन, कुसंगतीमुळे दुष्कर्म घडले असतील आणि त्यांचे दुष्परिणाम जाणवत असतील तर पश्चात्ताप व्यक्त करून समर्पित भावनेने प्रार्थना केल्यास, ईश्वरास नम्र निवेदन केल्यास त्याचे गांभीर्य कमी होण्यास मदत मिळते.

सनातन पद्धतीने सगुण-निर्गुण म्हणजे द्वैत-अद्वैत संकल्पनेतून मोक्ष प्राप्त करून घेण्यासाठी ज्ञान मार्ग, योग मार्ग, कर्म मार्ग आणि भक्तिमार्गाचा उपदेश केला आहे. यात संतांनी प्रापंचिक व्यक्तीस उपासनेसाठी भक्तिमार्गात सहज उपलब्ध असे नामस्मरण करून ईश्वराशी संधान साधण्यासाठी प्रार्थनेचा अवलंब करण्याचा उपदेश केला आहे. ईश्वर हा भाव ग्राह्य असल्याने निष्काम व अहंकाररहित समर्पित वृत्तीचे निवेदन स्वीकार करून क्लेशहरण होते अशी भक्तांची धारणा असून याची अनेकांना अनुभूती पण येते.

आपल्या सनातन संस्कृतीमध्ये
सर्वे भवंतु सुखीनः सर्वे संतु निरामयः
अशी वैश्विक प्रार्थना केली आहे.

या उदात्त भावनेने केलेली प्रार्थना " हे विश्वचि माझे घर"ची धारणा दृढ करते. आपल्या संस्कृतीत प्रार्थनेचे अनेक प्रकार आहेत. स्तवन, आरती, गायन, मंत्रोच्चार इत्यादी माध्यमातून सर्व शक्तिमान ईश्वरास शरण जाऊन दुःख, क्लेश, कष्ट, त्रास आणि भोग यांचे निरसन व्हावे यासाठी प्रेम रस, कारुण्य रस आणि आर्तता असेल प्रार्थना लवकर फलद्रुप होऊन मानसिक समाधान प्राप्त होते असा भाविकांचा अनुभव आहे.

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

### ग्रामीण भागात भाजपचा विस्तार, काँग्रेसची पीछेहाट

राज्यातील जिल्हा परिषदांच्या आणि पंचायत समितीच्या निकालांनी हे सिद्ध केले आहे की, भाजपने आता काँग्रेसच्या बालेकिल्ल्यात म्हणजेच ग्रामीण भागात आपली पाळेमुळे घट्ट रोवली आहेत. एकेकाळी जनसंघ ही भाजपची ओळख होती, ज्याला उच्चवर्णीयांचा पक्ष म्हणून तसेच शहरी पक्ष म्हणून म्हटले जायचे. मात्र, वसंतराव भागवत यांनी दूरदृष्टीने माधव (माळी, धनगर, वंजारी) हे समीकरण मांडले. गोपीनाथ मुंडे, पांडुरंग फुंडकर आणि ना. स. फरांदे, अण्णा डांगे यांसारख्या बहुजन नेत्यांना पक्षाच्या अग्रभागी आणल्यामुळे ओबीसी समाज मोठ्या प्रमाणावर पक्षाशी जोडला गेला. यामुळे पक्षाचा चेहरा बदलला आणि बहुजन समाजाला आपला वाटणारा पक्ष अशी भाजपची प्रतिमा तयार झाली.

उत्तमराव पाटील, रामभाऊ म्हाळगी, जगन्नाथ पाटील, अर्जुनराव वानखेडे, श्यामराव कापगते, मोतीराम लहाने यांसारख्या नेत्यांनी संसदीय राजकारणात आदर्शाची पायरी निर्माण केली. काँग्रेस हा पक्ष देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेला पक्ष होता, पण अंतर्गत गटबाजी आणि बदलत्या मतदारांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरल्याने हा पक्ष आता आकुंचन पावत आहे. याउलट, भाजपने हिंदुत्वाच्या मुद्याला विकासाची जोड दिली. ग्रामीण भागात रस्ते, पाणी आणि वीज यासारख्या मूलभूत प्रश्नांवर भर दिल्याने शेतकरी आणि ग्रामीण तरुण वर्गाचा कल भाजपच्या बाजूने झुकला. आजचा भाजप हा केवळ घोषणा देणारा पक्ष नसून तो निवडणूक जिंकणारे तंत्र बनला आहे. लक्ष्मणराव मानकर, मोतीराम लहाने यासारख्या नेत्यांनी ग्रामीण भागात कष्ट उपसले, तर आताच्या पिढीतील नेत्यांनी सूक्ष्म नियोजन करून प्रत्येक बुथ स्तरावर पक्षाला मजबूत केले. भाजपने आपल्या मूळ चौकटीबाहेर पडून स्वीकारलेली सर्वसमावेशकता हेच त्यांच्या यशाचे गमक आहे. केवळ शहरांपुरता मर्यादित असलेला हा पक्ष आज खेड्यापाड्यात पोहोचला असून, तो काँग्रेसला पर्याय न ठरता आज मुख्य प्रवाहातील सर्वांत मोठा पक्ष बनला आहे.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### 'ती'चा दिवस

८ मार्च जवळ आला की काय काय करायचं? कसा साजरा करायचा आपण वुमेन्स डे. केक पासून तर पिकनिकपर्यंत सगळे प्लॅन्स ठरले असतात साधारण शहरी महिलांचे. काही जणी तर या दिवसासाठी ड्रेस कोड पण ठरवून नवीन कपड्यांची खरेदी करतात. त्या निमित्ताने सगळे एकत्र भेटून आनंद साजरा करतात. कुठे भरगच्च कार्यक्रम ठरले असतात. शाळा, महाविद्यालये किंवा सामाजिक संस्थांमध्ये कार्यक्रम घ्यायचा म्हणजे कुणाला प्रमुख पाहुणे म्हणून बोलवायचे याची चर्चा होते. अनेक सामाजिक क्षेत्रातील महिलांचे कार्यक्रम आधीच ठरलेले असतात. एखादी प्रेरणादायी महिला आपल्या कर्तृत्वाने प्रेरित करून आपला दिवस खास करते. कामावर जाणाऱ्या महिला ठरवून त्या दिवशी खास वेष परिधान करतात. एकंदर सगळीकडे कौतुक सोहळा असतो.



परंतु त्याच बरोबर शेतात काम करणाऱ्या महिला, भाजी विकणाऱ्या, मजुरी करणाऱ्या, खडी फोडणाऱ्या महिलांना हा दिवस माहिती आहे का? बरं आपल्या घरी काम करणाऱ्या मदतनीसला आपल्यामुळे माहीत असतो पण तिनेच या दिवशी सुट्टी घेतली तर आपले वेळापत्रक बिघडणार. असो.. या अगदीच सामान्य गोष्टी. परंतु एकच दिवस का? 'ती'च्याशिवाय जगाचा व्यवहार चालू शकत नाही. त्यामुळे ती आणि त्याचे दिवस समांतर आहेत. काही गोष्टी किंवा काही प्रसंग वर्षातून एकदा आठवण म्हणून करण्याजोग्या असतात म्हणून या दिवसाचे औचित्य असते आणि ते आपण पुरेपूर पाळावे. तो आपला दिवस म्हणून आपल्या परीने प्रत्येकाने साजरा करावा.

परंतु आज आपल्याकडे एकटी स्त्री सुरक्षित आहे का? गेल्या काही दिवसांपूर्वीची पुण्याची घटना बघता तसेच दोन वर्षांपासून अनेक कल्पनेच्या पलीकडील स्त्री वरील अत्याचाराच्या घटना ऐकल्या वाचल्या की आपण प्रगती करतो आहोत की अधोगतीला जातो आहोत हा प्रश्न उपस्थित राहतो. एखाद्या संगीताच्या मैफिलीत एखादे गीत हृदयाला इतके भिडून जाते की सर्व मैफिलीवर या गीताने राज्य गाजविले असे वाटते. असे असले तरी उरलेली मैफिल नको होती का? त्या गाण्याला वाद्याची साथ करणारे जे होते ते नको होते का? सर्वांचा मिळून एक परिणाम असतो. वस्तुतः मैफिलच चांगली असावी लागते.

त्यातल्या एकाच गाण्यासाठी कुणी आले नसते. तसे या संपूर्ण सृष्टीत स्त्रीत्व ओतप्रोत भरलेले आहे. स्त्रीत्वाचे प्रतिनिधित्व करणारी स्त्री, तिचे ३६५ दिवस असायला हवेत. तिची प्रतिष्ठा, तिचा मान अपरंपार आहे. तसेच ती संपूर्ण विश्वाचा प्राण आहे. भारतीय परंपरेच्या संकल्पनेत द्वैत नसतेच. त्यामुळे अनादी काळात स्त्री आणि पुरुष यांना समान दर्जा दिलेला आहे. वीज असली पण दिवा लावला नाही तर विजेचे अस्तित्व कळणार नाही. तसेच दिवा असला पण विजेचे कनेक्शन नसेल तर दिव्याचे अस्तित्व शून्य आहे. त्यामुळे एक दिवस विजेचा आणि एक दिवस दिव्याचा असे होत नाही. वीज आणि दिवा यातून पडणाऱ्या प्रकाशाचा एक दिवस असं आपण म्हणूया. रोज स्त्रीला मान द्यावा असे जेव्हा म्हटले जाते याचा अर्थ सर्वच बाबतीत ती अग्रणी आहे. तिच्यामुळेच तयार होते घर. तिच्यामुळेच आवश्यकता असते पुरुषाला बलाढ्य होण्याची.

भारतीय परंपरेचा थोडा अभ्यास केला तर जागतिक महिला दिनाचे महत्त्व अधिक कळून येईल आणि हा दिवसच नव्हे तर सगळेच दिवस आनंदाने सार्थक केल्याचे समाधान मिळेल. आजच्या दिवशी स्त्रियांना मनाने वागविणे, भेटवस्तू देणे हा क्षणिक आनंद निर्माण करणारा सोहळा असतो तोही करावाच. पुरुषाने मनापासून स्त्रीचा अधिकार स्वीकारला, तिचे महत्त्व ओळखले आणि त्याप्रमाणे आचरणात बदल केला तर जागतिक महिला दिनाचे खरे सार्थक होईल.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## दिव्यांग नाट्य स्पर्धेत सोलापूरच्या नॅब संस्थेतील कलाकारांचे यश

**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**
महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेल्या दिव्यांग बालनाट्य स्पर्धेत सोलापूरच्या राजीव गांधी मेमोरियल स्कूल फॉर द ब्लाइंड या संस्थेच्या कलाकारांनी उत्कृष्ट यश संपादन केले आहे. या स्पर्धेत कलाकारांनी विठ्ठलास आमंत्रण हे नाटक चार पारितोषिके संपादन करत यश प्राप्त केले आहे. गेल्या पाच वर्षांपासून दिव्यांग बालनाट्य स्पर्धेत सोलापूरच्या नॅब संस्थेच्या राजीव गांधी मेमोरियल स्कूल फॉर द ब्लाइंड या संस्थेने सातत्याने यश प्राप्त केले आहे. साधारणपणे २५ कलावंत सहभागी असणारे हे नाटक रसिकांच्या पसंती उतरले. या स्पर्धेत फुलावती आगाशे यांना उत्कृष्ट लेखनाचे तृतीया पारितोषिक रेवती लिंगाणे हिला उत्कृष्ट अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्र आणि अंकिता वाघमारे हिला ही अभिनयाचे उत्कृष्ट गुणवत्ता प्रमाणपत्र तर समर्थ आगाशे याला नेपथ्याचे तृतीय पारितोषिक प्राप्त झाले. या विद्यार्थ्यांना दिग्दर्शक अश्विनी तडवळकर, नाटय प्रशिक्षक अमीर तडवळकर, शिक्षक अन्नपूर्णा साखरे मुख्याध्यापक सौरभ शिंगाडे, भैरप्पा कारभारी, रमेश पाटील यांनी मार्गदर्शन केले. या विजेत्या कलावंतांचे संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार प्रकाश यलगुलवार, संस्थेचे सचिव शशीभूषण यलगुलवार, बाल रंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा सीमा यलगुलवार यांनी अभिनंदन केले आहे.



## नेताजी प्रशालेत दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**
नीलमनगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेत दहावी विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रविशंकर कुंभार होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी, विजयकुमार हुल्ले, ज्ञानेश्वर म्हेत्रे,राजराजेश्वरी माध्यमिक प्रशालेचे मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, सेवानिवृत्त शिक्षक लक्ष्मीकांत त्रिशुले, धर्मराज बळ्ळारी, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, भाग्यश्री महाजन, ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र मुलगे, काशिनाथ माळगोंडे, बसवराज तेग्गेळी उपस्थित होते. प्रथम सरस्वती मातेच्या व विज्ञान शिक्षक कै.शिवकुमार शिरुर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी यशोदा पुजारी, अनुष्का चौगुले, आदिती घुगरे, स्नेहा दासरी, दिव्या शिंदे, श्रावणी हिप्परगी, सपना कंटली व कावेरी पगडयाल आदी विद्यार्थीनीने मनोगतातून शाळा व शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार हुल्ले, माजी मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र मुलगे आदींनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रतीक्षा हंचाटे व पूर्वा रेके यांनी केले तर सृष्टी बोरामणी यांनी आभार मानले.



**सोलापूर : पद्मराज हिराचंद कासार यांच्या एज्युकेशनसाठी जैन एज्युकेशन अँड इन्फॉर्मेशनच्या वतीने आर्थिक मदतीचा धनादेश देताना सोलापूरचे संचालक उद्योजक राहुल शहा व भारतीय जैन संघटनेचे श्याम पाटील उपस्थित होते.**



## ३० रेल्वे कर्मचारी आणि ९ विभागांना डीआरएम सोलापूर पुरस्कार

**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**
मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सिद्धेश्वर रेल्वे ऑफिसर्स क्लब ऑडिटोरियम हॉल, सोलापूर येथे ७० वा रेल्वे आठवडा २०२५ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी, सोलापूर विभागातील विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा यांनी रेल्वे कर्मचाऱ्यांच्या योगदानाची दखल घेऊन रेल्वे सेवा पुरस्कार २०२५ प्रदान केला. ३० उत्कृष्ट कर्मचाऱ्यांना व्यक्तिगत पुरस्कार आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आगारांना ९ कार्यक्षमता शिल्डचे वितरण करण्यात आले. विभागीय स्तरावर विशिष्ट रेल सेवा पुरस्कार २०२५ चे विजेते आणि ९ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या डीआरएम यांच्या स्वच्छता तपासणीतील विजेत्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी सीआरडब्ल्यूडब्ल्यूओ सोलापूरचे पदाधिकारी, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक अंशुमाली कुमार, शाखा अधिकारी, रेल्वे युनियन प्रतिनिधी आणि सोलापूर विभागातील रेल्वे कर्मचारी उपस्थित होते. रेल्वे सप्ताह साजरा करणे ही रेल्वे कर्मचाऱ्यांच्या समर्पणाची आणि कठोर परिश्रमाचा गौरव करण्याचा क्षण असल्याचे सांगण्यात आले.

# सोलापूर जनता बँकेची मोबाईल बँकिंग सेवा २ मार्चपासून


### हीरक महोत्सवी वर्षानिमित्त ग्राहकांना भेट : बँकिंग होणार आणखी सुलभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**
सोलापूर जनता सहकारी बँकेतर्फे २ मार्चपासून ग्राहकांसाठी मोबाईल बँकिंग सुविधा सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे यांनी दिली. सोलापूर जनता सहकारी बँकेच्या हीरक महोत्सवी वर्षामध्ये सुरू झालेल्या मोबाईल बँकिंग सेवेच्या रूपाने बँकेच्या ग्राहकांना हीरक महोत्सवी वर्षाची भेटच मिळाली आहे.

मोबाईल बँकेच्या पहिल्या टप्प्यात ग्राहकांना आरटीजीएस आणि एनईएफटी सारखी सुविधा देण्यात येणार आहे. तसेच ग्राहकांना त्यांच्या खात्याची सद्यस्थिती पाहता येणार आहे. त्याचबरोबर सोलापूर जनता सहकारी बँकेच्या कोणत्याही खात्यावर पैसे पाठवण्याचीही सुविधा यातून उपलब्ध होणार आहे. विशेषतः व्यापारी मंडळींसाठी अत्यावश्यक असलेली अकाउंट स्टेटमेंट मिळण्याची सोयही या मोबाईल बँकिंग सुविधेत समाविष्ट करण्यात आली आहे.

सोलापूर जनता सहकारी बँकेने मोबाईल बँकिंग सुविधा द्यावी, अशी मागणी हजारो ग्राहकांकडून अनेकदा करण्यात येत होती. त्यामुळे सर्व तांत्रिकबाबींची पूर्तता करून बँकेने ग्राहकांकरिता मोबाईल बँकिंग सुरू केले आहे. त्यामुळे व्यापारी, उद्योजक आणि इतर खातेदार, ग्राहकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. सोलापूर जनता सहकारी बँकेच्या ग्राहकांनी मोबाईल बँकिंग सुरू करण्यासाठी बँकेच्या जवळच्या शाखेत संपर्क साधावा, असे आवाहन सोलापूर जनता सहकारी बँकेचे उपाध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी यांनी केले आहे.

#### बँकेच्या प्रगतीतील मैलाचा दगड



मोबाईल बँकिंग सुविधा म्हणजे सोलापूर जनता सहकारी बँकेच्या प्रगतीतील मैलाचा दगडच ठरणार आहे. या सुविधेमुळे सहकारी बँकिंग क्षेत्रावरचा ग्राहकांचा विश्वास आणखी दृढ होण्यास मोठी मदत मिळणार आहे. या सुविधेत आगामी काळात आणखी भर घालण्यात येईल.

**- सुनील पेंडसे, अध्यक्ष, सोलापूर जनता सहकारी बँक**



## आंतरराष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेसाठी विनर्स फाउंडेशनच्या सात खेळाडूंची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**
इंडोनेशिया येथे होणाऱ्या इंटरनॅशनल स्केटिंग स्पर्धेसाठी येथील विनर्स फाउंडेशनच्या ७ खेळाडूंची आंतरराष्ट्रीय स्केटिंग स्पर्धेसाठी निवड झाली. मिशन ओलंपिक स्केटिंग गेम्स ऑफ इंडिया अधिकृत यांच्याकडून टीम इंडियाचे प्रतिनिधित्व करणार आहेत

गोवा मडगाव येथे झालेल्या मिशन ऑलिंपिक स्केटिंग गेम्स ऑफ इंडिया लूप स्पोर्ट्स व यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या राष्ट्रीय स्केटिंग चॅम्पियनशिप व इंटरनॅशनल निवड चाचणीतून त्यांची निवड झाली. त्यांना प्रशिक्षक सागर राठोड व सम्यक मोहोळकर यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व विजयी खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे, सहाय्यक जिल्हा क्रीडा अधिकारी दत्तात्रय वरकड, दयानंद महाविद्यालय सोलापूरचे प्रशासक प्रा डॉ विजयकुमार उबाळे यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.

**राष्ट्रीय कामगिरी :** ऋषिता संतोष माळवतकर (१ रौप्य, १ ब्राँझ), शर्विल संतोष माळवतकर (२ रौप्य), स्वानंदी स्वामीनाथ काळे ( १ सुवर्ण, ब्राँझ), स्वराली स्वामीनाथ काळे ( २ रौप्य), सक्षम अनिल हुच्चे (२ रौप्य), विनायक सुनील हुचे (२ ब्राँझ), लास्या नरेंद्र शेरला (१ रौप्य).

## वर्ल्ड कराटे फेडरेशनची जागतिक पंच परीक्षा मिहिर जाधव उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी -**
नुकत्याच फुजिअरा (यु ए ई) येथे वर्ल्ड कराटे फेडरेशन कडून आयोजित जागतिक पंच परीक्षेत भारताचे प्रतिनिधित्व करणारे सोलापुरचे मिहिर संगीता सुरेश जाधव हे सैद्धांतिक व प्रात्यक्षिक दोन्ही प्रकारांमधे उत्तम गुणांकनासहित उत्तीर्ण झाले आहेत.

मिहिर हे ट्रेडिशनल व स्पोर्ट्स कराटे असोसिएशनचे सचिव आणि रुद्र अकादमी ऑफ मार्शल आर्ट्स व योग संस्थेचे प्रमुख प्रशिक्षक असून वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी वर्ल्ड कराटे फ ेडरेशनची पंच परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण होणारे महाराष्ट्रातील लहान वयाचे पहिलेच अधिकृत पंच आहेत.

मिहिर यांनी संगमेश्वर कॉलेज मधून सायकॉलॉजी मधून ग्रॅज्युएशन केले असून पुण्यातील एम आय टी मधून मास्टर्स ऑफ योग व मेडीटेशन ही पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. सुयश प्रशालेतून शालेय क्रीडा कराटे स्पर्धेत राष्ट्रीय पर्यंत धडक मारली असून कलरीपयत या पारंपारिक युद्धकला व क्रीडा प्रकारात सलग तीन वर्षे राष्ट्रीय सुवर्ण पदकं पटकावली असून खेलो इंडिया साठी ज्युनिअर टीम तयार करत आहेत.





प्राचीन भारतासह इस्त्रायल, इंडोनेशिया, फिलिपिन्स, रशिया, तुर्क इत्यादि देशांमधील स्व संरक्षण तंत्रांचा अभ्यास करुन स्वतःचे जगभरातून भरभरुन प्रतिसाद लाभलेले सेल्फ डिफेन्स युट्यूब व इन्स्टग्राम चॅनल ते चालवतात. भारतीय कराटेच्या इतिहासात वीस वर्षांमधे पहिले आशीयाई पदक जिंकलेल्या वर्ल्ड टॉप हंड्रेड ॲथलिट भुवनेश्वरीचे धाकटे बंधू असून २०१८/१९ पासून अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धा, किओ नॅशनल्स, काम स्टेट सिलेक्शन, शालेय क्रीडा स्पर्धांमधून सलग सात वर्षे पंचाची कामगिरी करण्याचा अनुभव त्यांना प्राप्त आहे.

दक्षिण आफ्रिकेत झालेल्या बाराव्या कॉमनवेल्थ व मलेशिया येथील सायलेंट नाईट ओपन इंटरनॅशनल कराटे स्पर्धेत त्यांनी रुद्र अकादमीची ज्युनिअर टीम साठी कोचिंग करुन भारतासाठी ३ सुवर्ण, १ रौप्य व ७ कास्य पदके पटकावून आणली आहेत. सोलापुरात नव्या पेठेतील शिवस्मारक येथे स्पोर्ट्स कराटेचे ॲडव्हान्स तसेच बेल्ट नुसार योगाधारीत ट्रेडिशनल कराटेचे प्रशिक्षण मिहिर जाधव रोज सायंकाळी देत असून आय एम एस, एम पी एस, दमाणी प्रशाला, राज इंग्लिश मेडीयम स्कूल येथे त्यांच्या मार्गदर्शनाने प्रशिक्षण व सराव केंद्रं सुरु आहेत. वर्ल्ड कराटे फेडरेशनच्या पंच परीक्षेत उत्तीर्ण झाल्याने आता मिहिर सुरेश जाधव हे वर्ल्ड सिरीज, यूथ लीग सारख्या आंतरराष्ट्रीय गणमान्य स्पर्धांमधून पंच म्हणून उपस्थित राहतील. यास्तव कराटे इंडिया ऑर्गनायझेशनचे अध्यक्ष भरत शर्मा, महासचिव कीर्तन कोंडू, मार्गदर्शक अनुप देठे, जागतिक पंच शाहीन व प्रेम जीत सेन तसेच कराटे डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष सलाऊदीन अन्सारी व महासचिव संदीप गाडे यांनी मिहिर यांचे अभिनंदन केले आहे.





## जैन संघटनेतर्फे केंद्रीय पथकाचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**
सोलापूर व धाराशिव जिल्ह्यात पूरग्रस्ताने थैमान घातले असताना अनेक सामाजिक संघटनेने मदतीचा हात पुढे केला. यावेळी फॅमिली प्लॅनिंग असोसिएटशकडून या पूरग्रस्ताच्या ठिकाणी मेडिकल कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. त्याचा समारोप प्रसंगी आलेले केंद्रीय पथकचे भारतीय जैन संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आले.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, भारतीय जैन संघटना सोलापूर, जिल्हा परिषद आरोग्य विभाग, सोलापूर जिल्हा शल्य चिकित्सा विभाग, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, धर्मादाय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय व इंडियन रेड क्रॉस सोसायटी सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील ४८ पूरग्रस्त गावात आरोग्य शिबिराचे आयोजनाने अनेक रुग्णांना प्रजनन आरोग्य व कुटुंब नियोजनाची तपासणी करून औषधोपचार केलेले आहेत. या आरोग्य शिबिराचे तपासणी करण्यासाठी पाकणी येथे IPPF चे केंद्रीय अधिकारी डॉ. अपूर्वा रुस्तोगी, मुंबई मुख्यालयाचे अधिकारी डॉक्टर अमित किटुकुले, डॉक्टर श्रीकांत येळेगावकर, नागनाथ तेली, शक्तीसागर ढोले, फॅमिली प्लॅनिंगचे डॉ. सुगतरत्न गायकवाड उपस्थित होते. मान्यवरांचा सत्कार भारतीय जैन संघटनेचे वतीने श्याम पाटील व अभिनंदन विभूते यांनी केले.

शिबीर यशस्वी करण्यासाठी माया पाटील, प्रवीण सोळंकी, देशभूषण व्हसाळे, अशोक भालेराव, कोमल पाचोरे, प्रशांत वर्धमाने, पंकजा पंडित, निशा गांधी, मानसी शहा, वर्षा जैन, निर्मला मेहता आदींनी परिश्रम घेतले.

## ऑटो रिक्षामध्ये बेशुद्ध अवस्थेत आढळलेल्या युवकाचा मृत्यू

**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**
ऑटो रिक्षा क्रमांक एम एच १३ एन ४६८७ मध्ये एक युवक मागील सीटवर बेशुद्ध अवस्थेत बसलेला मिळून आला. उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

असिल खलील हान्नुरे वय २७ रा. १३०/१२ सिद्धेश्वर पेठ, सध्या राहणार आंबेडकर नगर मजरेवाडी सोलापूर हा दि. १४ फेब्रुवारी रोजी विणकर बगीचा मागील गेटच्या समोरील बोळात ऑटो रिक्षा क्रमांक एम एच १३ एन ४६८७ मध्ये मागील सीटवर बेशुद्ध अवस्थेत बसलेला मिळून आल्याने त्याला उपचारासाठी जेलरोड पोलीस ठाण्याचे एस आय सय्यद यांनी शासकीय रुग्णालय सोलापूर येथे दाखल केले असता त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे

## माता प्रतिष्ठान मंडळातर्फे आज लेझीम ताफ्यासह मिरवणूक

### छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ फुटी मूर्तीची होणार प्रतिष्ठापना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**
देगाव नाका, थोबडे वस्ती येथील माता प्रतिष्ठान सांस्कृतिक व क्रीडा मंडळाच्या वतीने शिवजयंती निमित्त रविवार दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी चौक येथून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १२ फूट उंचीच्या नव्या मूर्तीचा प्रतिष्ठापना सोहळा आणि भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थापक अध्यक्ष महेश मुदलियर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या निमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणूकीसाठी लेझीमचा सराव मोठ्या उत्साहात सुरु करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंडळाच्या वतीने लेझीम सरावाचे उद्घाटन करून शिवजयंती उत्सवाची सुरुवात करण्यात आली. शिवजन्मोत्सवाचे उत्सव अध्यक्ष सोमनाथ मस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत हा शुभारंभ सोहळा पार पडला. सुमारे एक हजार मावळ्यांचा लेझीम ताफा मरीआई चौकात मिरवणुकीत सहभागी होणार आहे. या मिरवणुकीत लेझीम ताफा, धनगरी ढोल, मल्लखांब, शिवकालीन मर्दानी खेळ, दांडपट्टा, तलवारी, घोडे यासह विविध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक देखावे प्रमुख आकर्षण ठरणार आहेत. १५ फेब्रुवारी रोजी मरीआई चौक येथून छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ फूट उंचीच्या नवीन मूर्तीचा आगमन सोहळा पार पडणार आहे.

शिवजन्मोत्सव २०२६ नूतन पदाधिकारी असे : सोमनाथ मस्के, गणेश भुसे, उमेश मुदलीयार, धनराज खटकाळे, प्रमोद आवताडे, उत्सव अध्यक्ष सोमनाथ मस्के, कार्याध्यक्ष : गोविंद नागणे, शुभम जाधव, उपाध्यक्ष सागर थोरात, तन्वीर मुलाणी, खजिनदार अजय सरवळे, प्रदीप धर्मसाले, सचिव : शुभम जाधव, राजू जाधव, सहसचिव स्वप्नील कोळी, अभिषेक वाघमोडे, लीगल सेल प्रमुख : ॲड. दत्तात्रय गुंड, मिरवणूक प्रमुख अरुण जाधव, हरिदास हुणचीकट्टी, नियोजन प्रमुख रोहित मस्के, निलेश मामा नलावडे, स्थापना प्रमुख प्रसिद्धी प्रमुख : चेतन घुले, अथर्व कांबळे, समर्थ डोंगरे, आनंद निंबाळकर, लेझीम प्रमुख : नागेश मस्के, रितेश मस्के, सूर्या शेट्टीयार आदी.

## बदलांना सामोरे जाण्याची तयारीच यशाची गुरुकिल्ली

### राजेश दमाणी; 'अजाईल मेथडॉलॉजी'वर राष्ट्रीय चर्चासत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**
आजच्या झपाट्याने बदलणाऱ्या तंत्रज्ञानविश्वात स्थिर राहणे म्हणजे मागे पडणे, तर बदलांना वेगाने स्वीकारणे म्हणजे यशाकडे वाटचाल असे मौलिक मार्गदर्शन उद्योगपती राजेश दमाणी यांनी दिले.





एस.ए.पी.डी. जैन पाठशाळा संचलित हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्सच्या व्यवस्थापन विभागांतर्गत बी.सी.ए. तर्फे आयोजित 'अजाईल मेथडॉलॉजी' या एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी दमाणी बोलत होते.

या चर्चासत्रात उद्योगजगत आणि शिक्षणक्षेत्र यांचा सुसंवाद साधत विद्यार्थ्यांना आधुनिक कार्यसंस्कृतीची दिशा देण्यात आली. उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले.

प्राचार्य डॉ. सत्यजित शहा यांनी स्वागतपर भाषण केले. डॉ. प्रीतम कोठारी यांनी चर्चासत्र आयोजित करण्यामागील हेतू स्पष्ट केला. प्रा. अनिता सद्दलगी यांनी मान्यवरांची ओळख करून दिली. चर्चासत्रात प्रमुख वक्ते म्हणून गजानन चौधरी (प्रोजेक्ट हेड, चीफ स्क्रम मास्टर, Coforge Ltd., पुणे) आणि सचिन अनुसे (रियालिटी सॉफ्टवेअर सोल्युशन्स, हैदराबाद) यांनी मार्गदर्शन केले.

चर्चासत्रात महाराष्ट्रासह विविध राज्यांतील २२ संशोधकांनी शोधनिबंध सादर केले. सादर शोधनिबंधांचे पुस्तिकेत रूपांतर करून त्याचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे University of Wales Trinity Saint David येथील रशिदा बानू या विद्यार्थिनीने आभासी माध्यमातून आपला संशोधनप्रबंध सादर केला, ज्यामुळे चर्चासत्राला आंतरराष्ट्रीय परिमाण लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. मंजुनाथ मनुरे, प्रा. हेमंत कोणदे, प्रा. गायत्री लिगाडे, प्रा. गायत्री बेनगिरी, भाग्यश्री गोरे, अवंतिका जेऊरे तसेच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## जाहीर नोटीस

सोलापूरातील तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डिस्टीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भागातील कसबे सोलापूर येथील जुना सर्व्हे नं. १४७/२ब/२ब१ यांसी नवीन सर्व्हे नं. १४५/२ब/२ब१ यापैकी नियोजित राजीव नगर मधील प्लॉट नं. २५३ याचे क्षेत्र १००० चौरस फुट अथवा ९२.९३ चौरस मीटर इतकी आहे. यांसी चतुः सिमा :-

पुर्वेस :-प्लॉट नं. २५४ दक्षिणेस :- सोलापूर सूत मिल
पश्चिमेस :- रस्ता उत्तरेस :- प्लॉट नं. २५१

अशा वर्णनाची वर नमूद प्लॉट जागा ही **अनिता राजशेखर नंदुरे** रा. स्वामी विवेकानंद नगर, हत्तूरे वस्ती, होटगी रोड, सोलापूर यांचे कब्जे वहिवाटीची असून सदरचा प्लॉट जागा ही त्यांनी आमचे अशील सोहेल बशिर निगेबान रा. प्लॉट नं. ११२, किसान नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर यांना कायम खुषखरेदी देण्याचे ठरवून त्यांच्याकडून इसारा रक्कम स्वीकारून लेखी इसारा पावती लिहून दिलेली आहे. सदर प्लॉट जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची व ती त्यांनी यापूर्वी कोणासही विक्री, ट्रान्सफर, गहाण, दान, टाच, लिज अथवा अन्य मार्गाने गुंतविलेली नाही अशी हमी त्यांनी आमच्या अशिलांना दिलेली आहे. तरी सदरहू मिळकतीवर जर कोणाचा मालकी हक्क, हितसंबंध, कब्जा, गहाण, दान, लिज, लिन, इजमेंट राईट कोर्टाची टाच, वित्त संस्थेचा बोजा अगर इतर बँकेचा बोजा वगैरे काही असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ (सात) दिवसाचे आत खालील दिलेल्या पत्त्यावर समक्ष भेटून आपल्या हरकती, तक्रारी, लेखी स्वरुपात नोंदवाव्यात. जर वरील मुदतीत कोणाची हिला हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख १४/०२/२०२६

**सही/-**
**जमीर अ. सत्तार शेख**
**ॲडव्होकेट**
**बी.ए., एलएल.बी.**
**घर नं. १८५, शास्त्री नगर, तालुका पोलीस स्टेशन मागे, सोलापूर**
**मो. नं.९५४५४१९५०८**






## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

**भाग - ४२**

### रनिंग बायोमेकॅनिक्स म्हणजे काय?

धावताना शरीरातील हाडे, सांधे, स्नायू आणि टेंडन्स हे सर्व एकत्रितपणे काम करत असतात. जर रनिंगची बायोमेकॅनिक्स योग्य असेल तर * ऊर्जा कमी खर्च होते * वेग वाढतो * दुखापतींचा धोका कमी होतो

**१) रनिंगचे मुख्य बायोमेकॅनिकल घटक**

**१) पोस्टचर (शरीराची ठेवण)**
* छाती उघडी ठेवावी, खांदे सैल असावेत * शरीर थोडे पुढे झुकलेले असावे (घोट्यांपासून, कंबरेतून नाही). योग्य पोस्टचर म्हणजे चांगली ऑक्सिजन घेण्याची क्षमता आणि कमी थकवा

**२) फूट स्ट्राइक (पाय जमिनीवर पडण्याची पद्धत)**
* हिल स्ट्राइक * मिड-फूट स्ट्राइक * फोरफूट स्ट्राइक बहुतेक एंड्युरन्स धावपटूंकरिता मिड- फूट स्ट्राइक ही सर्वात सुरक्षित आणि कार्यक्षम पद्धत आहे. यामुळे इम्पॅक्ट कमी होतो आणि गुडघे व घोटे सुरक्षित राहतात.

**३ ) कॅडन्स (प्रति मिनिट पावलांची संख्या)**
* आदर्श कॅडन्स : प्रति मिनिट एकशे सत्तर ते एकशे ऐंशी पावले * कमी कॅडन्स म्हणजे जास्त ओव्हर-स्ट्रायडिंग * त्यामुळे दुखापतींचा धोका वाढतो लांब रनमध्ये कॅडन्स थोडी वाढवली तर रनिंग कार्यक्षमता सुधारते

**४) ग्राउंड कॉन्टॅक्ट टाइम -** * पाय जमिनीवर किती वेळ राहतो याला ग्राउंड कॉन्टॅक्ट टाइम म्हणतात * कमी ग्राउंड कॉन्टॅक्ट टाइम म्हणजे स्प्रिंगसारखी इलास्टिक ऊर्जा चांगल्या प्रकारे वापरली जाते. प्लायोमेट्रिक्स, स्ट्राइड्स आणि हिल स्प्रिंट्स यामुळे हा घटक सुधारतो

**५) स्ट्राइड लेंथ -** * खूप लांब स्ट्राइड म्हणजे जास्त इम्पॅक्ट * नैसर्गिक स्ट्राइड आणि चांगली कॅडन्स = परफेक्ट रनिंग कॉम्बिनेशन ''लांब उडी नको, जलद पावले'' हा मंत्र लक्षात ठेवा

**६) आर्म स्विंग (हातांची हालचाल) -** * हात पुढेमागे हलवावेत, शरीराच्या मध्यरेषेला ओलांडू नयेत * कोपर साधारण सत्तर ते नव्वद अंशात वाकलेले असावेत हातांचा रिदम म्हणजेच पायांचा रिदम चुकीच्या बायोमेकॅनिक्समुळे होणाऱ्या दुखापती * रनर्स नी * आयटी बँड सिंड्रोम * शिन स्प्लिंट्स * अकिलीस टेंडन वेदना

**बायोमेकॅनिक्स सुधारण्यासाठी काय कराल?**
* ड्रिल्स (ए-स्किप, बी-स्किप, हाय नीज) * स्ट्रेंथ ट्रेनिंग (ग्लूट्स, कोअर, कॅल्फ स्नायू) * कॅडन्स ड्रिल्स * गवतावर बेअर फूट स्ट्राइड्स * व्हिडिओ गेट ॲनालिसिस (खूपच उपयुक्त) स्ट्रेंथ ट्रेनिंग, योग्य ड्रिल्स आणि शास्त्रीय प्रशिक्षण पद्धती यामुळे रनिंग बायो मेकॅनिक्स निश्चितच सुधारते. मजबूत कोअर, ग्लूट्स आणि पायांचे स्नायू हे कार्यक्षम रनिंगचे खरे आधारस्तंभ आहेत.

**निष्कर्ष -** योग्य रनिंग बायोमेकॅनिक्स म्हणजे वेग वाढवण्याचा शॉर्टकट नाही, तर दीर्घकाळ निरोगी आणि सातत्यपूर्ण धावण्याचा मार्ग आहे. धावण्याची शैली सुधारली, तर कामगिरी आपोआप सुधारते हेच डॉ. जॅक डॅनियल्स यांचे मूलभूत तत्त्व आहे.

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रामॅरेथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर.
संपर्क - ९१७५८२८२०३

# भारत पाकिस्तानच्या फिरकीला रोखणार

◆ **कोलंबो, १४ फेब्रुवारी**

क्रिकेट आणि राजकारणात पूर्वी कधीही न पाहिलेल्या गोंधळाच्या धगधगत्या आगी दरम्यान, रविवारी येथे आयसीसी टी-२० विश्वचषकातील लक्षवेधक सामन्यात भारत आणि पाकिस्तान हे दोन पारंपरिक प्रतिस्पर्धी एकमेकांशी झुंजणार आहे. पाकिस्तानवर वर्चस्व राखण्यासाठी भारताला मधल्या फळीतील स्थिरता व पूर्णपणे तंदुरुस्त अभिषेक शर्माची आवश्यकता असेल, तेव्हा भारताच्या मधल्या फळीतील खेळाडू पाकिस्तानच्या फिरकी धोक्याला नियंत्रणात आणू शकतील का? अशी उत्कंठा प्रेक्षकांच्या मनात निर्माण झाली आहे.

**अभिषेक, कुलदीप खेळणार का?**

अभिषेक शर्माला पोटाच्या दुखण्यामुळे नामिबियाविरुद्धच्या सामन्यात रुग्णालयात दाखल करावे लागले होते. जर तो उपलब्ध नसेल, तर भारताकडे संजू सॅमसनला खेळण्याचा किंवा पुन्हा तंदुरुस्त झालेल्या वॉशिंग्टन सुंदरला खेळवण्याचा पर्याय आहे. तो ईशान किशनच्या मदतीने सलामीला येऊ शकतो. आर. प्रेमादासाच्या संथ व चिकट खेळपट्टीवर वॉशिंग्टन ऑफ-स्पिन पर्याय सुद्धा देऊ शकतो. येथील खेळपट्टीच्या अशा स्वरूपामुळे व्यवस्थापन डावखुरा मनगट फिरकी गोलंदाज कुलदीप यादवला खेळवण्यास प्रवृत्त करू शकते. पण कुलदीपचा समावेश फलंदाजाच्या खर्चावर करावा लागेल आणि दुर्दैवाने तो अनुपस्थित रिंकू सिंग असू शकतो.

कुलदीपला खेळवण्याचा पर्याय सुद्धा एक मोठा आकर्षक पर्याय आहे, कारण त्याची बाबर आझमवर पकड आहे. दुबई येथे झालेल्या आशिया चषक अंतिम सामन्यात कुलदीपने ३० धावांत ४ बळी घेतले होते.

**मधल्या फळीतला गोंधळ**

भारताची मधली फळी चिंतेचा विषय आहे. आतापर्यंतच्या या आघाडीच्या स्पर्धेत झालेल्या दोन सामन्यांमधून एक सौम्य चिंता दिसून आली आहे. एका गटात विकेट गमावण्याची प्रवृत्ती आहे. भारताची मुंबई येथे अमेरिकेविरुद्ध सहा बाद ७७ अशी घसरण झाली, तर भारतीय संघाने नामिबियाविरुद्ध डेथ ओव्हर्समध्ये चार धावांत पाच गडी गमावले, परंतु २०० पेक्षा जास्त धावसंख्या रचली आणि नवी दिल्ली येथे ९३ धावांच्या मोठ्या विजयाने त्याचा परिणाम लपविला. त्या दोन्ही प्रसंगी, कर्णधार सूर्यकुमार यादव, ईशान किशन व हार्दिक पांड्या यांनी भारताला मदतीचा हात दिला. पण अशा स्पर्धा जिंकण्यासाठी वैयक्तिक प्रतिभेवर सतत अवलंबून राहण्यापेक्षा सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे.भारताचे सध्या चार गुण आहे, त्यामुळे संघ व्यवस्थापनाला त्याबद्दल जास्त काळजी वाटणार नाही, परंतु त्यांना पुन्हा एकदा बेशिस्तपणा दाखवायचा नाही.

**पाकिस्तानचा धोका**

गत वर्षीच्या हायब्रिड मॉडेलनुसार, पाकिस्तान कोलंबोमध्ये तैनात आहे व त्यामुळे त्यांना येथील खेळपट्टी व परिस्थितीची चांगली समज मिळाली आहे. आर. प्रेमदासा स्टेडियममधील खेळपट्टी वेगवान आहे व २००९ च्या विजेत्या संघात उस्मान तारिक, सैम अयुब, अबरार अहमद, शादाब खान आणि मोहम्मद नवाजसारखे पाच सक्षम फिरकी गोलंदाज आहेत.

तारिकची साईड-आर्म स्टॉप अँड पॉज ॲक्शन आधीच चर्चेचा विषय बनली आहे व अष्टपैलू भारतीय फलंदाजांशी लढणे हा या सामन्याचा एक मनोरंजक भाग असेल. गत वर्षीच्या आशिया चषकांत जसप्रीत बुमराहवर पकड मिळविणारा अजिंक्य साहिबजादा फरहान, अयुब व अष्टपैलू फहीम अश्रफ यांच्या नेतृत्वाखालील पाकिस्तानचे फलंदाज चांगली कामगिरी करू शकतात. नेदरलॅण्ड व अमेरिकेचा अनादर न करता, त्यांची अद्याप दर्जेदार गोलंदाजी विभागाकडून चाचणी घेण्यात आली नाही. बुमराहपासून ते वरुण चक्रवर्तीपर्यंत भारताने त्यांच्या क्षेत्रात सामना जिंकणारे सिद्ध केले आहे. वेगवान अष्टपैलू शिवम दुबेनेही अलिकडच्या काळात गोलंदाज म्हणून झेप घेतली आहे.

◀(वृत्तसंस्था)



सराव करताना पाकिस्तानचा उस्मान तारिक



सराव करताना भारताचे अक्षर पटेल, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, संजू सॅमसन व वरुण चक्रवर्ती

### पावसाची शक्यता?

श्रीलंकेच्या हवामानशास्त्र विभागाने बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचा बिंदू निर्माण होण्याचा इशारा दिला आहे, त्यामुळे रविवारी सायंकाळी खेतरामा परिसरात पावसाची ७० टक्के शक्यता आहे. ■

# हस्तांदोलनाचा निर्णय वेळेवर : सलमान आगा

◆ **कोलंबो, १४ फेब्रुवारी**

रविवारी येथे होणाऱ्या टी-२० विश्वचषक सामन्यापूर्वी भारतीय संघाशी हस्तांदोलनाबाबत उद्याच बघू, परंतु दोन्ही संघातील खेळाडूंनी खेळाची भावना राखावी अशी अपेक्षा पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आगाने व्यक्त केली.



भारताचा कर्णधार सूर्यकुमार यादवने गत सप्टेंबरमध्ये आशिया चषकादरम्यान दुबईमध्ये घोषणा केली होती की, गत वर्षी एप्रिलमध्ये पहलगाम दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्या भारतीय नागरिकांच्या सन्मानार्थ त्यांचा संघ पाकिस्तानशी हस्तांदोलन करणार नाही. ऑपरेशन सिंदूर दरम्यान भारतीय सैन्याशी एकता दर्शविणारा हा निर्णय म्हणूनही वर्णन करण्यात आला होता.

रविवारीही हाच नियम पाळला जाण्याची शक्यता आहे, नाणेफेकीच्या वेळी किंवा सामन्याच्या शेवटी दोन्ही कर्णधारांनी हस्तांदोलन करण्याची अपेक्षा केली नव्हती.

' ही प्रथा पाळली जाईल की नाही, हे आपण उद्या पाहू, असे आगा म्हणाला.

पाकिस्तानने सुरुवातीला बहिष्कार घातल्यानंतर खेळाभोवती तणावाचे वातावरण असताना, कर्णधार कोणत्याही वादांपासून दूर राहू इच्छित होता. दोन्ही संघांनी क्रिकेटच्या भावनेचे पालन करावे अशी त्याची इच्छा आहे. सामना खिलाडूवृत्तीनेच खेळला पाहिजे, असे आगा म्हणाला.

**तीव्र चर्चेनंतर पाकिस्तानचा बहिष्काराच्या भूमिकेतून घुमजाव**

पाकिस्तानने आपल्या बहिष्काराच्या भूमिकेतून घुमजाव करीत येथील प्रेमदासा स्टेडियमवर भारताविरुद्ध मैदानात उतरण्यास सहमती दर्शविल्यानंतर तात्पुरत्या शांततेचा हंगाम सुरू झाला आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद, बांगलादेश व श्रीलंका यांच्यात आठवड्यांपासून सुरू असलेल्या तीव्र चर्चेनंतर हे घडले.

प्रत्यक्षात, संपूर्ण दक्षिण आशिया हा सामना घडवून आणण्यासाठी चक्र फिरवत होता, कारण त्यात लाखो चाहते आणि महसूल दोन्ही आकर्षित करण्याची शक्ती आहे.

त्यामुळे, बीसीसीआयच्या निर्देशानुसार बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजूर रहमानला कोलकाता नाईट रायडर्सच्या संघातून बाहेर काढण्याच्या सूचनांमुळे सुरू झालेल्या घटनांचा एक संच सध्या थांबला आहे. दोन्ही संघांना निकाल त्यांच्या विरोधात जाऊ नये असे वाटत आहे, कारण त्यामुळे नकारात्मकतेचा उन्माद निर्माण होऊ शकतो.

◀(वृत्तसंस्था)

# वेस्ट इंडीजचे अव्वल स्थान मिळविण्याचे लक्ष्य

◆ **मुंबई, १४ फेब्रुवारी**

रविवारी वानखेडे स्टेडियमवर होणाऱ्या टी-२० विश्वचषक सामन्यात संघर्षरत नेपाळविरुद्धच्या गटात आत्मविश्वासाने भरलेला वेस्ट इंडीज आपला विजयी लय कायम ठेवण्याचा आणि गट क मध्ये अव्वल स्थानावर आपले स्थान मजबूत करण्याचा प्रयत्न करमार आहे.

वेस्ट इंडीज संघाने आतापर्यंतचे दोन्ही सामने जिंकले आहेत आणि सध्या सर्वोत्तम नेट रन रेट (१.६२५) सह गटात आघाडीवर आहे. आणखी एक विजय त्यांची शिखरावरील पकड आणखी मजबूत करेल कारण पात्रता फेरीत त्यांची गती मजबूत आहे.

कोलकाता येथे इटलीविरुद्धच्या सामन्यासह वेस्ट इंडीजला या दोन सामन्यांमध्ये सलग विजय मिळवल्याने ते गट क मध्ये अव्वल स्थान मिळेल याची कल्पना आहे.

नेपाळची आतापर्यंतची निराशाजनक मोहीम असूनही, सहयोगी देशाने काही वेळा लवचिकतेची झलक दाखवली आहे आणि ते आश्चर्यचकित होण्याची शक्यता आहे. म्हणून वेस्ट इंडीजला सावधगिरीने आत्मविश्वास संतुलित करावा लागेल, आत्मसंतुष्टता टाळावी लागेल व हाती असलेल्या कामावर लक्ष केंद्रित करावे लागेल.

गत सप्टेंबरमध्ये वेस्ट इंडीजवर टी-२० मालिकेत २-१ असा विजय मिळवणारा नेपाळ आता इटलीविरुद्धच्या पराभवानंतर मैदानात उतरत आहे आणि ते आपले सर्वोत्तम पाऊल पुढे टाकण्यास उत्सुक असतील.

वेस्ट इंडीजने या टी-२० विश्वचषकात मोठ्या प्रमाणात लक्ष वेधले आहे. वेस्ट इंडीजने स्पर्धेच्या पहिल्या दोन सामन्यात स्कॉटलंडला ३५ धावांनी हरवले व इंग्लंडला ३० धावांनी हरवले. दोन्ही प्रसंगी वेस्ट इंडीजला वेगवेगळे खेळाडू पुढे येत असल्याचे दिसून आले आहे. संघाने एकत्रपणे लढण्यास सुरुवात केली आहे हे पाहून मुख्य प्रशिक्षक डॅरेन सॅमी खूश आहे.

दुसरीकडे, नेपाळसमोर इटलीविरुद्धचा १० गड्यांनी झालेल्या दणदणीत पराभवाला विसरून विंडीजविरुद्धच्या सामन्यापूर्वी शांतता मिळवण्याचे आव्हान आहे.

२०१४ पासून नेपाळने टी-२० विश्वचषकात विजय मिळवलेला नाही. नेपाळच्या फलंदाजांमध्ये दृढनिश्चयाचा अभाव आहे. ◀(वृत्तसंस्था)



नेपाळचा कर्णधार रोहित पौडेल



वेस्ट इंडीजचा कर्णधार शाय होप

### आजचे सामने

**नेपाळ वि. वेस्ट इंडीज**
**स्थळ** : वानखेडे स्टेडियम, मुंबई
**वेळ** : सकाळी ११.०० वाजतापासून

**नामिबिया वि. अमेरिका**
**स्थळ** : एम. ए. चिदम्बरम् स्टेडियम, चेन्नई
**वेळ** : दुपारी ३.०० वाजतापासून

**भारत वि. पाकिस्तान**
**स्थळ** : आर. प्रेमदासा स्टेडियम, कोलंबो
**वेळ** : सायंकाळी ७.०० वाजतापासून

**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# आयर्लण्डचा ओमानवर शानदार विजय

## लॉर्कन टकरची नाबाद ९४ धावांची खेळी

◆ **कोलंबो, १४ फेब्रुवारी**

लॉर्कन टकरच्या नाबाद ९४ धावांच्या खेळीच्या बळावर आयर्लण्डने शनिवारी टी-२० विश्वचषक गट क मधील सामन्यात ओमानवर ९६ धावांनी विजय नोंदविला. या विजयाबरोबरच आयर्लण्डने सुपर एटच्या आशा जिवंत ठेवल्या.

ओमानने नाणेफेक जिंकून आयर्लण्डला प्रथम फंदाजीसाठी पाचारण केले. आयर्लण्डने २०२६ च्या टी-२० विश्वचषकात सर्वोच्च धावसंख्या रचली. आयर्लण्डने २० षटकांत ५ बाद २३५ धावा केल्या आणि ओमानसमोर विजयासाठी २३६ धावांचे लक्ष्य ठेवले, परंतु लक्ष्या पाठलाग करताना ओमनचा संपूर्ण संघ १८ षटकांत १३९ धावांतच गारद झाला.

जखमी पॉल स्टर्लिंगच्या जागी उभे राहिलेल्या हंगामी कर्णधार लॉर्कन टकरने ५१ चेंडूंत नाबाद ९४ धावांची खेळी केली, यात त्यानेतब्बल १० चौकार व ४ षट्कार खेचले. त्याला गॅरेथ डेलानीची उत्तम साथ मिळाली. गॅरेथने ३० चेंडूंत ३ चौकारव ४ षट्कारांच्या मदतीने ५६ धावांची अर्धशतकी खेळी केली. टकरने गॅरेथसोबत पाचव्या गड्यासाठी १०१ धावांची भागीदारी केली.

प्रत्युत्तरादाखल, ओमानचा संघ दोन षटके वगळता १३९ धावांवर गारद झाला, ४४ वर्षीय आमिर कलीमने २९ चेंडूत ५० धावा केल्या, परंतु त्याची अर्धशतकी खेळी ओमानला विजय मिळवून देण्यास पुरेशी ठरली नाही. ओमनला १३९ धावांत गुंडाळताना आयर्लण्डच्या जोश लिटलने ३ बळी, मॅथ्यू हम्फरेज, बॅरी मॅककार्थीने प्रत्येकी २ बळी, तर जॉर्ज डॉकेलने एक बळ टिपला. ◀(वृत्तसंस्था)



५१ चेंडूंत नाबाद ९४ धावांची खेळी करणारा सामनावीर लॉर्कन टकर

# इंग्लंडचा स्कॉटलंडवर ५ गड्यांनी विजय

## टॉम बँटनची नाबाद ६३ धावांची विजयी खेळी

◆ **कोलकाता, १४ फेब्रुवारी**

शनिवारी ईडन गार्डन्स स्टेडियमवर टॉम बँटनच्या नाबाद ६३ धावांच्या विजयी खेळीच्या जोरावर इंग्लंडने स्कॉटलंडवर ५ गड्यांनी विजय मिळविला. या विजयाबरोबरच इंग्लंडला टी-२० विश्वचषकात एक सामना शिल्लक असताना गट क मध्ये दुसऱ्या स्थानावर पोहोचता आले व त्यांच्या सुपर एटमधील आशा कायम आहे. दमदार फलंदाजीसह दोन झेल पकडणारा टॉम बँटन सामनावीर ठरला.

इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रुकने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आणि स्कॉटलंडला १९.४ षटकांत १५२ धावांत गुंडाळले. त्यानंतर इंग्लंडने १८.२ षटकांत ५ गडी गमावित १५५ धावा काढून आपला विजय साकार केला.

चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या टॉम बँटनने ४१ चेंडूंत ४ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने नाबाद ६३ धावा केल्या. हे चौथे टी-२० आंतरराष्ट्रीय अर्धशतक ठरले. इंग्लंडने अखेर १५३ धावांच्या आव्हानाला रोखले. सुरुवातीच्या दोन षटकांतच सलामीवीर फिल साल्ट व जोस बटलर हे ब्रँडन मॅकमुलेन आणि ब्रॅड करीच्या गोलंदाजीत लवकरच बाद झाले.

बँटनने जेकब बेथेलसोबत ६६ धावांची महत्त्वाची भागीदारी केली तसेच त्याने सॅम करनसोबत ४६ धावांची भागीदारी केली.

इंग्लंडच्या पहिल्या विजयात नेपाळप्रमाणेच, स्कॉटलंडलाही संधी गमावल्याबद्दल पश्चात्ताप होईल.स्कॉटलंडचा कर्णधार रिची बेरिंग्टनने टॉम ब्रूससोबत ७१ धावांची भागीदारी केली. बेरिंग्टनने फिरकीपटू आदिल रशीद आणि लियाम डॉसन यांच्याविरुद्ध जोरदार फटकेबाजी केली. आदिलने पायचित करण्यापूर्वी बेरिंग्टनने ३२ चेंडूंत ५ चौकार व २ षट्कारांसह ४९ धावांची खेळी केली.

स्कॉटलंडला १५२ धावांत गुंडाळताना जोफ्रा आर्चरने २४ धावांत २ बळी घेत टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ५० बळी मिळवले. आदिल रशीदने ३ बळी, लियाम डावसनने २ बळी, तर सॅम करन, जेमी ओव्हर्टनने प्रत्येकी १ बळी टिपला. ◀(वृत्तसंस्था)



४१ चेंडूंत ४ चौकार व ३ षट्कारांच्या मदतीने नाबाद ६३ धावांची खेळी करणारा टॉम बँटन

### आमिर कलीम अर्धशतक झळकावणारा वयस्कर खेळाडू

**कोलंबो** : ओमानचा सर्वात अनुभवी अष्टपैलू खेळाडू आमिर कलीमने शनिवारी येथे झालेल्या टी-२० विश्वचषकाच्या तिसऱ्या सामन्यात आयर्लण्डविरुद्ध अवघ्या २८ चेंडूत ५० धावा करत अर्धशतक ठोकणारा सर्वात वयस्कर खेळाडू होऊन इतिहासात आपले नाव कोरले आहे. ४४ वर्षे आणि ८६ दिवस वयाच्या कलीमने अवघ्या २८ चेंडूत पाच चौकार व दोन षटकार मारले. ■

# अमेरिकेचा लय कायम ठेवण्याचा निर्धार

◆ **चेन्नई, १४ फेब्रुवारी**

नेदरलॅण्डविरुद्धच्या दमदार विजयामुळे पुनरुज्जीवित झालेला अमेरिका संघ रविवारी येथे होणाऱ्या गट अ मध्ये नामिबियाविरुद्धच्या टी-२० विश्वचषक सामन्यात सुपर एटच्या आपल्या पातळ आशा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करणार आहे.

भारत व पाकिस्तानने गटात अव्वल दोन क्रमांकावर आपले स्थान मजबूत केले आहे, परंतु उर्वरित सामन्यांमध्ये आघाडीच्या संघांपैकी एकही संघ अपयशी ठरला तर अमेरिकेचा विजय त्यांना स्पर्धेत कायम ठेवेल. पहिले दोन सामने गमावल्यानंतर, अमेरिकेने नेदरलॅण्ड संघावर ९३ धावांनी विजय मिळवला. हा विजय टी-२० विश्वचषक इतिहासात सहयोगी राष्ट्र संघासाठी धावांच्या बाबतीत सर्वात मोठा विजयी फरक नोंदवला. मागील सहा स्वरूपातील पराभवांनंतर हा त्यांचा नेदरलॅण्डविरुद्धचा पहिलाच विजय होता. फलंदाजीच्या प्रयत्नांनी व शिस्तबद्ध फिरकी कामगिरीने संघाला वळण देण्याचा पाया रचला.

◀(वृत्तसंस्था)



मोनांक पटेल



गेरहार्ड इरास्मस

# जम्मू-काश्मीर, उत्तराखंडचे इतिहास घडविण्याचे लक्ष्य

● **रणजी करंडक उपांत्य फेरीचे सामने आजपासून** ● **जम्मू-काश्मीर वि. बंगाल, उत्तराखंड वि. कर्नाटक**

◆ **कोलकाता, १४ फेब्रुवारी**

पहिल्यांदाच उपांत्य फेरी गाठणारे जम्मू-काश्मीर आणि उत्तराखंड रविवारपासून सुरू होणाऱ्या रणजी करंडक उपांत्य फेरीत अनुक्रमे बंगाल आणि कर्नाटक या संघांविरुद्ध खेळताना आपल्या स्वप्नांचा विस्तार करण्याचा प्रयत्न करणार आहे.

जम्मू-काश्मीरने इंदूरमध्ये मध्य प्रदेशवर ५६ धावांनी विजय मिळवून इतिहास घडविला. १९५९-६० मध्ये पदार्पणानंतरचा हा त्यांचा स्पर्धेतील सर्वात मोठा विजय आहे. औकिब नबी हा त्या विजयाचा शिल्पकार होता. नबीने ११० धावांत १२ बळी घेतले. या हंगामात नबी ४६ बळींसह आघाडीच्या बळी टिपणाऱ्या गोलंदाजांमध्ये आहे, तर डावखुरा वेगवान गोलंदाज सुनील कुमारने २२ बळींसह भक्कम साथ दिली आहे.

फलंदाजीत अब्दुल समद (५४३), अनुभवी कर्णधार पारस डोग्रा (४८४) भरीव योगदान दिले आहे. आता त्यांना दोन्ही विभागांमध्ये सखोल कामगिरी करणाऱ्या बंगाल संघाचा सामना करावा लागत आहे.

उपांत्यपूर्व फेरीत सुदीप कुमार घरामीच्या २९९ धावांच्या शानदार खेळीमुळे बंगालने कल्याणी येथे आंध्र प्रदेशवर एक डाव आणि ९० धावांनी विजय मिळवला. घरामीने या हंगामात ६५१ धावा केल्या, तर सुमंता गुप्ता (५०६), अनुस्तुप मजुमदार (३६७) आणि अभिमन्यू ईश्वरन्ने (३७३) स्थिरता वाढवली आहे. बंगालचा गोलंदाजी विभाग तितकीच प्रभावी राहिला आहे. शाहबाज अहमद ३९ बळींसह त्याच्या संघासाठी बळी घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत आघाडीवर आहे, तर बंगालकडे मोहम्मद शमी (२८), आकाश दीप (१९) व मुकेश कुमारच्या नेतृत्वाखाली भारतीय वेगवान संघ आहे. एस. एस. जयस्वालने २० बळी घेतले आहेत. कल्याणी येथील बंगाल क्रिकेट अकादमी मैदानावर हा सामना खेळला जाणार असल्याने बंगालला घरच्या मैदानाचा फायदा होईल.

**उत्तराखंड विरुद्ध कर्नाटक**

लखनौच्या एकाना क्रिकेट स्टेडियमवर होणाऱ्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात, उत्तराखंडचा सामना आठ वेळा विजेत्या कर्नाटकशी होणार आहे.

उत्तराखंडने जमशेदपूरमध्ये झारखंडवर एक डाव व ६ धावांनी विजय मिळवून अंतिम चारमध्ये आपले स्थान निश्चित केले, तर कर्नाटकने विक्रमी ४२ वेळा रणजी करंडक जिंकणाऱ्या मुंबईवर चार गड्यांनी विजय मिळवला. उत्तराखंडसाठी, फिरकी गोलंदाज मयंक मिश्राने आठ सामन्यात शानदार कामगिरी केली, यात दुसऱ्या डावात २२ धावांत ५ बळींचा समावेश आहे. अष्टपैलू जगदीश सुचिथने डावखुरा फिरकी गोलंदाजी करत २५ बळी घेतले आणि ४१४ धावा केल्या. कर्णधार कुणाल चंडेलाने ६४ पेक्षा जास्त सरासरीने ७०९ धावा केल्या आहेत.

◀(वृत्तसंस्था)



अभिमन्यू ईश्वरन् (बंगाल)



पारस डोगरा (जम्मू-काश्मीर)



कुणाल चंडेला (उत्तराखंड)



मयंक अग्रवाल (कर्नाटक)

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# मोडनिंबच्या मंदिरात आज रुद्राभिषेक अन् भजन उत्सव

## 'ओम नमः शिवाय'चा दिवसभर असणार जप

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.१४ फेब्रुवारी-**

सोलापूर-पुणे महामार्गालगत मोडनिंब (ता.माढा) येथील मिरजेच्या पटवर्धन संस्थानच्या राजवाड्या शेजारील पुरातन श्री महालिंगेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त रविवारी ओम नमः शिवाय चा सतत जप, रूद्राभिषेक, शिव पूजा यासह भजन उत्सव होणार आहे.

याबाबत मोडनिंब गांव पुर्वी पांढरीभागात वसल्याचे सांगितले जाते,परंतु प्लेगच्या साथीत ही सर्व वस्ती पटवर्धनांच्या राजवाड्या शेजारी वसवली गेली.त्यावेळी पांढरी व परिसरात असलेला श्री.महादेवाची मुख्य पिंड मोडनिंबला आणण्याचा प्रयत्न झाला. परंतु साधारण १८ ते १९ फुट खड्डा घेऊनही पाषाण संपला नाही,तो तसा अखंड असल्याचे दिसुन आले हे खरंतर श्री.महादेवाचे स्वयंभु प्रकटीकरण समजुन तेथेच मंदिर बांधण्यात आले. परंतु तसेच मंदिर राजवाड्याशेजारीही बांधण्यात आले. हे मंदिर हेमाडपंथी असून पूर्वी या मंदिराच्या कडेने चार दिपमाळ होत्या.परंतु सन १९७० मध्ये मंदिराचा जीर्णोध्दार करण्यात आला व त्या ठिकाणी मोठा सभामंडप बांधण्यात आला. मंदिराच्या हेमाडपंथी वास्तुस हात न लावता समोरील बाजुस प्रशस्त मंडप बांधण्यात आला. परंतु या मंदिराचा लिखीत इतिहास उपलब्ध नाही. येथील गुरव समाजाकडे पूजेचा मान आहे. त्यांची चौथी पिढी आजही सेवेत आहे. श्रावणात महिनाभर अभिषेक,जप,श्री. शिवलीलामृत पोथीचे वाचन करण्यात येते. महाशिवरात्रीला नामसप्ताह आयोजित केला जातो. महाशिवरात्रीला मंदिर समितीच्या वतीने नामस्मरण, भजनसंध्या, भक्तिगीते,




भावगीते, दिवसभर फराळाचे वाटप केले जाते. महाशिवरात्रीच्या पूर्वसंध्येला आकर्षक विद्युत रोषणाई व फुलाच्या सजावटीचे कामे सुरू होती. पहाटेपासून रुद्राभिषेक, शिवपूजा, नामस्मरण, भजन-कीर्तन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांच्या दर्शनासाठी विशेष व्यवस्था केली आहे. श्री महालिंगेश्वर जागृत देवस्थान असून पिंडीमध्ये असलेल्या साळुंकीखाली सतत पाणी असते. यातले पाणी कधीही कमी होत नाही अशी धारणा आहे. आजपर्यंत तीव्र दुष्काळातही यातील ओलसरपणा कमी झाला नव्हता,प्रत्यक्ष गंगा अवतरते अशी भाविकांची श्रध्दा आहे. येथील श्री महादेव मोडनिंब, म ोहोळ, बार्शी, उपळाई, मंगळवेढा,वरवडे इ. अनेक गावातील लिंगायत समाजाचे कुलदैवत समजले जाते. हे सर्व भाविक दरवर्षी आवर्जुन पुजा,अभिषेक,दर्शनास येतात. महालिंगेश्वराची देखभाल भक्त परिवार,देवस्थान ट्रस्ट वतीने केली जाते. वर्षभर विविध उपक्रम राबविणे, भाविकांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ट्रस्ट तत्पर असते. या ठिकाणी द्वादशीला अन्नछत्र समितीमार्फत अन्नदान केले जाते. मंदिराचा सभामंडप इतर धार्मिक कामासाठी, जयंती, पुण्यतिथी उत्सवासाठी मोफत उपलब्ध करुन दिला जातो. महालिंगेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने लवकरच सभामंडपाची दुरुस्ती व गोरगरीबांच्या लग्नकार्यासाठी स्वतंत्र हॉल बांधण्याचे नियोजन आहे.

## महत्वाचे...



### मातोश्री विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

मातोश्री माध्यमिक विद्यालय म्हैसगाव येथे वार्षिक पारितोषक वितरण व इयत्ता दहावीच्या वर्गाचा शुभेच्छा समारंभ संपन्न झाला. सुरुवातीला विद्येची देवता सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून संविधानाच्या प्रास्ताविकतेचे वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. अध्यक्षस्थानी सद्संकल्प शिक्षण समूहाचे संस्थापक सचिव अण्णासाहेब भालशंकर होते. तर प्रमुख पाहुणे सुशीलादेवी भालशंकर, संस्थेचे कोषाध्यक्ष प्राचार्य बोधिप्रकाश गायकवाड, राष्ट्रसंत शाळेच्या मुख्याध्यापिका मंजुश्री खंडागळे, बागायतदार अनिल खारे, महाराष्ट्र राज्य बहुजन शिक्षक महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रा. युवराज भोसले उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक विनोद वर यांनी केले. यावेळी संविधान गौरव परीक्षेमध्ये विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या तसेच विविध स्पर्धेमध्ये व विविध उपक्रमामध्ये उज्वल यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसह सन्मानचिन्ह व प्रमाणपत्रांचे वाटप अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यालयातील विद्यार्थिनी संस्कृती वाघमारे व रिया महाजन यांनी मनोगत व्यक्त करून उपस्थितांचे मने जिंकली. सूत्रसंचालन प्रतिभा पांडव यांनी केले. आभार भारत कापरे यांनी मानले. हा कार्यक्रमयशस्वी करण्यासाठी सुशिलचंद्र भालशंकर, सहशिक्षक संजय गायकवाड, रमेश बनसोडे, माधव माने अशोक कांबळे यांनी परिश्रम घेतले.




### सोमनाग प्रशालेत दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

सोमनाग प्रशालेत दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सचिवा शारदा चौगुले उपस्थित होते. मुख्याध्यापक शहाजी नीळ यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. श्रीवेनी कुचन या विद्यार्थिनीला प्रशालेतील स्टुडन्ट ऑफ द इयर या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी संस्था सदस्य शंकर चौगुले व रेणुका बुधाराम, शाळेचे संस्था सदस्य नागराज चौगुले, गुर्रम, रमा हिबारे, मोरे उपस्थित होते. सूत्रसंचलन नववी वर्गातील विद्यार्थिनी अलेक्या कोंडुर, मीनाक्षी गायकवाड केले तर आभार मेघा कुरापाटीने यांन मानले.



### व्हि-एक्सल ट्रस्टच्या दिव्यांग जागरुकता कार्यशाळेत शिक्षकांचा सहभाग

**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

येथील व्हि-एक्सल एज्युकेशनल ट्रस्ट सेंटरतर्फे विजापूर रोड येथील इंदिरा सभागृहात दि. १४ फेब्रुवारीला सोलापूरातील शिक्षकांसाठी दिव्यांग जागरूकता मार्गदर्शन झाले. वालचंद म हाविद्यालयाच्या समाजकार्य विभागाचे सहकार्य लाभले. शिक्षकांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांविषयी संवेदनशीलता निर्माण करणे तसेच त्यांच्या शिक्षणातील अडचणी समजून प्रभावी अध्यापन पद्धतींचे मार्गदर्शन करणे हा मुख्य उद्देश होता. प्रमुख पाहुण्या म्हणून वालचंद महाविद्यालयाच्या समाजकार्य विभाग प्रमुख डॉ. विजया महाजन उपस्थित होत्या. विविध विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. सेंटरच्या प्रमुखा सुनीता वैद्य यांनी लर्निंग डिस्याब्लीटी, अश्विनी अंधारे यांनी ऑटिझम, स्मिता गायकवाड यांनी सायकॉलॉजीकल असिसमेंट, तर डॉ. राधिका होनप यांनी थेऱ्यापिटिकल इंटरव्हेन्शन या विषयांवर माहिती दिली. शिक्षकांनी प्रश्नोत्तराच्या सत्रात सहभाग घेत प्रश्नांचे निरसन करून घेतले. श्रद्धा गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. सोलापूरातील ३० शिक्षकांनी सहभाग घेतला. सुनीता वैद्य यांनी प्रस्तावना केली. सूत्रसंचालन सुशांत कुलकर्णी यांनी केले. अश्विनी चिमलगी यांनी आभार मानले. सेंटरच्या सर्व शिक्षिका आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### शोभा पुठ्ठा



**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

सोलापूर येथील रामव्वाबाई रामय्या बुर्ला शाळेच्या माजी शिक्षिका शोभा दयानंद पुठ्ठा (वय ६३) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे. शनिवारी त्यांच्यावर पद्मशाली स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

### श्रीकांत माईणकर



**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

येथील होटगी रोडवरील व्यंकटेश नगरातील रहिवाशी श्रीकांत सिताराम माईणकर (वय-९३) यांचे नुकतेच वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून आणि दोन नातवंडे असा परिवार आहे.

# पुण्याच्या कंपनीत काम करणारा झाला पंचायत समिती सदस्य

## तालुक्यात चर्चेचा विषय

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. १४ फेब्रुवारी**



पुण्यात एका प्रायव्हेट कंपनीत काम करणारे मिरजगी (ता.अक्कलकोट) येथील भीमा सोलापूरे यांनी पंचायत समिती सदस्य होण्याची किमया केली आहे.

शिवसेना-शिंदे गटाकडून त्यांना सलगर पंचायत समिती गणातून उमेदवारी होती. त्यांनी प्रतिस्पर्धी भाजपा चे उमेदवार सलगरचे शिवराज बिराजदार यांचा १५१ मतांनी पराभव केला. भीमा सोलापूरे हे पुण्यात प्राव्हेट कंपनीत काम करीत असून नवखा असतानाही स्वतःच्या मिरजगी गावात ४५० तर बोरी उमरगे गावातून १२३ मताची आघाडी त्यांनी घेतली आहे. पुण्यात एका प्राव्हेट कंपनीत काम करणारा मुलगा अक्कलकोट पंचायत समिती सदस्य झाल्याने परिसरात कौतुक होत आहे

त्यांच्या विजयासाठी माजी उपसरपंच सिद्धाराम निंबाळ, हावण्णा निंबाळ, सरपंच महादेव निंबाळ, दौलप्पा निंबाळ, राजु जमादार, कर्ण निंबाळ, सुरेश निंबाळ, चंद्रु निंबाळ, सतिश जाधव, विश्वनाथ लोंढे यांच्यासह त्यांचे सर्व मित्र मंडळींनी परिश्रम घेतले. कंपनीत काम करतानाही त्यांची गावाकडील कामात लक्ष असायचे. त्यातूनच त्यांना शिवसेना शिंदे गटाने सलगर पंचायत समिती गणात उमेदवारी दिली. सर्वत्र भाजपाची लाट असतानाही त्यांचा विजय विशे, मानला जात आहे.

## नवी पेठ येथे महिलेबरोबर धक्काबुक्की

**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी**

नवी पेठ येथील एका इलेक्ट्रॉनिक्सच्या दुकानांत पैसे देणे घेण्याच्या कारणावरून म हिलेला दोन तरुणांनी धक्काबुक्की केल्याची घटना दि.१४ फेब्रुवारी रोजी घडली.

याबाबत अधिक माहिती अशी की, पूजा नागेश मुलगे (वय-३२) (रा. बुधवार पेठ सोलापूर) या नवी पेठ येथील दर्बी क्लॉथ सेंटरच्या समोरील मॉडर्न इलेक्ट्रॉनिक्स दुकानांत पैसे देणे घेण्याच्या कारणावरून वैभव हबीब व इतर एका तरुणाने धक्काबुक्की केल्याने त्यामध्ये डाव्या हातास काच लागल्याने जखमी झाल्या. उपचारासाठी पती नागेश यांनी शासकीय रुग्णालय येथे दाखल केले अशी नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

# उच्च ध्येयासाठी स्थिर मन अन् धाडस महत्वाचे : ॲड. गजानन भाकरे

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१४ फेब्रुवारी -**



जीवनात ध्येय गाठताना जिद्द, चिकाटी व सातत्य याबरोबर स्थिर मन आणि धाडस असेल तर मोठे ध्येय गाठता येते. तसेच ध्येय मोठी ठेवा आणि ती सत्यात उतरवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करा असा अनमोल सल्ला ॲड. गजानन भाकरे यांनी दिला.

सांगोला तालुक्यातील कोळा विद्यामंदिर हायस्कूल व ज्यु.कॉलेजमध्ये इ.१० वीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभात ते बोलत होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजन ॲड.भाकरे यांच्या हस्ते झाले. प्राचार्य श्रीकांत लांडगे व पर्यवेक्षक चारुदत्त जगताप यावेली उपस्थित होते. याप्रसंगी प्रणाली आलदर, सृष्टी देशमुख, गौरी देशमुख, जुनेरा तांबोळी, प्रियांका कोळेकर, तन्मय देशमुख, शंकर चौधरी या विद्यार्थ्यांनी मनोगतातून शिक्षकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी चारुदत्त जगताप यांनी विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेला सामोरे कसे जावे व चांगले यश कसे प्राप्त करावे याबाबत मार्गदर्शन केले. श्रीकांत लांडगे यांनी कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांनी ग्रामीण भागात शाळा सुरू केली त्यामुळे आज विद्यार्थी शिकत आहेत असे सांगत विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक प्रभुलिंग तेली, सूत्रसंचालन मारुती सरगर यांनी केले. आभार किरण ढोले यांनी मानले.

# परिक्षेसाठी वेळेचे नियोजन करा : केसरे

## दिलीपराव सोपल प्रशालेत दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१४ फेब्रुवारी-**

परिक्षेला सामोरे जाताना वेळेचे नियोजन करुन यशप्राप्ती करा. परिस्थितीची ज्यांना जाणीव असते ते जीवनात यशस्वी होतात. परंतु त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा असे आवाहन प्रमुख मार्गदर्शक विजय केसरे यांनी केले.

येथील दिलीपराव सोपल प्रशालेत शुक्रवारी दि.१३ फेब्रुवारी रोजी १० वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम झाला. यावेळी 'परीक्षेला सामोरे जाताना' या विषयावर माजी विद्यार्थी व संस्कार क्लासेसचे संचालक श्री. केसरे यांचे व्याख्यान झाले. विविध दाखले देऊन शिक्षण आयुष्यासाठी किती महत्वाचे आहे हे आपल्या मार्गदर्शनपर वक्तव्यातून समजावून दिले. परीक्षेसाठी सर्व मुलांना शुभेच्छा देत महत्वाच्या टिप्स सांगितल्या. यावेळी मुख्याध्यापक श्रीकांत कुंभारे, मुख्या. सचिन काळे, युवराज जगताप, संतोष ठोंबरे, शितल पाटील उपस्थित होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने कार्यक्रम सुरू झाला.



इयत्ता १० वी मधील विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षक संतोष ठोंबरे, सौ. शितल पाटील यांनीही संवाद साधला. शिक्षक युवराज जगताप यांनी यशस्वी जीवनासाठी अंगी कोणकोणत्या बाबी असाव्या, चांगल्या मित्रांची निवड, कामात सातत्य, चारित्र्य ध्येय निश्चिती, व्यसनापासून दुरावा, स्वावलंबन, मोबाईल वापर यासंबंधी विस्तृत मार्गदशन केले. दिनेश घुले मित्रमंडळाकडून युवराज जगताप यांना शंभू राजांची प्रतिमा भेट दिली. दिनेश घुले यांनी सूत्रसंचालन केले. कु.अंजली काळे हिने आभार मानले. राहुल ठोंगे, चंद्रकांत लोखंडे, संगीता काळे, श्रीकांत कुंभारे, सुनिल लंगोटे, मंगेश मोरे, प्रेरणा कसबे, सेवक संदीप भोरे, श्रीकांत चव्हाण उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानावर आधारित कौशल्याधिष्ठित शिक्षण घ्यावे : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. १४ फेब्रुवारी -**

शिक्षण, उद्योग, आरोग्य व शेती क्षेत्रांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणासोबतच तंत्रज्ञानावर आधारित कौशल्याधिष्ठित शिक्षणावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. तरच भविष्यकाल उज्वल होईल असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी केले.

सुरेखा कल्याणशेट्टी विद्यालयातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर जूनियर विभाग प्रमुख पूनम कोकळगी, सेमी इंग्लिश विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, पर्यवेक्षक सुर्यकांत रुगे उपस्थित होते. प्रास्ताविक वैष्णवी डोंमनाळे यांनी केले. सूत्रसंचलन सौंदर्या खांडेकर यांनी केले तर आभार वैष्णवी टपाले यांनी मानले यशस्वीतेसाठी कल्पना स्वामी, सागर मठदेवरू, मनीषा सुरवसे, रविकिरण दंतकाळे यांनी प्रयत्न केले.

निरोप समारंभाच्या कार्यक्रमात अदिती बाणेगाव, मयुरी साळुंके, आरती सावळे, लक्ष्मी भुशेट्टी, विनिता बिराजदार, सृष्टी गवारे या विद्यार्थ्यांनी आपल्याला घडविले म्हणून आयुष्यभर शाळेचे ऋण आम्ही फेडू शकणार नाही असे आपल्या भाषणातून सांगितले.

# संघाचा गुरु - भगवा ध्वज

**मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाग -२१**

**- डॉ. सचिन लादे, पंढरपूर**
**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख रा.स्व.संघ.**
**मो.क्र.७५८८२१६५२६**

**सामान्यतः गुरु म्हटले, की देहधारी गुरु आपल्यासमोर येतो. कोणत्याही संघटनेची स्थापना ज्या सन्माननीय व्यक्तींनी केली, त्या व्यक्तीलाच गुरुपद देण्याचा प्रकार अनेकदा घडतो अथवा ती संघटना वाढविण्यासाठी ज्यांनी कष्ट घेतले त्यांना गुरु म्हणून त्या संस्थेतील त्यांचे अनुयायी स्वीकारतात. परंतु राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या गोष्टीला अपवाद आहे.**

---

संघाची स्थापना झाल्यानंतर येथील धर्म, संस्कृती, परंपरा, लोकांच्या श्रद्धा, विश्वास या गोष्टींचा विचार करून वर्षभरात करावयाचे सहा उत्सव योजनापूर्वक ठरविण्यात आले. यापैकी एक उत्सव म्हणजे गुरुपूजन उत्सव. आषाढ पौर्णिमेच्या दिवशी संघ स्थानावर गुरुपूजनाचा उत्सव केला जातो. संघाच्या स्थापनेनंतर ३ जुलै १९२८ मध्ये पहिल्या गुरुपूजन उत्सवाची घोषणा करण्यात आली. त्यावेळी सर्व स्वयंसेवकांना डॉ.हेडगेवार हेच आपले गुरु आहेत व त्यांचेच आता संघ स्थानावर आपण पूजन करायला हवे असे वाटत होते. डॉ.हेडगेवार यांनी आपले गुरु कोण असतील याबाबतची वाच्यता केली नव्हती. परंतु पहिल्या गुरुपूजनाचा दिवस उजाडला व नागपूरच्या संघस्थानावर डॉ.हेडगेवार यांनी भगवा ध्वज हा आपला गुरु असल्याचे व त्याचे आपण पूजन करणार असल्याचे सांगितले. सर्व स्वयंसेवकांच्या चेहऱ्यावरील प्रश्नार्थक भाव लक्षात घेऊन डॉ.हेडगेवार यांनी भगवा ध्वज हा संघाचा गुरु का असेल? याबाबत त्या दिवशीच्या बौद्धिकातून स्पष्टीकरण दिले.

हिंदू धर्म हा प्राचीन व सनातन आहे, हिंदू धर्माएवढाच भगवा ध्वज देखील प्राचीन व सनातन आहे. रामसेना भगवा ध्वज घेऊन रावणाविरुद्ध लढली तर महाभारतातील धर्मयुद्धाच्या प्रसंगी हाच भगवा ध्वज पांडवांच्या रथावर डौलाने फडकत होता व धर्मयुद्धासाठी प्रेरणा देत होता. मुळात भगवा रंग हा पहाटे सूर्य उगवत असतानाचा आहे, म्हणजेच तो सूर्याच्या जन्माचा रंग आहे. सूर्य हा अब्जावधी वर्षांपासून सातत्याने आपले कर्म करत आला आहे. न थकता न थांबता या जीवसृष्टीला जीवन देण्याचे काम सूर्य करत आहे. सूर्याचे हे सतत काम करत राहणे म्हणजेच त्याचे हे तप आहे. सूर्य हा कोणताही भेदभाव न करता सर्वांना समत्वभावाने मदत करतो व अखंडितपणे समर्पण करतो याचाच अर्थ त्याच्या एवढा त्याग कोणीही केलेला नसेल, सूर्याएवढे तेज तर आपल्या सूर्यमालेत कोणाचेच नाही. याचाच अर्थ सूर्य हा त्याग, तेज व तप याचे प्रतीक आहे. असा त्याग स्वयंसेवकांनी सातत्याने करावा, सूर्याची प्रेरणा घेऊन आपल्या कार्यामध्ये सातत्य ठेवून देशभक्तीचे तप करावे व आपल्या कार्याने प्रत्येक स्वयंसेवकाने तेजस्वी बनावे यासाठी सूर्याच्या जन्माचा रंग असणारा हा भगवा ध्वज स्वयंसेवकांचा गुरु असला पाहिजे हे डॉ.हेडगेवार यांनी स्पष्ट केले व अत्यंत उदात्त भावनेने भगव्या ध्वजाला संघाचा गुरु म्हणून घोषित केले.

हिंदू धर्म व संस्कृती ही सनातन व प्राचीन आहे, अशा धर्म - संस्कृतीमध्ये प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडामध्ये अनेक - अनेक राजसत्तांनी, धर्मसत्तांनी भगवा ध्वजाच्या प्रेरणेनेच कार्य केले आहे. मध्ययुगीन कालखंडात हिंदू धम र्ला सावरण्याचे काम करणाऱ्या वैष्णव पंथातील सर्वच संतांनी भगवी पताका खांद्यावर घेऊनच धर्म रक्षणाचे काम केले आहे. आजही वारकरी संप्रदाय हीच भगवी पताका घेऊन पंढरपूरची वारी करताना दिसून येतो. भगवा रंग हा कायमच या भूमीतील प्रत्येकाला प्रेरणा देण्याचे काम करत आला आहे, याची डॉ.हेडगेवार यांना जाणीव होती. या भगव्या ध्वजाला गुरुस्थानी ठेवण्यामागचे डॉ.हेडगेवार यांचे चिंतन होते व या चिंतनाला इतिहासाची जोड होती. हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांनी भगव्या ध्वजाच्या साक्षीने अनेक लढाया जिंकल्या, रणांगणावर मावळे भगव्या ध्वजाच्या प्रेरणेने लढत राहिले. असा हा भगवा ध्वज हिंदू धर्मातील अनेक उपासना पद्धतीच्या लोकांना पवित्र आहे, अशा या पवित्र भगव्या ध्वजापासून स्वयंसेवकांना सतत प्रेरणा मिळत राहणार आहे याची डॉक्टरांना खात्री होती म्हणूनच त्यांनी स्वतःला गुरु म्हणून पुढे न करता भगव्या ध्वजाला संघाचा गुरु म्हणून त्या दिवशीच्या बौद्धिकातून घोषित केले व गेल्या १०० वर्षांपासून भगवा ध्वज हा संघाचा गुरु म्हणून त्याचे संघस्थानावर गुरुपौर्णिमेच्या दिवशी पूजन केले जाते व रोज देखील त्याला प्रणाम करूनच प्रार्थना म्हटली जाते.

भगवा ध्वज गुरु मानून स्वयंसेवक या ध्वजाला केवळ प्रणाम करत नाहीत तर भगव्या ध्वजाकडूनच समर्पणाची प्रेरणा घेऊन आपल्या वेळेचे व धनाची देखील ते समर्पण करताना दिसून येतात. खऱ्या अर्थाने तन-मन-धनपूर्वक समर्पण करण्याची प्रेरणा स्वयंसेवक भगव्या ध्वजापासून घेतात. आपल्या संस्कृतीमध्ये गुरु - शिष्य परंपरेला खूप महत्त्व आहे. गुरुपौर्णिमेच्या दिवशी आपल्या गुरूला वंदन करून समर्पण करण्याची परंपरा आहे, ही परंपरा स्वयंसेवक गेली शंभर वर्षे पाळत आलेले आहेत. आषाढ पौर्णिमा अर्थात गुरुपौर्णिमेच्या दिवशी भगव्या ध्वजाला गुरु मानून त्याचे पूजन केले जाते व स्वयंसेवक गुरुदक्षिणा म्हणून भगव्या ध्वजासमोर निधी समर्पित करतात.

देणगी अथवा दानाच्या रूपामध्ये हा निधी न देता समर्पित भावनेने तो निधी संघ कार्यासाठी स्वयंसेवक देत आलेले आहेत व आजही देत आहेत. या निधीवरच संघाचे वर्षभर काम चालते. समाजाकडून, सरकारकडून अथवा इतर कोणत्याही माध्यमातून संघकाम चालविण्यासाठी संघ देणगीच्या रूपात निधी जमा करत नाही. संघ हा स्वयंसेवकांचा ही भावना स्वयंसेवकांमध्ये असल्यामुळे स्वयंसेवक स्वतःहून गुरुच्या पूजनाबरोबरच निधीचे समर्पण करतात व यातून संघाचे वर्षभर कार्य चालते. याचाच अर्थ संघ स्वयंसेवक प्रतिकात्मक रुपात भगव्या ध्वजाला गुरु मानत नाहीत तर मनोभावे गुरु मानून त्याचे पूजन करतात व आपल्या सर्वस्वाचे समर्पण देखील करतात. अशा लाखो स्वयंसेवकांच्या कार्यामुळे गेल्या शंभर वर्षांत संघ विस्तारला आहे व देश व समाजाचीदेखील सेवाच घडली आहे.

# दोन दिवसाआड पाणीपुरवठ्याचे नियोजन करा : महापौर कोंड्याल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

शहराला दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात यावा. रात्री-अपरात्री पाणीपुरवठा केला जाऊ नये यासंदर्भात तातडीने नियोजन करावे, असे आदेश महापौर विनायक कोंड्याल यांनी महापालिका आयुक्तांसह संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. दरम्यान, पाणीपुरवठा विभागातील अधिकारी आणि तज्ज्ञ निवृत्त अधिकाऱ्यांची लवकरच बैठक बोलाविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.





सोलापूर शहराला सध्या तीन ते पाच दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. शहराच्या हद्दवाढ भागात पाच दिवसाआड तर काही ठिकाणी अधिक दिवसाने पाणीपुरवठा होतो. हद्दवाढसह शहरातील काही भागात रात्री-अपरात्री पाणीपुरवठा केला जात असल्याने नोकरी, रोजगार आणि इतर गोष्टींवर परिणाम होत आहे. ही बाब लक्षात घेता महापौर कोंड्याल यांनी दोन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा निश्चय केला आहे. यासंदर्भात पाणीपुरवठा विभागातील निवृत्त अधिकाऱ्यांशीही चर्चा करण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांना तसा आदेश दिले आहेत. पाणीपुरवठ्याचे लवकरच नवे वेळापत्रक तयार करण्यात येणार असल्याचे दिसून येत आहे.

**सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची घेणार मदत**

सोलापूर शहराला दोन दिवसाआड पाणीपुरवठा झाला पाहिजे. पाणीपुरवठा सुरळीत आणि आवश्यक त्या दाबाने केला जावा. नागरिकांची गैरसोय टाळावी. यासाठी महापालिका पाणीपुरवठा अधिकारी तसेच यासंबंधीत निवृत्त अनुभवी व तज्ज्ञ अधिकाऱ्यांशी चर्चा केली आहे. यासंदर्भात सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची मदत घेतली जाणार आहे, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी सांगितले.

# जिल्ह्यातील सात पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**



पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सात पोलिस अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय सोयीसाठी बदल्या केल्या. त्यात मोहोळ, मंद्रुप, कामती, वेळापूर, माढा, नातेपुते पोलिस ठाण्यांचा समावेश आहे.

मोहोळ पोलिस ठाण्याचे प्रभारी हेमंत शेडगे यांची पुणे ग्रामीणमध्ये बदली झाली आहे. मोहोळ पोलिस ठाण्याची जबाबदारी ग्रामीण पोलिसांच्या मानव संसाधन शाखेचे बाजीराव पोवार यांच्यावर सोपविण्यात आली आहे. कामती पोलिस ठाण्याचे प्रभारी ज्ञानेश्वर उदार यांची बदली पुणे ग्रामीणमध्ये करण्यात आली. त्याठिकाणी सहायक पोलिस निरीक्षक बसवेश्वर जकिकोरे यांची नियुक्ती करण्यात आली. मंद्रुप पोलिस ठाण्याचा पदभार पहिल्यांदाच पोलिस निरीक्षकांकडे देण्यात आला. या पोलिस ठाण्याचा पदभार मंदिर सुरक्षा येथील शंकर पटवारी यांच्याकडे असणार आहे. पंढरपूर शहर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक आशिष कांबळे यांच्याकडे वेळापूर पोलिस ठाण्याचा पदभार सोपविण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक विशाल वायकर यांच्याकडे नातेपुते, करमाळा पोलिस ठाण्याचे सहा. पोलिस निरीक्षक रोहित शिंदे यांच्याकडे माढाचा पदभार दिला आहे.वेळापूर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक भाऊसाहेब गोसावी यांची बदली स्थानिक गुन्हे शाखेकडे करण्यात आली.



**सोलापूर : शिवजन्मोत्सव निमित्त शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज मध्यवर्ती मंडळ डाळिंबे अळी येथे विद्युत रोषणाई करण्यात आली.**

# जीएसटी, आयकर सल्लागारांच्या कार्यशाळेत 'एआय'च्या वापराविषयी साधकबाधक चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

गुड्स अॅन्ड सर्व्हिस टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन महाराष्ट्र, महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन पुणे आणि सोलापूर टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या कार्यशाळेत 'एआय'च्या वापराविषयी साधकबाधक चर्चा करण्यात आली.



प्रारंभी गुड्स अॅन्ड सर्व्हिस टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन महाराष्ट्राचे अध्यक्ष अॅड.पार्थ बधेका, महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन पुणेचे अध्यक्ष अॅड.अनुरुद्र चव्हाण यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करण्यात आले. व्यासपीठावर सोलापूर टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष अॅड.कमलेश नागर, शशांक धोंड, मनोज चिखलीकर, आदित्य सुरते, परीक्षित औरंगाबादकर, राजेश बद्दू उपस्थित होते. गुड्स अॅन्ड टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष अॅड.पार्थ बधेका याप्रसंगी बोलताना म्हणाले, जीएसटी तसेच इतर करांविषयी सविस्तर माहिती मिळण्यासाठी अशा कार्यशाळांची मोठी मदत होते. परीक्षित औरंगाबादकर म्हणाले, नव्याने विकसित झालेले सॉफ्टवेअर वापरावेत. त्यामुळे कामातील अचूकता वाढण्यास उपयोग होणार आहे. तसेच वेळेचीही बचत होणार आहे.

जीएसटी नोटीसीला उत्तरे कशी द्यावीत, अपीलात बाजू कशी मांडावी? याबाबत आदित्य सुरते यांनी तर अर्थसंकल्पात आयकरात सुचवलेले बदल आणि नव्याने येणारा आयकर कायदा याबाबत संजय व्हनभट्टे यांनी मार्गदर्शन केले. अॅड.कमलेश नागर यांनी प्रास्ताविक केले. अॅड.विनायक नगरकर, अॅड.बालसिंग श्रीचिप्पा, अॅड. उज्ज्वल सामलेटी यांनी सूत्रसंचालन केले. अॅड.राजेश बद्दू यांनी आभार मानले.

याप्रसंगी अॅड.अक्षय अंदोरे, अॅड.व्यंकटेश दारना, अॅड.रुद्रमणी हिरेमठ, अॅड.रफिक शेख, अॅड.इद्रिस बागवान, अॅड.एम.पी. कोरुलकर, अॅड.संजीवकुमार कोणशिरसगी, अॅड.कोनापुरे यांच्यासह सोलापुरातील जीएसटी व आयकर सल्लागार उपस्थित होते.

## पोलिस भरतीवेळी एक महिला चक्कर येऊन कोसळली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

पोलिस मुख्यालय येथे पोलिस भरतीसाठी मैदानी चाचणी सुरु आहे. मैदानी चाचणी करत असताना अचानक चक्कर येऊन एक महिला मैदानावर कोसळली. ही घटना दि.१४ फेब्रुवारी रोजी घडली.

रोहिणी अंगद धायगुडे (वय-२३, रा.लातूर) ही महिला शहर पोलिस मुख्यालय येथे मैदानी चाचणी करत असताना अचानक चक्कर येऊन पडली. पोलिस मुख्यालय येथील सरकारी दवाखान्यात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी शासकीय रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. सिव्हील पोलिस चौकीत याची नोंद करण्यात आली.

# सोलापूर-मुंबई वंदे भारत एक्सप्रेसची ३ री वर्षपुर्ती

**२३ लाखांहून अधिक प्रवाशांनी केला प्रवास**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

आधुनिक रेल्वे कनेक्टिव्हिटी आणि प्रवाशांच्या सोयीसुविधांमध्ये एक महत्त्वाचा टप्पा मानला जाणारा वंदे भारत एक्सप्रेसने १० फेब्रुवारी २०२६ रोजी आपल्या समर्पित सेवेची तीन वर्षे यशस्वीरित्या पूर्ण केली आहेत. आजपर्यंत २३ लाखांहून अधिक प्रवाशांनी या 'वंदे भारत'द्वारा प्रवास केल्याचे रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

भारताची अर्थिक राजधानी मुंबई तसेच कापड आणि हुतात्म्यांचे शहर सोलापूर यांच्यात जलद आणि जागतिक दर्जाची रेल्वे कनेक्टिव्हिटी वाढवण्याच्या उद्देशाने सुरु करण्यात आलेली ही देशातील ९ वी वंदे भारत एक्सप्रेस आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून या सेवेचे उद्घाटन करण्यात आले होते.

रेल्वे क्रमांक २२२२६/२२२२५ सोलापूर-सीएसएमटी मुंबई वंदे भारत एक्सप्रेस ४५५ किमी अंतर फक्त ६ तास ३० मिनिटांत पूर्ण करते. सध्याच्या सुपरफास्ट सेवांमध्ये ७ तास ५५ मिनिटांत पूर्ण होते, ज्यामुळे प्रवासाच्या वेळेत अंदाजे १ तास ३० मिनिटांची बचत होते. सध्या ही रेल्वे आठवड्यातून सहा दिवस धावते. या रेल्वेला कुर्डुवाडी, दौंड, पुणे, कल्याण, ठाणे आणि दादर येथे थांबा देण्यात आले आहे. सुरुवातीला १६ डब्यांच्या वंदे भारत ट्रेन सेटसह सुरु करण्यात आलेल्या या सेवेला प्रवाशांची प्रचंड मागणी होती. त्यामुळे २० डब्यांच्या रेकपर्यंत वाढवण्यात आली.

यात एकूण १ हजार ४४० आसन क्षमता आहे. यात १ हजार ३३६ चेअर कार सीट्स, १०४ एक्झिक्युटिव्ह चेअर कार सीट्सचा समावेश आहे, असेही सांगण्यात आले.





# पुलवामा : शहीद जवानांना श्रध्दांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

दि.१४ फेब्रुवारी २०१९ रोजी पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या सीआरपीएफ जवानांना केंद्रीय सशस्त्र बदल भूतपूर्व सैनिक कल्याण संघ-सोलापूरच्या वतीने चार हुतात्मा पुतळा येथे श्रध्दांजली वाहण्यात आली. महापौर विनायक कोंड्याल यांनी पुष्पचक्र अर्पण करुन शहिदांना श्रध्दांजली वाहिली. यावेळी सिध्दाराम चाकोते, सगन्ना बिराजदार, मारुती सुरवसे, दत्तात्रय येलपले उपस्थित होते.

यावेळी केंद्रीय सशस्त्र बल भूतपूर्व सैनिक कल्याण संघाच्या कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी, जवानांच्या घराचे मालमत्ता कर माफ करण्यात यावा, अशी मागणी महापौर कोंड्याल यांच्याकडे करण्यात आली. महापौर कोंड्याल यांनी त्यास सकारात्मक प्रतिसाद देत याकामी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येणार असल्याचे सांगितले.

## महिलेला मारहाण

**सोलापूर :** राहत्या घरासमोर मुलाचे केस कापल्याबद्दल विचारणा करण्यास गेले असता एका महिलेला दोघा जणांनी विटा व लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. यात संगीता शिवानंद चोळ्ळे (वय-४०, रा.सैफुल, प्रताप नगर रोड, सोलापूर) ह्या जखमी झाल्या आहेत. विजय प्रकाश चोळ्ळे, रुपाली चोळ्ळे यांनी ही मारहाण केली. संगीता चोळ्ळे यांना पुढील उपचारासाठी पती शिवानंद चोळ्ळे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. सिव्हील पोलिस चौकीत याची नोंद करण्यात आली.

## 'तमसिली मुशायरा'तून साहित्यिक वारसा जपण्याची संधी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

तमसिली मुशायरा-प्रतिकात्मक काव्य संमेलनात सहभागी कवींचे कपडे अर्थात वेशभूषा हे फॅशन शो नसून या माध्यमातून ऊर्दू साहित्यिक वारसा जपण्याची एक संधी असते, असे प्रतिपादन उर्दूचे ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ.रशीद शेख यांनी केले.

मजरेवाडी येथील शमा उर्दू शाळेत आयोजित केलेल्या तमसिली मुशायरा कार्यक्रमात ते बोलत होते. शमा संस्थेचे अध्यक्ष अय्यूब अहमद नल्लामंदू हे अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी प्रा.बी. एच. करजगीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. अबरार अहमद यांनी प्रास्ताविक केले. शरजील शेख, सबा बलामपूरी, शबीना अदीब शेख, रुक्सार शेख, जैनाब शेख, उजमा साबूनगर, शिबा पटेल, कासीम पटेल, नदाफ फैजान, अखलाक शेख, जिया शेख, सय्यद खन्सा यांनी यात सहभाग नोंदविले. प्रभारी मुख्याध्यापिका यास्मीन विजापुरे यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले होते. शाहीन शकील सदफ यांनी सूत्रसंचालन केले.

# उपवासाचे पदार्थ खरेदीसाठी ग्राहकांची मोठी गर्दी

**शिवशंकर बझारच्यावतीने सवलतीच्या दरात विक्री**



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१४ फेब्रुवारी-**

महाशिवरात्रीनिमित्त येथील शिवशंकर बझारच्या वतीने सर्व शाखांमध्ये साबुदाणा व शेंगदाणे सवलतीच्या दरात विक्रीस ठेवले असून खरेदीसाठी ग्राहकांची प्रचंड गर्दी होत आहे.

शंकर नगर येथील शिव-पार्वती मंदिर येथे महाशिवरात्र यात्रा मोठ्या प्रमाणावर भरत असते. त्याअनुषंगाने उपवासाच्या पदार्थांना असलेल्या मागणीचा विचार करता अनेक दुकाने थाटण्यात आली. ग्रामीण भागात महाशिवरात्रीचा उपवास करणे याला विशेष महत्व दिले जाते. साबुदाणा, शेंगदाणे, भगर, खजूर, राजगिरा, केळी, रताळे हिरवी मिरची यांसह अन्य फळफळांना मोठी मागणी असते. यशवंत नगर येथील कारखाना परिसरातही छोट्या व्यावसायिकांनी उपवासाच्या पदार्थांची दुकाने थाटली आहेत.

| पदार्थ | सध्याचे दर (रु.) |
|---|---|
| शेंगदाणा | २०० ते २२० |
| भगर | १४० ते १६० |
| राजगिरा | १५० ते १७० |
| साबुदाणा | ९० ते ११० |
| बटाटे | ३० ते ४० |
| रताळे | ४० ते ५० |

# 'ऑडिट'च्या नावाखाली पतसंस्थांची 'आर्थिक लूट'

## सोलापूर जिल्हा फेडरेशनची प्रधान सचिवांकडे तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

ऑडिट अर्थात लेखापरीक्षणाच्या नावाखाली राज्यातील सहकारी पतसंस्थांची आर्थिक लूट केली जात आहे. शासनाच्या नव्या निर्णयानुसार ऑडिट फी आकारणी गरजेचे असताना जुन्या परिपत्रकानुसार फी आकारली जात असल्याचे तपासणीत आढळून आले आहे. कोट्यवधी रुपयांची अनधिकृत वसुली केली जात आहे. या विरोधात सोलापूर जिल्हा फेडरेशनच्या वतीने प्रधान सचिवांकडे तक्रार करण्यात आली, असे फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे, उपाध्यक्ष श्रीशैल बनशेट्टी यांनी पत्रपरिषदेत सांगितले



राज्यभरात हजारो सहकारी पतसंस्था कार्यरत असून ग्रामीण आणि शहरी भागातील सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक गरजा भागवण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. कोणताही ठोस लेखी नियम, स्पष्ट दरपत्रक किंवा पारदर्शक निकष न पाळता फी आकारली जात आहे. अनेक लेखापरीक्षक हे संभाजीनगर उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा संदर्भ देतात. मात्र, त्या निर्णयातील नेमके निकष, शुल्काचे प्रमाण किंवा अंमलबजावणीची प्रक्रिया याबाबत संस्थांना कोणतीही स्पष्ट माहिती दिली जात नाही. छोट्या व मध्यम स्वरुपाच्या पतसंस्थांना लाखो रुपयांचा अतिरिक्त भुर्दंड सहन करावा लागत आहे. प्रशासकीय दबाव आणि भविष्यातील अडचणींच्या भीतीमुळे अनेक संस्था उघडपणे विरोध करु शकत नाहीत.

या 'मुक्या माराचा' सामना करावा लागत असल्याची खंत त्या-त्या संचालक मंडळांकडून व्यक्त केली जात आहे. शासनाच्या नव्या परिपत्रकाप्रमाणे ऑडिट आकारली जाणे आवश्यक आहे. तसे होत नसल्यास इतर संस्थांनी फेडरेशनकडे संपर्क साधावे, असेही त्यांनी सांगितले.

सहकार आयुक्तांनी लेखापरीक्षण शुल्काचा पुनर्विचार करण्यासाठी कोल्हापूरचे विभागीय सहनिबंधक डी.ए. चौगुले यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. या समितीने सादर केलेल्या अहवालात धक्कादायक निरीक्षणे नोंदवली होती. नागरी सहकारी बँकांच्या तुलनेत पतसंस्थांकडून तब्बल दोन ते अडीच पट जादा ऑडिट फी आकारली जात असल्याची कबुली अहवालात देण्यात आली होती. या अहवालावर कोणताही ठोस निर्णय घेतलेला नाही, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

**दि.१५ मे १९९२ च्या परिपत्रकाप्रमाणे शुल्क**

- **एकूण उलाढालाच्या पहिल्या ५ लाखास शेकडा २५ पैसे प्रमाणे १ हजार २५० रु.**
- **नंतरच्या ५ लाखास शेकडा १५ पैसे प्रमाणे ७५० रु.**
- **नंतरच्या १० लाखावर शेकडा १० पैसे प्रमाणे ९ हजार रु.**
- **राहिलेल्या रकमेवर ५ पैसे प्रमाणे ७५ हजार ५८३ रु.**

**दि.२९ ऑक्टोबर २०१४ च्या परिपत्रकाप्रमाणे शुल्क**

- **खेळते भांडवल १० कोटींपर्यंत प्रत्येकी १०० रुपयांस ५ पैसे प्रमाणे ५० हजार रु.**
- **खेळते भांडवल पुढील ९० कोटींसाठी प्रत्येकी १०० रु. २ पैसे प्रमाणे ९ हजार ५२४ रु.**
- **१०० कोटींच्या पुढील राहिलेल्या खेळत्या भांडवलावर १ पैसे प्रमाणे**
- **एकूण फरक २७ हजार ०५९ रु.**

**या आहेत फेडरेशनच्या मागण्या**



**हायकोर्टातील 'स्टे' उठवण्यासाठी शासनाने तातडीने कायदेशीर पावले उचलावीत, सुधारित आणि स्पष्ट परिपत्रक काढून त्यानुसारच लेखापरीक्षण शुल्क आकारण्याचे आदेश सर्व लेखापरीक्षकांना द्यावेत, नियमांचे उल्लंघन करुन जादा शुल्क वसूल करणाऱ्या लेखापरीक्षकांची मान्यता कायमस्वरुपी रद्द करण्यात यावी, आतापर्यंत वसूल केलेली जादा रक्कम संबंधित पतसंस्थांना परत मिळवून द्यावी, एसआयटी पथक नेमून संपूर्ण व्यवहारांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे यांनी केली.**




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर | रविवार, १५ फेब्रुवारी २०२६
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com







**सोलापूर : महाशिवरात्री निमित्त अक्कलकोट रोड परिसरातील होटगी मठात जय्यत तयारी करण्यात आली आहे. येथील शिवलिंगसह जगद्गुरु व नंदीच्या मुर्तीचे छायाचित्र टीपले. तसेच शहराच्या विविध भागातील भोलेनाथ मंदिरामध्ये मंडप बांधून महाशिवरात्रीची तयारी केली जात आहे.**

# सुरत-चेन्नई ग्रीन कॉरिडॉरला गती; ८ हजार कोटींची निविदा जाहीर

- ✔ सोलापूर जिल्ह्यातील ५९ गावांचा आहे समावेश
- ✔ किमान दोन वर्षात काम पूर्ण करणे बंधनकारक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

सुरत-चेन्नई ग्रीन कॉरिडॉर प्रकल्पाला केंद्रीय आर्थिक मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाल्यानंतर रखडलेल्या कामाला वेग आला आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सोलापूर हद्दीसह अहिल्यानगर, बीड आणि धाराशिव जिल्ह्यांतील सुमारे २२० किलोमीटर लांबीच्या टप्प्यासाठी तब्बल ८ हजार कोटी रुपयांची निविदा प्रसिध्द केली आहे. १९ मार्च रोजी निविदा उघडण्यात येणार आहे.

बीओटी अर्थात बिल्ड-ऑपरेट-ट्रान्सफर या तत्त्वावर हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सुमारे साठ दिवसांत अंतिम कंत्राटदाराची निवड करून त्याला वर्क ऑर्डर दिली जाणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम किमान दोन वर्षे आणि कमाल तीन वर्षांत पूर्ण करणे बंधनकारक राहणार आहे. पहिल्या टप्प्यानंतर दुसऱ्या टप्प्यात रिंगरोडसाठी स्वतंत्र निविदा काढली जाणार आहे.



या महत्वाकांक्षी प्रकल्पात सोलापूर जिल्ह्यातील ५९ गावांचा समावेश आहे. हा सहा पदरी ग्रीनफिल्ड महामार्ग सोलापूर जिल्ह्यातील उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, बार्शी आणि अक्कलकोट या तालुक्यांतील एकूण ५९ गावांमधून जाणार आहे. सोलापूर हद्दीत साधारण ८० किलोमीटर लांबीचा कॉरिडॉर प्रस्तावित आहे. पाच वर्षांपूर्वी जाहीर झालेल्या या प्रकल्पासाठी भूसंपादनाची प्रक्रिया राबविण्यात आली होती.

बीओटी तत्त्वावर उभारण्यात येणाऱ्या या महामार्गावर वाहनचालकांकडून टोल आकारला जाणार आहे. औद्योगिक वाहतूक, कृषी मालाची निर्यात आणि प्रवासाचा कालावधी कमी होणे या दृष्टीने हा कॉरिडॉर महत्त्वाचा ठरणार आहे. सोलापूर जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाला या प्रकल्पामुळे मोठी चालना मिळणार असल्याचे प्रशासनाचे मत आहे.

### भूसंपादनासाठी ४९१ कोटींचे वाटप

ग्रीन कॉरिडॉर प्रकल्पासाठी २०२३ ते २०२५ या कालावधीत एकूण ३३ मूळ व पुरवणी निवाडे जाहीर करण्यात आले. अक्कलकोट, बार्शी, दक्षिण सोलापूर आणि उत्तर सोलापूर तालुक्यांतील ५२ गावांमधील २०६.६४ हेक्टर जमीन संपादित करण्यात आली आहे. या संपादित जमिनींसाठी ४११.५३ कोटी रुपयांची भरपाई देणे बाकी होते. भूसंपादन अधिकारी सीमा होळकर यांच्या अध्यक्षतेखाली मंजूर निवाड्यांनुसार रक्कम वाटपाची प्रक्रिया सुरु झाली आहे.

### ३७४ किमी महामार्ग १९,१४२ कोटींचा अंदाजित खर्च

एकूण ३७४ किलोमीटर लांबीच्या या महामार्गासाठी सुमारे १९ हजार १४२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. नाशिक, अहिल्यानगर आणि सोलापूर जोडणारा हा मार्ग अक्कलकोटमार्गे पुढे कर्नुल (आंध्र प्रदेश) येथे जाऊन मिळणार आहे. या महामार्गामुळे सोलापूर ते तिरुपती हा सुमारे ८०० किलोमीटरचा प्रवास केवळ सहा तासांत पूर्ण होणार आहे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# एआय उपकरणांची 'इलेक्ट्रो' प्रदर्शनात धूम

**५ डोम्स, ३६० स्टॉल्स; तंत्रज्ञानाची मेजवानी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

होम मैदानावर भरलेल्या 'इलेक्ट्रो' प्रदर्शनात अत्याधुनिक तंत्रज्ञानाची झलक पाहायला मिळत असून एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) आधारित उपकरणे यंदाचे मुख्य आकर्षण ठरत आहेत. सेडा अर्थात सोलापूर इलेक्ट्रॉनिक डिलर्स असोसिएशनच्या वतीने आयोजित या प्रदर्शनात घरगुती, औद्योगिक वापरासाठी उपयुक्त अशा सुमारे ३६० स्टॉल्स उभारण्यात आले आहेत.

पाच स्वतंत्र प्री-फॅब्रिकेटेड आणि कंपनी-फिटेड डोम्समध्ये विविध कंपन्यांनी उत्पादने सादर केली आहेत. या प्रदर्शनात आवाजावर



चालणारी स्मार्ट उपकरणे, स्मार्ट होम कंट्रोल सिस्टम, सोलर चार्जर, गुगल टीव्ही, १०० इंची स्मार्ट टीव्ही, एआय आधारित फ्रिज, वॉशिंग मशीन, एसी, स्वयंचलित भांडी धुण्याची मशीन, किचन अप्लायन्सेस, विविध प्रकारचे कुलर, म्युझिक सिस्टीम, गॅस गिझर, मोबाईल, आयपॅड, टेलिफोन, हेल्थ इक्विपमेंट, कॉम्प्युटर आदी वस्तूंची रेलचेल आहे. विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त एआय-आधारित शैक्षणिक साधनांनाही विशेष प्रतिसाद मिळत आहे.

उद्योजक, गृहिणी, विद्यार्थी आणि तंत्रज्ञानप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने प्रदर्शनाला भेट देत असून नव्या उपकरणांची माहिती घेत आहेत. इलेक्ट्रॉनिक दुचाकीचे प्रदर्शन आणि ऊर्जा-बचतीवर आधारित उत्पादनेही लक्ष वेधून घेत आहेत. त्यामुळे हे प्रदर्शन केवळ खरेदी-विक्रीपुरते मर्यादित न राहता नव्या युगातील तंत्रज्ञानाची ओळख करून देणारे व्यासपीठ ठरत आहे. दररोज रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून अवयवदानाबाबत जनजागृतीही केली जात आहे.

बुधवार, १८ फेब्रुवारी पर्यंत दररोज दुपारी ४ ते रात्री ९.३० यावेळेत हे प्रदर्शन सुरु राहणार आहे. याठिकाणाहून खरेदी करणाऱ्या ग्राहकांसाठी दररोज लकी ड्रॉ ठेवण्यात आला आहे. तसेच सात दिवसांत खरेदी केलेल्या ग्राहकांसाठी शेवटच्या दिवशी बंपर ड्रॉद्वारे आकर्षक बक्षिसे देण्यात येणार असल्याची घोषणा आयोजकांनी केली आहे. एकूणच, 'इलेक्ट्रो' प्रदर्शनामुळे सोलापूरकरांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची अनोखी संधी उपलब्ध झाली आहे.

# ६२ लाखांची फसवणूक; मास्टरमाइंड जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

ऑनलाईन शेअर मार्केटमध्ये चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवून एकाची ६५ लाख रुपयांची फसवणूक केलेल्या प्रकरणातील 'मास्टरमाइंड'ला शहर सायबर पोलिसांनी जेरबंद केले. ग्लेन (अल्बर्ट) पर्सी सिक्क्वेरा असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. गुजरात येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन त्याला ताब्यात घेण्यात आले आहे.



यातील मुख्य आरोपी ग्लेन सिक्क्वेरा हा २०२२ पासून परदेशात (लाओस) वास्तव्यास होता. त्याने तिथे चिनी आणि मलेशियन साथीदारांशी संगनमत करून भारतीय नागरिकांना ऑनलाईन शेअर मार्केटमध्ये १० ते ३०० टक्के इतका अवाढव्य परतावा देण्याचे आमिष दाखवले होते. या आमिषाला बळी पडून एका फिर्यादीची तब्बल ६२ लाख ६५ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली होती.

आरोपी हा परदेशातून कारवाया करत असल्याने त्याच्याविरुध्द 'लुक आऊट नोटीस' (LOC) जारी करण्यात आली होती. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी तो भारतात परतत असल्याची माहिती मिळताच, इमिग्रेशन विभागाच्या मदतीने त्याला अहमदाबाद विमानतळावर रोखण्यात आले. सोलापूर सायबर पोलिसांनी तिथे पोहोचून त्याला ताब्यात घेतले. न्यायालयाने त्याला ४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. यात अन्य एक आरोपी तन्वीर याकुब चौगुले (रा.मुंब्रा) याचाही समावेश असून, त्याच्या बँक खात्यांविरुध्द महाराष्ट्रात एकूण ९२ ऑनलाईन तक्रारी असल्याची माहिती समोर आली आहे.

# आ. देवेंद्र कोठे यांच्या 'प्रभाग चलो' अभियानला प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**


सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघात विकासकामांचा आढावा घेण्यासाठी आणि पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने आमदार देवेंद्र कोठे यांच्या पुढाकारातून 'प्रभाग चलो अभियान' राबविण्यात येत आहे.

मंगळवार, दि.१० फेब्रुवारीपासून सुरु करण्यात आलेल्या या अभियानास जनतेचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे. विकासकामांची सद्यस्थिती, प्रलंबित प्रश्न आणि स्थानिक नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. आमदार कोठे पक्ष संघटन अधिक मजबूत करण्याच्या भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी, मंडल पदाधिकारी, आजी-माजी नगरसेवक, शक्ती केंद्रप्रमुख, बुथ प्रमुख आणि नागरिकांशी थेट संवाद साधत आहेत.

# विदेशी दारुची बनावट लेबले

### १३ लाख १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

विदेशी दारुची बनावट लेबले तयार करणारी आंतरजिल्हा टोळी जेरबंद करण्यात आली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभाग सोलापूर यांनी केलेल्या कारवाईत १३ लाख १६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्कच्या अ विभाग सोलापूर यांच्या कार्यालयास मिळालेल्या गुप्त बातमीनुसार मुस्लिम पाच्छा पेठ येथे सापळा लावून ही कारवाई करण्यात आली.

याप्रकरणी समिर रशिद अंबिलखिचडे (रा.मुस्लिम पाच्छा पेठ, सोलापूर) आसिम कासिम बल्लारी (रा.फकरोद्दिन नगर झोपडपट्टी, सोलापूर) यांना ताब्यात घेण्यात आले. १८० मिली क्षमतेची रॉयल स्टॅग व्हिस्की, इंपिरियल ब्लू व्हिस्की, रॉयल चॅलेंज व्हिस्की, मॅकडोवल नं.१ व्हिस्कीची बनावट लेबलांची एम.एच.१३ सी.टी.०३७० या क्रमांकाच्या रिक्षातून वाहतूक केली जात होती.

एमआयडीसी परिसरातील कमटम वसाहत येथील प्रकाश विठ्ठल चन्ना (रा.शनिवार पेठ, सोलापूर) याच्या मालकीच्या श्रेया ऑफसेट येथे बनावट लेबलांचे छाप, डाय मशीन, लॅमिनेशन पेपर आणि सोमनाथ बाळासाहेव कदम, सुलतान महेबुबपाशा शेख (दोघेही रा. लातूर) याच्या बंकट प्रिंटर्स येथून डिझाईन बनविण्याचे साहित्य जप्त करण्यात आले.

लातूर-अंबाजोगाई रोडवर बनावट लेबलांची खरेदी करणारे व या टोळक्यांचे म्होरक्या महेश वालासाहेव स्वामी, गोविंद लक्ष्मण काळे (दोघेही रा.केज, जि.बीड) याच्याकडून गोवा बनावटीचे विदेशी मद्य, एम.एच.०४ इ.एस.७६१० या क्रमांकाचे वाहन जप्त करण्यात आले. या गुन्ह्यात एकूण ७ आरोपींना अटक करण्यात आली. तसेच दोन वाहने, १ लाख ५८ हजार ५०० बनावट लेबल, गोवा बनावटीचे मद्य असे १३ लाख १६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक जे.एन.पाटील, अ.व्ही.घाटगे, दुय्यम निरीक्षक धनाजी पोवार, समाधान शेळके, राम निंबाळकर, आर.एम.कोलते, सुखदेव सिद, शिवकुमार कांबळे, सचिन शिंदे, सहाय्यक दुय्यम निरीक्षक संजय चव्हाण, मुकेश चव्हाण, जवान, प्रशांत इंगोले, अनिल पांढरे, वसंत राठोड, चेतन व्हनगुंटी, दीपाली सलगर आदींनी ही कामगिरी पार पाडली.




CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १३५७

**नेम जया नाहीं एकादशी व्रत ।**
**जाणावें तें प्रेत सर्व लोकीं ।।**

गरीबी श्रीमंतीची दरी अनेक देशात आजही कमी अधीक प्रमाणात अदयापही असल्याचे दिसून येते. एकीकडे अन्नासाठी भटकणारी तर दुसरीकडे अन्नाची नासाडी करणारी मंडळी आहे. ईश्वराजवळ जाण्यासाठी किंवा ईश्वराच्या सहवासात रहायला मिळावे म्हणून मन:पूर्वक उपवास करणारी आणि वैद्यकीय सल्ल्यानुसार पोटाला आराम मिळावा म्हणून उपवास करणारीही मंडळी आहे. घरात असूनही किंवा घरात नसूनही भावनेपोटी काही लोक उपवास करण्यात आनंद मानतात. तर दुसरीकडे इच्छा नसतांनाही शरीर मोठ्या प्रमाणावर वाढून रोगराई होऊ नये म्हणून उपवास करतात. कोणत्या का पध्दतीने किंवा कोणत्या का कारणास्तव लोक उपवास करेनात, त्याचा परिणाम हा चांगलाच होतो. उपवासामुळे तेवढे अन्न बचत होते. हे बचत झालेले अन्न भुकेल्याच्या कामी येऊ शकते. उपवास धरणाऱ्याला भुकेचे महत्वही समजते. आपली भूक समजली म्हणजे इतरांच्या भुकेची जाणीव तरी होऊ शकते. अशी कोणती का कारणे असेनात, पण वारकरी सांप्रदायामध्ये उपवासाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे.



माणूस दिवसभरातून अनेकवेळा खाण्या-पिण्याचा विचार करीत असतो. खाण्या-पिण्यात बराच वेळ तो घालवतो. पंधरवाड्यातून एखादा दिवसतरी खाण्या-पिण्यात वेळ न घालवता भगवंताचे नामस्मरण करावे म्हणून उपवास धरला तर ते व्रत मानले जाते. या व्रताच्या दिवशी मन अन्नाकडे धांव न घेता ते भगवंत चरणी स्थिर केले जाते. पंधरवाड्याला एखादा दिवस तरी भगवंतासाठी द्यायला मिळावा म्हणून तरी व्रत करायला हवे. कसलाही उपवास, नियम न करता सतत खाण्या-पिण्यावर लक्ष देणाऱ्याला वैद्य उपवासाचा सल्ला देतात. वैद्याचा सल्ला ऐकला नाही तर हा देह मृत्यूकडे, रोगराईकडे लवकर धांव घेऊ शकतो. वैद्याप्रमाणे संतांनीही उपवासाचा सल्ला दिला आहे. वैद्याचा सल्ला शरीरासाठी आहे तर संतांचा सल्ला भावासाठी आहे. उपवासाचे महात्म्य असणारे एकादशी व्रत जो कोणी करीत नसेल त्याचा देह हा प्रेताप्रमाणे आहे, असे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**नेम जया नाहीं एकादशी व्रत ।**
**जाणावें तें प्रेत सर्व लोकीं ।।**

माणसाने आपल्या भावना जोपासण्यासाठी, मनाला स्थिरत्व प्राप्त करुन देण्यासाठी तरी उपवास करायला हवा. वैद्यांचा सल्ला घेण्याची वेळ येऊ देण्यापेक्षा संतांचा सल्ला मानला तर जास्त बरे होईल. मन:पूर्वक एकादशी व्रत केले तर पंचपक्वान्नावर सुध्दा मन जात नाही. अर्थात, अन्नासाठी धावणारे मन, स्थिर होते. मनाला, इंद्रियांना स्थिर करण्यात उपवासाची चांगली मदत होते. उपवासास वैज्ञानिक जोड असल्याने एकादशीचा नियम घालून घेतलेला बरा. उपवासामुळे सात्वीक वृत्ती वाढण्यास मदत होते. उपवासाच्या काळात अन्नावर मन धांव घेणार नाही, असे मनावर नियंत्रण ठेवावे. मनावर नियंत्रण ठेवण्याची सवय इतर बाबतीतही कामी येते. उपवासाच्या, एकादशीच्या निमित्ताने चांगल्या विचारांची आठवण होते. उपवासाची महती ही केवळ सांगण्या, ऐकण्याची नसून ती अनुभवण्याची असल्याने, आपण उपवासाचा अनुभव घ्यावा. उपवासाचा आनंद काही वेगळाच असल्याचे लक्षात येईल. वारकरी मंडळी कसल्याही अडचणीत एकादशी करतातच. आपणही करुन पहावे.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : रविवार,**
**दि. १५ फेब्रुवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - माघ त्रयोदशी**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- उत्तरापाढा(१९.४७)**
**योग -व्यतिपात (२६.४६)**
**करण - विष्टी (२९.२३)**
**राहू काल : रविवार द़.४.३० ते ६.००**

**दिनविशेष : महाशिवरात्री.**
**१५६४ - गॅलेलिओ गॅलीली यांचा जन्म: आधुनिक खगोलशास्त्राचे जनक, इटालियन खगोलशास्त्रज्ञ आणि भौतिकशास्त्रज्ञ गॅलेलिओ गॅलीली यांचा जन्म.**
**१९३९ - काँग्रेस अध्यक्षपद पेच: नेताजी सुभाषचंद्र बोस यांची काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाल्यावर मोठा राजकीय पेचप्रसंग निर्माण झाला होता.**



## त्यागमूर्ती माता रमाई यांच्या पुतळा क्ले मॉडेलची शिष्टमंडळाने केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

पुणे येथील आल्हाट आर्ट स्टुडिओ येथे बनविण्यात येत असलेल्या त्यागमुर्ती माता रमाई यांच्या पुतळा क्ले मॉडेलची शिष्टमंडळाने पाहणी केली. थोड्याफार दुरूस्त्या सुचवून आल्हाट आर्ट स्टुडिओचे संचालक सुभाष आल्हाट यांना सूचना करण्यात आल्या. त्यागमुर्ती माता रमाई यांच्या पुतळ्याचा क्ले मॉडेल पाहून त्यात थोड्याफार दुरूस्त्या सुचवून आल्हाट आर्ट स्टुडिओचे संचालक सुभाष आल्हाट यांना पुतळा बनविण्यास सर्वानुमते संमती देण्यात आली. यावेळी बहुजन समाज पार्टीचे प्रदेश सचिव ॲड संजीव सदाफुले, शहर अध्यक्ष देवा उघडे, जिल्हा कार्यालयीन सचिव शिलवंत काळे , शहर युवक अध्यक्ष अमर साळवे, शहर प्रभारी सुहास सुरवसे, प्रविण कांबळे,भारतीय बौद्ध महासभेचे आण्णासाहेब वाघमारे, नागसेन माने, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान कृती समितीचे अध्यक्ष अशोक जानराव, रिपाइं(आठवले) शहर उपाध्यक्षमाजी नगरसेवक अरुण भालेराव , नगरसेवक गौतम कसबे, अजित गायकवाड, महापालिकेचे कनिष्ठ अभियंता प्रशांत गुंड आदी उपस्थित होते.

# शिवजयंतीनिमित्त उद्यापासून व्याख्यानमाला

### मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

येथील मराठा समाज सेवा मंडळ या संस्थेच्या वतीने दिनांक १६ ते १९ फेब्रुवारी दरम्यान शिवजन्मोत्सव व्याख्यानमाला यासह विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत, अशी माहिती मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष मनोहरपंत सपाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

याही वर्षी शिवजन्मोत्सव व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनाधिष्ठित मूर्तीची प्रतिष्ठापना सोमवार दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता शिवतीर्थावर मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनाधीष्टित मूर्तीची प्रतिष्ठापना महापौर विनायक कोंड्याल व उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर व संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या हस्ते ही पूजा छत्रपती शिवाजी प्रशाला सोलापूर येथे संपन्न होणार आहे.

सोमवार दि. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता शिवकालीन शस्त्रास्त्र, प्राचीन नाणी व वस्तूंचे प्रदर्शन युगंधर फाउंडेशन व शेकप्पा गाजूल यांच्या सहकार्याने सकाळी १० वाजल्यापासून ते सायंकाळी ९ वाजेपर्यंत भरणार आहे. या प्रदर्शनाचा सोलापूर शहरातील शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक, शिवाजी महाराजांवर प्रेम करणाऱ्या सर्व अभ्यासकांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. मंगळवार दि. १७ फेब्रुवारी २०२६ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलुगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन होणार असून यानंतर व्याख्यानमालेचे पहिले पुष्प प्रा.डॉ. विकास शिंदे हे शिवचरित्र आजच्या युवकापुढील आदर्श या विषयावर गुंफणार आहेत.



बुधवार दि. १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन होणार आहे. गुरुवार दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन होणार असून याप्रसंगी शिवजयंती निमित्त शिवतीर्थ येथे महाप्रसाद वाटप आहे. या पत्रकार परिषदेस ज्ञानेश्वर सपाटे, प्रा.महेश माने, महादेव गवळी, प्रा. राजेंद्र शिंदे, विनायक पाटील, प्रभाकर खंडाळकर, अशोक चव्हाण, शिवदास चटके, निलंकठ वाघचवरे , नागनाथ हावळे, अलका सुरवसे, नितीन मोटे, दत्ता भोसले आदी उपस्थित होते.



## डॉ. संपत बलदवा यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवार-**

सोलापूर ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीद्वारे ज्येष्ठ स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. संपत बलदवा यांना 'जीवनगौरव पुरस्कार' देऊन त्यांच्या प्रदीर्घ सेवेचा गौरव करण्यात आला आहे.

इंडियन मेडीकल असोसिएशनच्या हॉलमध्ये सदर पुरस्कार सोहळा उत्साहात पार पडला. गेल्या पाच दशकांपासून वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान, विशेषतः स्त्रीरोग आणि प्रसूतीशास्त्र क्षेत्रातील त्यांची निस्वार्थ सेवा आणि चिकाटी अतुलनीय आहे. हा पुरस्कार त्यांच्या वचनबद्धतेचा आणि सातत्याचा सन्मान असून, तो तरुण डॉक्टरांसाठी एक प्रेरणास्त्रोत ठरेल. सोलापूरच्या आरोग्य क्षेत्रात डॉ. बलदवा यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते आणि या पुरस्कारामुळे त्यांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. सोलापूरमधील श्री मार्कंडेय सहकारी रुग्णालय आणि बलदवा हॉस्पिटलच्या माध्यमातून त्यांनी हजारो रुग्णांवर यशस्वी उपचार केले आहेत. यावेळी डॉ. सुजाता कुलकर्णी, डॉ. लता पाटील, डॉ. सुधांशु चितळे, डॉ. किरण चितळे, डॉ. सुहासिनी शहा, डॉ. रोहिणी देशपांडे, डॉ. अंजली चिटणीस, डॉ. दोशी, डॉ. कुलकर्णी, डॉ. सचिन बलदवा, डॉ. प्रतिभा बलदवा, डॉ. दोड्डामणी आदी उपस्थित होते.

## 'समाज भूषण' पुरस्काराने १० जणांचा सन्मान; २१ फेब्रुवारीला वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

समाजाच्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या सन्मानासाठी भंडारकवठे विकास मंच आणि गुरु फॉर लाईफ फाउंडेशन जुळे सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'समाज भूषण' पुरस्कार संस्थापक अध्यक्ष निंगराज विंचूरे यांनी जाहीर केले

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या खालील मान्यवरांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. महापौर, उपमहापौर व सभागृह नेते यांच्या प्रमुख उपस्थितीत याचे वितरण शनिवार, २१ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता, मांगल्य सांस्कृतिक भवन, भारती विद्यापीठ जवळ, विजापूर रोड येथे होणार आहे. राहणार आहे.

**पुरस्कारार्थी मान्यवर :** प्रा. इकबाल तांबोळी (शैक्षणिक), नंदकुमार वारे (पत्रकार), कल्लप्पा फुलारी, सुनीता ढवळेश्वर (शैक्षणिक), हणमंत पैलवान पुजारी (सामाजिक), हणमंत दहिवडे (युवा उद्योजक), चिदानंद कोटगोंडे (कृषी), रवी राठोड (क्रीडा) राजश्री बहिरगोंडे (उद्योजिका), प्रकाश जाधव (आदर्श पालक).

## अक्कलकोटमध्ये श्री कालिका महोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ फेब्रुवारी-**

श्री विश्वकर्मा मय पांचाळ समाजाच्या वतीने सालाबादाप्रमाणे यंदाही श्री कालिकादेवी यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष शिवानंद सुतार यांनी दिली आहे. महोत्सव बुधवार दि. १८ ते सोमवार दि. २३ मार्च या दरम्यान पार पडणार आहे. सर्व समाजबांधवांनी या महोत्सवात उपस्थित राहून देवीचे आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

महोत्सवाची सुरुवात दि. १८ मार्च रोजी दीपप्रज्वलन व कालिका महोत्सव प्रारंभाने होणार आहे. दि. १९ मार्च रोजी गुढीपाडव्याच्या निमित्ताने सकाळी व रात्री देवीस महाअभिषेक व महापूजा तसेच महाआरती होणार आहे. दि.२० मार्च रोजी सकाळी महाअभिषेक व महापूजा, दुपारी सामुदायिक उपनयन (मुंज) सोहळा, प्रीती भोजन व रात्री महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२१ मार्च रोजी सकाळी महाअभिषेक व महापूजा, १०८ दाम्पत्यांसह दुर्गा सप्तशती हवन आणि रात्री महाआरती होणार आहे. दि.२२ मार्च रोजी सकाळी महाअभिषेक व महापूजा, राज्यस्तरीय वधू-वर नाव नोंदणी शिबिर व महाआरती आयोजित करण्यात आली आहे. दि. २३ मार्च रोजी सकाळी महाअभिषेक व महापूजा, सुवासिनी भोजन, महाप्रसाद, पालखी मिरवणूक व रात्री महाआरतीने महोत्सवाची सांगता होणार आहे. हा महोत्सव उ. कसबा, मसरे गल्ली, सोलापूर येथील श्री कालिका देवस्थान येथे पार पडणार आहे.

## कोहिनूर इन्स्टिट्यूटमध्ये टेक्निकल प्रदर्शनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

कोहिनूर टेक्निकल इन्स्टिट्यूट सोलापूर शाखेत टेक्निकल प्रदर्शनाचे आयोजन केले होते. त्यासाठी निमंत्रित बी. एस. कुलकर्णी प्रशालेचे मुख्याध्यापिका ऐश्वर्या कुलकर्णी यांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेचे पूजन करून प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

केटीआयच्या सर्व ट्रेडच्या विद्यार्थ्यांनी एकूण १६ प्रोजेक्टस सादर केले. यामध्ये इलेक्ट्रिकल, एसी आणि रेफ्रिजरेशन, ऑटोमोबाईल, इलेक्ट्रॉनिक्स कॉम्प्युटर हार्डवेअर आणि नेटवर्किंग, कॉम्प्युटर सॉफ्टवेअर, मोबाईल रिपेअरिंग या ट्रेडनी विविध प्रोजेक्ट मांडले होते. यासाठी अनेक शाळामधून विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांनी भेट दिली व आपले या प्रदर्शनाचे अनुभव व उपयोग यासह शुभेच्छा दिल्या. तसेच इंडस्ट्रियल एरियातून अनेक मान्यवर यांनी या प्रात्यक्षिकांना भेट देऊन विद्यार्थ्यांमध्ये नवीन कल्पना व त्या प्रत्यक्षात आणण्याची खूप मोठी क्षमता आहे असे नमूद केले. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी वल्लभ कुलकर्णी, आनंद देशपांडे, विजयकुमार श्रीमल, प्रकाश जगताप, सचिन साळुंखे, राजश्री सलगर, एसआरओ सुप्रिया मोरे यांनी परिश्रम घेतले.



## जगावर वर्चस्व प्रस्थापित करतेय कृत्रिम बुध्दिमत्ता

### डॉ. चौगुले; समाजशास्त्रातील नवीन प्रवाह' या विषयावर राष्ट्रीय कार्यशाळेचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

सध्याच्या युगात तंत्रज्ञान हे मानवी विकासाला पूरक ठरत असून, विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता सारख्या प्रगत तंत्रज्ञानाने आता संपूर्ण जगावर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यास सुरुवात केली आहे. या तंत्रज्ञानामुळे भौगोलिक सीमा पुसट होत आहे. असे प्रतिपादन प्रसिद्ध अभ्यासक डॉ. रमेश चौगुले यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे संकुलाच्या वतीने आयोजित 'समाजशास्त्रातील नवीन प्रवाह' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी डॉ. रमेश चौगुले प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.




समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात समाजशास्त्रातील बदलत्या स्वरूपावर प्रकाश टाकला आणि अशा कार्यशाळांमधून विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनात प्रगल्भता येते, असे मत व्यक्त केले. प्रस्ताविक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वरी हजारे यांनी केले. डॉ. हजीमलंग शेख यांनी आभार मानले. परिषदेच्या यशस्वीतेसाठी समन्वयक डॉ. हाजीमलंग शेख आणि डॉ. श्रीनिवास भंडारे यांनी परिश्रम घेतले.

## बदलत्या ऋतूमध्ये बैद्यनाथ च्यवनफिट शुगर फ्री करते आरोग्याचे रक्षण

मकरसंक्रांती संपल्यानंतर ऋतूमध्ये बदल होण्याची चिन्हे दिसू लागतात. याच काळात सूर्य उत्तरायणात प्रवेश करतो, त्यामुळे दिवस हळूहळू मोठे आणि रात्री लहान होत जातात. याच काळापासून हवामानात बदल जाणवू लागतो. थंडी कमी होऊन हळूहळू उष्णता वाढू लागते. ग्रीष्म ऋतूच्या आगमनाची चाहूल लागते आणि तापमानही हळूहळू वाढू लागते. रात्री व सकाळी थंडी आणि दिवसभर उष्णता असते. वसंत ऋतू संपून ग्रीष्म ऋतूचा प्रभाव दिसू लागतो.

या ऋतूच्या संधिकालात तापमनातील बदल आणि हवेत वाढलेला कोरडेपणा त्यामुळे शरीरावरही त्याचा परिणाम होतो. वातावरणातील प्रदूषित हवा, धूळकण इत्यादींमुळे फुफ्फुसांच्या आजारांनी त्रस्त रुग्ण, लहान मुले आणि वृद्ध यांना विशेष त्रास होतो. सर्वसामान्य व्यक्तींनाही याचा परिणाम जाणवतो, ज्यामुळे नाकातून पाणी येणे, शिंक येणे, घशात खवखव व वेदना होणे अशी लक्षणे दिसतात. वारंवार खोकला येणे, कफ होणे, ताप येणे, शरीरात जडपणा किंवा अकड येणे अशीही तक्रारी होऊ शकतात. कधी कधी अपचन, पोटदुखी आणि जुलाबही होऊ शकतो.

या काळात सर्दी, खोकला किंवा तापासारखी लक्षणे जाणवल्यास त्रिभुवन कीर्ती रस आणि लक्ष्मीविलास रस १ १ गोळी सकाळ-संध्याकाळ पाण्यासोबत घ्यावी. खोकला व घशात खवखव असल्यास सितोपलादि चूर्ण १ - १ चमचा मधासोबत सकाळ-संध्याकाळ घ्यावे. खदिरादि बटी १-१ गोळी दिवसातून ३ वेळा चघळल्यास घशातील खवखव कमी होण्यास मदत होते. शरीरात अकड व ताप असल्यास महासुदर्शन काढा ३-३ चमचे पाण्यासोबत सकाळ-संध्याकाळ जेवणानंतर घ्यावे. तसेच महायोगराज गुग्गुलु टॅबलेट व सर्व ज्वरहर लौह १-१ गोळी सकाळ-संध्याकाळ घेतल्यास लवकर आराम मिळतो. या मौसमात दमा व फुफ्फुसांच्या रुग्णांना कफयुक्त खोकला व श्वास घेण्यास त्रास होत असल्यास श्वासकल्प टॅबलेट २-२ गोळ्या दिवसातून दोन वेळा जेवणानंतर घेतल्यास त्रास कमी होतो. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी, सर्दी-खोकल्यापासून संरक्षणासाठी तसेच दमा व फुफ्फुसांच्या रुग्णांसाठी च्यवनप्राश स्पेशल आणि मधुमेहींसाठी बैद्यनाथ च्यवनफिट शुगर फ्री यांचे नियमित सेवन लाभदायक ठरते. यासोबतच योग, प्राणायाम, श्वसनाचे व्यायाम आणि हलका, सुपाच्य आहार घ्यावा.

**वैद्य. प्रतिन पटलवार, वरिष्ठ आयुर्वेद सल्लागार**
Customer Care No.: ८४४८४४४९३५



## 'ऑर्किड'च्या विद्यार्थिनींची सुपमेकामध्ये पूर्णतः प्रायोजित इंटर्नशिपसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

सोलापूर शहरासाठी अभिमानास्पद ठरणारी कामगिरी करत ऑर्किड कॉलेजच्या अंतिम वर्षाच्या दोन विद्यार्थिनींची पॅरिस (फ्रान्स) येथील जागतिक कीर्तीच्या सुपमेका येथे पूर्णतः प्रायोजित चार महिन्यांच्या आंतरराष्ट्रीय इंटर्नशिपसाठी निवड झाली आहे. मेकॅनिकल व एरोस्पेस अभियांत्रिकी क्षेत्रातील हे विद्यापीठ जागतिक स्तरावर मान्यता प्राप्त आहे. मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातील स्नेहल शिंदे आणि इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन विभागातीलसमीक्षा सत्रे या विद्यार्थिनी १६ फेब्रुवारी २०२६ ते १५ जून २०२६ या कालावधीत प्रगत शैक्षणिक व संशोधन प्रशिक्षण घेणार आहेत. या दोघींना ला फाउंडेशन यांचे पूर्ण आर्थिक प्रायोजन मिळाले असून फ्रेंच विद्यापीठाकडून १,३०० युरो शिष्यवृत्ती तसेच दरमहा ६७० युरो स्टायपेंड दिला जाणार आहे. इंटर्नशिपदरम्यान त्या गाईडन्स, नेव्हिगेशन ॲण्ड कंट्रोलसाठी मॉड्युलर ड्रोन अरेनाचे डिझाईन आणि इंडस्ट्री ५.० उत्पादन लाईनचे मेकॅट्रॉनिक्स मॉडेलिंग या अत्याधुनिक प्रकल्पांवर काम करणार आहेत. ड्रोन तंत्रज्ञान, एम्बेडेड सिस्टीम्स, स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग आणि इंडस्ट्री एकत्रीकरण यांसारख्या क्षेत्रांमध्ये त्यांना जागतिक दर्जाचा अनुभव मिळणार आहे. या प्रकल्पासाठी डॉ. श्रीनिवास एस. मेतन प्रोजेक्ट मेंटर म्हणून मार्गदर्शन करणार असून पॅरिस येथील प्रा. रोमन डेलाबेये यांच्या सहकार्याने संयुक्त संशोधन होणार आहे.

## पिकावरील फवारणीचे पिले औषध

**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**

अज्ञात कारणाने एकाने पिकांवरील फवारणीचे औषध पिल्याने शासकीय रुग्णालय येथे दाखल करण्यात आले. उमेश आबा नकाते (वय-२३, रा.बाणेवाडी, ता.तुळजापूर, जि.धाराशिव) असे त्यांचे नाव आहे. बाणेवाडी शिवारातील शेतात त्यांनी पिकांवरील फवारणीचे औषध पिले. वडाळा येथील सरकारी दवाखान्यात प्राथमिक उपचार करुन त्यांचा भाऊ अभिजीत नकाते यांनी पुढील उपचारासाठी सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. सिव्हील पोलिस चौकीत याची नोंद करण्यात आली आहे.



## मेहता शाळेत भूगोल प्रदर्शनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

कै. वि. मो. मेहता माध्यमिक शाळेत भूगोल प्रदर्शन भरविण्यात आले होते.

यावेळी इयत्ता सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांनी विविध भौगोलिक प्रकल्प, वर्किंग मॉडेल्स व तक्ते तयार केले. विविध नैसर्गिक प्रदेश, सोलार एनर्जी, भारतातील विविधता, शेतीचे प्रकार, जलचक्र इ आधारित प्रयोग मुलांनी केले. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्यांची वैशिष्ट्ये असणारा नकाशा तयार केला. ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल बोरामणी येथील प्राध्यापक श्री. प्रदीप राठोड यांनी या प्रदर्शनाचे उद्घाटन व परीक्षण केले. मुख्याध्यापिका श्रुतीबागेवाडी व पर्यवेक्षिका मीनाक्षी भाटवडेकर त्याचप्रमाणे भूगोल विभाग प्रमुख प्रीती कुलकर्णी व सर्व भूगोल शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### दहावीच्या विद्यार्थ्यांकडून शाळेस माईक सेट भेट

**अक्कलकोट, दि.१४ फेबुवारी-**

बंकलगी (ता.दक्षिण सोलापूर) येथील हनुमान विद्यामंदीर शाळेतील २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील दहावीच्या विद्यार्थ्यांनी सात हजार किंमतीचे माईक सेट विद्यालयास भेट देऊन व संपूर्ण आर्थिक भार उचलून एक आगळा-वेगळा संदेश दिला. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित या शाळेत इयत्ता १० वीच्या परीक्षार्थींचा शुभचिंतन सोहळा व वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रगतशील शेतकरी माणिकराव देशमुख, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नागेश मदभावी, गोधराज भक्ती मंडळाचे अध्यक्ष सुनीलभाऊ देशमुख, दीपक पाटील मुख्याध्यापक आप्पासाहेब हत्तुरे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष चेंडके, काशिनाथ कोणदे आदी मान्यवर उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षि डॉ. बापूजी साळुंखे , संस्थांमाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रम सुरू झाला. यावेळी विविध स्पर्धेत यश मिळविलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांच्या नावाचे वाचन जेष्ठ शिक्षिका एन.एस राऊत यांनी केले व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. पर्यवेक्षक अमोल भावसार यांनी प्रास्ताविकेत शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नागेश मदभावी, प्रगतशील शेतकरी आप्पाराव काळे, सुनिलभाऊ देशमुख यांचा आर्थिक सहकार्याबद्दल विशेष गौरव करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे श्री. देशमुख, मुख्याध्यापक हत्तुरे, श्री.कोणदे, श्री. पाटील यांनी मार्गदर्शन केले. पंडीत कुंभार यांनी सूत्रसंचालन केले. सुप्रिया जामगे यांनी आभार मानले. पर्यवेक्षक अमोल भावसार, श्रेयस पाटील, सुप्रिया जामगे, तृप्ती रूपनुरे, नागनाथ कोळी,चाबुकस्वार मामा यांनी परिश्रम घेतले.



### दिल्ली येथे सुरू असलेल्या गोभक्त संमेलनामध्ये उमा बिराजदार यांचा सन्मान

**दक्षिण सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

दिल्ली येथे सुरू असलेल्या गोभक्त महिला संमेलनामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील तीन महिला गोभक्तांचा सन्मान करण्यात आले असून यामध्ये दक्षिण सोलापूरच्या उमा बिराजदार यांचा समावेश आहे. उज्वला खिल्लारी, सर्मथ गोशाळा, शिरूर तालुका, छाया थोरात, श्रीराम गोशाळा, तालुका आंबेगाव व उमा बिराजदार कट्टेव्वादेवी गोशाळा , वडकबाळ तालुका दक्षिण व जिल्हा सोलापूर या तीन गोशाळा चालक गोभक्त महिलांना त्यांच्या उत्कृष्ट कामाबद्दल विश्व हिंदू परिषदेकडून सन्मान करण्यात आला. केंद्र गोभक्त महिला प्रमुख नंदिनी भोजराज यांच्या हस्ते महिला गोभक्तांना सन्मानित करण्यात आले.



### टाकळी जिल्हा परिषद शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**दक्षिण सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी-**

टाकळी येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गुरुसिध्दाप्पा बिराजदार व उपाध्यक्ष सरपंच भौरव्वा कोळी होते. मल्लिकार्जुन बगले यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. होटगी बीटचे विस्ताराधिकारी सैपन आळगी व केंद्रप्रमुख शांतप्पा सदरखेड यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सिद्धाराम मधुरे, सिद्धाराम बगले, दिलीप चांदकवटे, लक्ष्मण कुंभार, डॉ.उमेश सुरळे, सुधाकर बिराजदार, रविंद्र बगले, बिराप्पा लातूरे, संतोष मधुरे, रमेश पदमगोंडे, श्रीशैल बगले, श्रीशैल कलशेट्टी, दयानंद दूधभाते, दयानंद कलशेट्टी, शिवानंद मगी, शिवशरण दुधभाते आदी उपस्थित होते.

### कोन्हाळी आश्रमशाळेतील दिशा कामाठीची 'इस्त्रो'साठी निवड

**अक्कलकोट दि १४ फेब्रुवारी-**



कोन्हाळी (ता.अक्कलकोट) येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील इयत्ता अकरावी सायन्समधील विद्यार्थीनी दिशा ज्ञानेंद्र कामाठी हिची भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी अंतराळ विज्ञानासारख्या क्षेत्रात मिळवलेल्या या संधीमुळे कोन्हाळी आश्रम शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत खासगी विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांसाठी विशेष परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. या परीक्षेत कोन्हाळी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.यामध्ये कुमारी दिशा ज्ञानेद्र कामाठी याचा इस्त्रोच्या अभ्यास दौर्यासाठी निवड झाली आहे. यावेळी कोन्हाळी आश्रम शाळेच्या वतीने दिशा कामाठी याचा यथोचित सन्मान करुन गौरव करण्यात आला आहे.दिशा कामाठी याच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आनंदराव जाधव व संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच प्राचार्य सिद्रामप्पा हडपद ,मुख्याध्यापक गणेश सुरवसे , विजय गायकवाड तसेच सर्व शिक्षक आणि पालकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. ग्रामीण भागातील आश्रमशाळेतून जागतिक कीर्तीच्या संस्थेपर्यंत पोहोचणाऱ्या या विद्यार्थिनीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# खगोलशास्त्र हे नैसर्गिक विज्ञान : डॉ. कुमारस्वामी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ फेब्रुवारी**

खगोलशास्त्र हे अंतराळातील ग्रह, तारे, आकाशगंगा, तेजोमेघ, धूमकेतू आणि उल्का यांसारख्या खगोलीय वस्तूंवर संशोधन करणारे, भौतिकशास्त्र व गणिताचा वापर करणारे नैसर्गिक विज्ञान आहे. हे शास्त्र विश्वाची निर्मिती, उत्क्रांती आणि त्यातील घटनांचा अभ्यास करते, ज्यातून मानवाला विश्वातील स्वतः चे स्थान समजण्यास मदत होते, असे प्रतिपादन भूगोल अभ्यासक तिरुचिरापल्ली येथील प्रा. डॉ. के. कुमारस्वामी यांनी केले.

येथील सी. बी. खेडगी महाविद्यालयात भूगोल विभागच्या वतीने आयोजित सर्व विद्या शाखांसाठी खगोलशास्त्रः उदयोन्मुख नवकल्पना, कल आणि शाश्वत विकास या विषयावरील राष्ट्रीय परिषदेत डॉ. के. कुमारस्वामी बोलत होते. अध्यक्षस्थानी अक्कलकोट एज्युकेशन




सोसायटीचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी हे होते. यावेळी व्यासपीठावर कलबुर्गीचे डॉ. एम. एस. जोगद, प्राचार्य डॉ. जी. एस. धबाले, परिषदचे सचिव डॉ. अंकुश शिंदे उपस्थित होते. अध्यक्षीय भाषण प्राचार्य डॉ. धबाले यांनी केले. प्रास्ताविक डॉ. अंकुश शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सविता वाघमारे यांनी केले तर आभार डॉ. सोमनाथ राऊत यांनी मानले.

या दोन दिवसाच्या परिषदेच्या पहिल्या सत्रात डॉ. एम. एस. जोगद यांनी अंतराळ प्रवासाचा आढावा, दुसऱ्या सत्रात डॉ. जे. सी. मोरे यांनी भारतीय खगोलशास्त्रातील नक्षत्रे, तिसऱ्या सत्रात डॉ. बाबू नल्लुसामी यांनी खगोलशास्त्र आणि हवामान बदलः एक वैश्विक दृष्टीकोन, चौथ्या सत्रात डॉ. एस. एस. मस्के यांनी भूगोलातील खगोलशास्त्र शाखा अध्यापनातील आव्हाने, पाचव्या सत्रात डॉ. विकास नागरे यांनी भूगोलाच्या अध्यापनातील खगोलशास्त्राचे महत्त्व, सहाव्या सत्रात डॉ. किसन झिपरे यांनी विद्युत्-चुंबकीय वर्णपटाद्वारे ब्रह्मांडशास्त्राचा अभ्यास या विषयावर उद्बोधन केले. सातव्या सत्रात संशोधक विद्यार्थ्यांनी खगोलशास्त्र विषयावर आधारित संशोधन पत्रिकाचे प्रस्तुतीकरण झाले आणि डॉ. नल्लासॅमी, डॉ. दीपक देडे, डॉ. खडके यांनी परीक्षकांचे काम पहिले. या परिषदेस ४० संशोधन पेपर प्राप्त झाले. समारोपप्रसंगी कार्यक्रमाध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव सुभाष धरणे, प्राचार्य डॉ. टी. एन मगर, विशेष उपस्थिती म्हणून प्राचार्य डॉ. जी. एस. धबाले, डॉ. एस. सी. अडवितोट, डॉ. अंकुश शिंदे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अहवाल वाचन डॉ. भैरप्पा कोणदे यांनी केले. आभार डॉ. अंकुश शिंदे आणि सूत्रसंचालन डॉ. लता हिंडोळे यांनी केले. परिषद यशस्वी करण्यासाठी प्रा. अभिजीत धोत्रे, प्रा. लक्ष्मण ढाले, प्रा.पवन हरदास, प्रा. व्ही. बी. माकणे, प्रा. प्रा. महेश पाटील, प्रा. आदिलशहा शेख, प्रा. नागेश विजापूरे आदींनी परिश्रम घेतले.

> सदरच्या परिषदेतर्फे खगोलशास्त्र विषयावर आयोजित संशोधन पेपर वाचनमध्ये प्रा. सविता वाघमारे (प्रथम), डॉ. सोमनाथ राऊत (व्दितीय) व डॉ. बाळू पवार (तृतीय) क्रमांक मिळविला.

## बार्शी शहरात जिवंत काडतूस अन् पिस्टल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ फेब्रुवारी-**

बार्शी शहर पोलीस ठाणे हद्दीत शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी रोजी बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्या इसमाविरुद्ध कारवाई करण्यात आली असून, त्याच्याकडून गावठी बनावटीचे पिस्टल व जिवंत काडतूस जप्त करण्यात आले आहे.

शुक्रवार दि. १३ रोजी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास राणी लक्ष्मीबाई उद्यान परिसर, सोलापूर रोड, बार्शी येथे पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे संशयिताची तपासणी करण्यात आली. त्यावेळी आरोपी रोहीत संतोष मारकड (वय २१, रा. उपळाई (येरमाळा), ता.




कळंब, जि. धाराशिव, सध्या रा. चोरमोले प्लॉट, बार्शी) याच्या ताब्यात एक गावठी बनावटीचे पिस्टल व एक जिवंत राउंड आढळून आला.

हे पिस्टल हे काळ्या रंगाच्या मुठीसह असून दोन्ही बाजूस चार उभ्या रेषा (स्लाईड) असलेले आहे. आरोपीच्या उजव्या पॅन्टच्या खिशामध्ये पितळी धातूचा जिवंत काडतूस मिळून आला आहे. यानंतर पोलिसांनी आरोपीकडून एक गावठी बनावटीचे पिस्टल (मॅगझीनसह) किंमत अंदाजे ५०,००० रुपये, एक जिवंत राउंड किंमत अंदाजे ५०० रुपये असा एकूण ५०,५०० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी यांच्या आदेशाचे उल्लंघन करुन बेकायदेशीररीत्या शस्त्र बाळगले असल्याने त्याच्याविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियम, १९५९ चे कलम ३ व २५, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोहेकॉ प्रविण साठे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली असून, गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या आदेशान्वये सहाय्यक पोलीस निरीक्षक उमाकांत कुंजीर यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

## सर्वसामान्यांना न्याय देणार : प्रभारी अधिकारी कांबळे

### वेळापूर पोलीस ठाण्यात बदलीनिमित्त दोघांचा सत्कार तर नूतन प्रभारींचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १४ फेब्रुवारी -**

सर्वसामान्य नागरिकांना बरोबर घेऊन न्याय देण्याची भूमिका घेतली जाईल. हद्दीतील सर्व गावांमध्ये शांतता, सुव्यवस्था आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन वेळापूर पोलीस ठाण्याचे नूतन प्रभारी अधिकारी आशिष कांबळे यांनी दिले.

येथील प्रभारी अधिकारी म्हणून पदभार घेतल्याबद्दल श्री. कांबळे यांचा तसेच प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी यांची सोलापूर येथे व पोलीस उपनिरीक्षक आकाश शेळके यांची मोहोळ येथे बदली झाल्याबद्दल ग्रामस्थांतर्फे पुष्पहार घालून व फेटा बांधून सत्कार करण्यात आला. यावेळी श्री. कांबळे बोलत होते. ते म्हणाले, पोलीस अधिकारी म्हणून माझे कर्तव्य केवळ गुन्हे दाखल करणे नाही, तर समाजात विश्वास निर्माण करणे हे अधिक महत्त्वाचे आहे. वेळापूर पोलीस स्टेशन हद्दीतील प्रत्येक गावात शांतता आणि सुरक्षिततेचे वातावरण निर्माण करण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक आहे. सर्वसामान्यांना न्याय मिळवून देताना पारदर्शकता आणि निष्पक्षता राखली जाईल. पोलीस व जनता यांच्यातील समन्वय अधिक



दृढ करण्यावर भर देणार आहे.

मावळते अधिकारी भाऊसाहेब गोसावी यांनी आपल्या कार्यकाळातील अनुभव सांगताना वेळापूरकरांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. जनतेच्या पाठिंब्यामुळेच अनेक गुन्हे उघडकीस आणता आले आणि कायदा-सुव्यवस्था राखता आली, असे ते म्हणाले.

तसेच आकाश शेळके यांनीही वेळापूरमधील सेवाकाळातील आठवणींना उजाळा देत सर्वांचे आभार मानले. यावेळी शुभेच्छा देण्यास राजकीय, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नूतन प्रभारी अधिकारी कांबळे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन अनेकांनी सत्कार केला.



## चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण

### बार्शी नगरपालिका अरोग्य विभागातर्फे स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ फेब्रुवारी-**

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत बार्शी नगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत दोन गटात घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेतील प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वाटप करण्यात आले.

येथील दत्त प्राथमिक विद्यामंदिरात शनिवार दि. १४ फेब्रुवारी रोजी झालेल्या या कार्यक्रमास श्रीकांत कुंभारे, सचिन काळे, युवराज जगताप, सुनिल लंगोटे, मंगेश मोरे, ललिता चव्हाण, चंद्रकांत लोखंडे, राहुल ठोंगे, संतोष ेंबरे, शितल पाटील उपस्थित होते. ज्येष्ठ शिक्षिका संगीता काळे अध्यक्षस्थानी होत्या. चित्रकला स्पर्धेतील प्राविण्य मिळविलेले विद्यार्थी असे : गट- ५ वी ते ७ वी- प्रथम- कु. स्वरांजली सुरेश साळुंके (७ वी) द्वितीय- कु. नाजीया निजामोद्दीन शेख (६ वी) तृतीय- कु.भारती किरण गोरे (५ वी) उत्तेजनार्थ -१) श्रीतेज सुरेश काळे (६ वी), कु.भारती प्रवीण समुद्रे (६ वी). गट- ८ वी ते १० वी- प्रथम- कु. श्रुती सुरेश काळे (९ वी) द्वितीय- कु.साक्षी सतीश मुसळे (८ वी) तृतीय- कु. राजनंदिनी किरण गोरे (८ वी) उत्तेजनार्थ- १) अभय चंदन साळवे (८ वी) २) अरमान इब्राहिम शेख (९ वी). मान्यवरांच्या हस्ते प्रथम क्रमांकास १००० रुपये व ट्रॉफी, द्वितीय- ८०० रुपये व ट्रॉफी, तृतीय ६०० रुपये व ट्रॉफी तसेच उत्तेजनार्थसाठी ट्रॉफी अशा बक्षिसांचे वितरण करण्यात आले. परीक्षक म्हणून युवराज जगताप व स्पर्धा समन्वयक म्हणून नपाचे विजय काळे यांनी काम पाहिले.

## स्वत:ला ओळखा आणि जिद्दीने यश संपादन करा : प्रा. ठोंबरे

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १४ फेब्रुवारी-**

विद्यार्थ्यांनी स्वतःमधील सुप्त गुणांना ओळखून ध्येय निश्चित करावे. आई-वडील, गुरुजन आणि शाळेचा आदर राखून जीवनात यशस्वी व समाधानी व्हा असा सल्ला प्रा.राजेंद्र ठोंबरे यांनी दिला.

ते सांगोला तालुक्यातील नाझरे विद्यामंदिरमध्ये इ.१० वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभात बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी गुरुवर्य बापूसाहेब झपके व विद्यादेवता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात माजी प्राचार्य गंगाधर घोंगडे यांनी साने गुरुजी, बापूसाहेब झपके, महात्मा गांधी, डॉ.एपीजे अब्दुल कलाम आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील प्रेरक दाखले दिले. विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शिक्षकांनी दिलेल्या ज्ञानाबद्दल आणि संस्कारांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बिभीषण माने, शिक्षक मनोगत दीपक शिंदे, सूत्रसंचालन सोमनाथ सपाटे यांनी केले. आभार चंद्रशेखर लिगाडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संभाजी सरगर, अतुल बनसोडे यांनी विशेष परिश्रम घेतले.




## करकंब येथे महर्षी दयानंद जन्मोत्सवानिमित्त प्रशंसन यज्ञ

**तभा वृत्तसेवा.**
**करकंब, दि.१४ फेब्रुवारी -**

करकंब (ता. पंढरपूर) येथील रामभाऊ जोशी हायस्कूल व डी.ए.व्ही महात्मा आनंद स्वामी सरस्वती ज्यु.कॉलेजमध्ये महर्षी दयानंद सरस्वती यांच्या २९२ व्या जयंतीनिमित्त महर्षी दयानंद प्रशंसन यज्ञ व होम हवन करण्यात आले.

हा कार्यक्रम दयानंद शिक्षण संस्थेचे स्थानिय सचिव महेश चौप्रा व प्रशासक डॉ. विजयकुमार उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. यावेळी आचार्य वेद सुमन भोसले यांनी महर्षी दयानंद यांचे शैक्षणिक,सामाजिक व स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाबद्दल सविस्तर माहिती दिली. या यज्ञासाठी हेमंत कदम, महादेव पुजारी, रमेश कविटकर, नामदेव सलगर या दांपत्यांनी सहभाग घेतला. यावेळी ॲड. एस.आर.जोशी, लक्ष्मण वंजारी, मारुती व्यवहारे विद्यार्थी, पालकवर्ग उपस्थित होते. २९२ व्या जयंतीचे औचित्य साधून गत वर्षभर विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. विविध विषयात प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले. होमहवन झाल्यानंतर विद्यार्थी व उपस्थित ग्रामस्थांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

# पिलीव गटात राष्ट्रवादी शप गटाला आत्मपरीक्षणाची गरज

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि १४ फेब्रुवारी-**

**पिलीव जिल्हा परिषद गट हा राष्ट्रवादी काँग्रेस (शप)चा बालेकिल्ला मानलो जातो. मात्र यंदा या पक्षाचे रणजितसिंह जाधव यांचा पराभव झाला. भाजपचे चंद्रकांत जाधव यांनी या गटात इतिहास रचला आहे. खरेतर राष्ट्रवादी शप गटातील अंतर्गत गटबाजीचा फटका व निष्ठावंत कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष करणे पक्षाला चांगलेच महागात पडल्याची चर्चा आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत पक्षाला आत्मचिंतन करणे आवश्यक असल्याची चित्र आहे.**

येथे यंदाच्या निवडणूकीत भाजपा तसेच राष्ट्रवादी शप गटाकडून निवडणूक लढविण्यास अनेकजण इच्छुक होते. मात्र भाजपाने मळोली येथील चंद्रकांत जाधव यांना उमेदवारी दिली. ही उमेदवारी जाहीर होताच राष्ट्रवादीनेही मळोली येथील माजी सरपंच तसेच माजी पंचायत समिती सदस्य रणजितसिंह जाधव यांना उमेदवारी दिली. रणजितसिंह जाधव यांची राजकीय पार्श्वभूमी पाहता ते एक तगडे उमेदवार म्हणून त्यांच्याकडे पाहीले जात होते. भाजपचे चंद्रकांत जाधव यांना पिलीव, बचेरी, सुळेवाडी, मळोली, तांदुळवाडी, साळमुखवाडी या गावातून चांगले मताधिक्य मिळाले. तर विरोधी रणजितसिंह जाधव यांना शिंगोर्णी, कोळेगाव, फळवणी, काळमवाडी या गावातून चांगले मताधिक्य मिळाले. चंद्रकांत जाधव यांना १२ हजार ९०३ तर रणजितसिंह जाधव यांना १२ हजार २५६ मते मिळाली. चंद्रकांत जाधव ६४७ मतांच्या फरकाने विजयी झाले. त्यामुळे प्रथमच राष्ट्रवादीच्या बालेकिल्ल्यात कमळ फुलले.





पिलीव पंचायत समिती गणात भाजपच्या नम्रता पुकळे यांनी सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती संग्रामसिंह जहागिरदार यांच्या पत्नी यज्ञासेन जहागिरदार यांच्यावर ४३५ मतांच्या फरकाने दैदीप्यमान विजय मिळविला. तांदुळवाडी पंचायत समिती गणात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या मनिषा पाटील यांनी भाजपच्या वैशाली फुलारे यांच्यावर ३० मतांनी विजय मिळविला. पिलीव जिल्ह्य परिषद गटात तसेच संपुर्ण माळशिरस तालुक्यात मोहिते पाटील व उत्तम राव जानकर गट एकत्र असताना याठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या उमेदवार रणजितसिंह जाधव यांचा तर पिलीव पंचायत समिती गणातुन यज्ञासेन जहागिरदार यांचा झालेला पराभव हा धक्कादायक मानला जात आहे .तर हा पराभव राष्ट्रवादी काँग्रेसला आत्मचिंतन करायला लावणारा आहे. पिलीव जिल्ह्य परिषद गटाचे माजी सदस्य गणेश पाटील, पिलीवचे माजी लोकनियुक्त सरपंच नितीन मोहीते, पिलीवसह, बचेरी, शिंगोर्णी, काळमवाडी, कोळेगाव, तांदुळवाडी येथील अनेक दिग्गजांनी भाजपमध्ये प्रवेश केलयाचा भाजपला मोठा फायदा या निवडणुकीत झाला.पिलीव गावावर माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती संग्रामसिंह जहागिरदार यांचे वर्चस्व आहे त्यातच या निवडणुकीत त्यांना कट्टर स्थानिक पातळीवरील विरोधी नागरी आघाडीची साथ असताना जिल्ह्य परिषदेचे उमेदवार व पंचायत समितीच्या उमेदवाराचा झालेला पराभव निश्चितच आत्मचिंतन करायला लावणारा आहे.

तर भाजपसाठी हा विजय दिलासादायक असुन आगामी पिलीव ग्रामपंचायत निवडणुकीत सत्ता मिळविण्यासाठी भाजपा, जहागिरदार पार्टी व नागरी आघाडी यामध्ये जोरदार लढत होण्याचे स्पष्ट संकेत या निवडणुकीतच मिळाले आहेत.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## वेळापूर सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.१४ फेब्रुवारी-**
वेळापूर परिसरातील शाळांमध्ये ग्राम पंचायतीच्यावतीने वीज, पाणी व स्वच्छतागृहे दुरुस्तीचे काम तात्काळ करून दिल्याबद्दल विस्तार अधिकारी अस्लम इनामदार व केंद्रप्रमुख बापूराव नाईकनवरे यांच्या हस्ते सरपंच रजनीश बनसोडे उपसरपंच नानासाहेब मुंगुस्कर, ग्रामपंचायत अधिकारी कैलास सुरवसे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी शाळा स्तरावरील फिल्डवर काम करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे आभार मानण्यात आले. माजी सरपंच विश्वासराव वाघे, माजी ग्राम पंचायत सदस्य निवृत्ती भुसारे, रायचंद खाडे, राजू पोरे, काळेसर व ग्रामपंचायत कर्मचारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी वेळेत झालेल्या कामाबद्दल शाळेकडून ग्रा.पं.चे कौतुक करण्यात आले.

# जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी शांभवी कल्याणशेट्टी यांचे नाव आघाडीवर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ फेब्रुवारी-**
जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांनंतर आता सर्वांचे लक्ष जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीकडे लागले आहे. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पत्नी तथा चपळगाव गटातील नवनिर्वाचित सदस्य शांभवी कल्याणशेट्टी यांचे नाव अध्यक्षपदासाठी आघाडीवर असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

चपळगाव गटातून कल्याणशेट्टी यांनी तब्बल ७ हजार १५८ मतांच्या मोठ्या फरकाने विजय मिळवला. त्यांनी शिवसेना शिंदे गटाच्या सुजाता भरमशेट्टी यांचा पराभव करत आपली ताकद दाखवून दिली. या विजयामुळे केवळ स्थानिकच नव्हे, तर जिल्हास्तरावरही त्यांचे राजकीय वजन वाढले आहे. चपळगाव गट हा अनेक वर्षांपासून कल्याणशेट्टी परिवाराचा बालेकिल्ला राहिला आहे. यापूर्वी आमदार कल्याणशेट्टी यांचे वडील स्व. पंचप्पा कल्याणशेट्टी यांनी या गटातून जिल्हा परिषद सदस्यपद भूषविले होते. त्यानंतर नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या मातोश्री मंगलताई कल्याणशेट्टी यांनीही याच गटाचे प्रतिनिधित्व केले. त्यामुळे या मतदारसंघावर कल्याणशेट्टी परिवाराचे सातत्यपूर्ण वर्चस्व राहिले आहे.विकासकामांवर त्यांनी सातत्याने लक्ष केंद्रित केले आहे.



मात्र, अध्यक्षपदासाठीची चर्चा केवळ कुटुंबीय पार्श्वभूमीवर नाही, तर गेल्या काही महिन्यांत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी जिल्ह्यात भाजपाचा विस्तार करण्यासाठी मोठे योगदान दिल्याचे पक्षांतर्गत मानले जाते. कृषी उत्पन्न बाजार समित्ती निवडणुकीतील विजयामध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. तसेच सोलापूर महापालिका निवडणुकीत त्यांनी सक्रिय सहभाग घेत भाजपाला सर्वाधिक जागा मिळवून देण्यात योगदान दिले. जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळताना त्यांनी भाजपा तळागाळात रुजवण्यासाठी प्रयत्न केले. नगरपरिषद निवडणुकीत अक्कलकोट व मैंदगी येथे एकहाती सत्ता आणण्यात त्यांनी यश मिळविले. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात नऊ पैकी सात जिल्हा परिषद गटांवर आणि पंचायत समितीच्या १८ पैकी १४ जागांवर विजय मिळवत भाजपला नंबर वन' पक्ष बनवण्यात त्यांची रणनीती प्रभावी ठरली आहे. मागील काळात मंत्रिपदासाठीही त्यांचे नाव चर्चेत होते. यावेळी मात्र अध्यक्षपदाच्या रूपाने पक्षाकडून 'गिफ्ट मिळू शकते, अशी चर्चा सुरू आहे.



शांभवी कल्याणशेट्टी यांना अध्यक्षपदाची संधी मिळाल्यास जिल्हा परिषदेच्या इतिहासात प्रथमच अक्कलकोटला हे पद मिळेल. त्यामुळे अक्कलकोटच्या राजकारणात हा ऐतिहासिक क्षण ठरू शकतो. सध्या तरी राजकीय वातावरणात शांभवी कल्याणशेट्टी यांच्या नावाची जोरदार चर्चा आहे. अंतिम निर्णयाकडे सर्वांचे लक्ष आहे. अध्यक्षपदाची ही लॉटरी' अक्कलकोटच्या वाट्याला येते का?, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.



## गरुड बंगल्यावर लोकप्रतिनिधींचा सन्मान

### हा विजय जनतेच्या विश्वासाचा : आमदार उत्तमराव जानकर

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.१४ फेब्रुवारी-**
वेळापूर येथील गरुड बंगला येथे जानकर परिवारातर्फे नूतन जिल्हा परिषद सदस्य अर्जुनसिंह मोहिते-पाटील, पंचायत समिती सदस्या वैष्णवीदेवी मोहिते-पाटील, पंचायत समिती सदस्या विमलताई जानकर यांचा आमदार उत्तमराव जानकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तर मोहिते-पाटील यांच्या हस्ते आमदार जानकर यांचाही गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अजित बोरकर, मगन काळे, राष्ट्रवादीचे नेते जीवन जानकर, अमोल पनासे, रामचंद्र काळे, हनमंत पाटील, कैलास इंगळे, राहुल मदने, सचिन शेंडगे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आमदार जानकर यांनी सांगितले की, माळशिरस तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका या राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार, शिवसेना उद्धव ठाकरे, शिवसेना शिंदे गट, स्वाभिमानी शेतकरी संघटना, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट व मित्र पक्षांनी एकत्रितपणे लढवून यश संपादन केले. विजय केवळ व्यक्तींचा नसून जनतेच्या विश्वासाचा आहे.

जनतेने दाखवलेल्या विश्वासाला न्याय देण्यासाठी लोकप्रतिनिधी प्रामाणिकपणे काम करतील. या भागाच्या विकासासाठी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून निधी आणण्याचे काम या नूतन सदस्याद्वारे होईल. येथील मतदाररांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरेल यात शंका नाही.



## 'हक्काची लेक म्हणून सदैव सोबत राहीन' : प्राची गोवर्धन

**कृषी उपसंचालकपदी निवडीबद्दल एकता महिला मंचतर्फे गौरव**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.१४ फेब्रुवारी-**
'हक्काची लेक म्हणून सदैव सोबत राहीन. हा सत्कार सोहळा माझ्यासाठी अत्यंत मोलाचा आहे. वैरागची लेक म्हणून माझ्या भगिनींशी माझे हक्काचे नाते कायम राहील. भविष्यात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुण-तरुणींना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी मी सदैव तत्पर असेन असे भावोद्गार प्राची गोवर्धन यांनी काढले.

बार्शी तालुका एकता महिला मंचच्या वतीने एमपीएससी कृषी सेवा परीक्षेत राज्यात १४ वी आणि इडब्ल्यूएस महिला प्रवर्गातून प्रथम येत 'कृषी उपसंचालक' पदी निवड झालेल्या येथील प्राची शाम गोवर्धन यांचा शनिवारी १४ फेब्रुवारी रोजी शाल, श्रीफळ, पुष्पहार, मानाचा फेटा बांधून सत्कार करण्यात आला. उपस्थित महिलांनी त्यांना पेढे भरवून आनंद व्यक्त केला. सत्कारानंतर अनेक महिला, तरुणींनी प्राचीसोबत सेल्फी घेतले. येथील श्री व्यंकोबाबा महाराज मंदिरात झालेल्या या कार्यक्रमाची सुरूवात ग्रामदैवत श्री संतनाथ महाराज यांच्या प्रतिमापूजनाने झाली. यावेळी प्राचार्य शाम गोवर्धन, आशा गटप्रवर्तक वर्षा गोवर्धन, मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर आणि रत्नप्रभा गायकवाड, प्रसिद्धी प्रमुख गीतांजली जोशी, तालुका सचिव लक्ष्मी सुतार, वंदना घोडके, रंजना गवळी,राणी गवळी, संगीता कदम, रेणुक चौगुले, रेखा काशीद, मनीषा गवळी, विभावरी कुलकर्णी यांच्यासह तालुक्यातील महिला सदस्य उपस्थित होते. रंजना गवळी यांनी प्रास्ताविक केले. वंदना घोडके यांनी मंचच्या कार्याची रूपरेषा मांडताना महिलांनी संघटित होण्याचे महत्त्व अधोरेखित केले. श्री.क्षीरसागर, प्राचार्य गोवर्धन, रत्नप्रभा गायकवाड आणि संगीता कदम यांनी आपल्या मार्गदर्शनात प्राचीच्या यशाचे कौतुक करत, अशा यशातूनच ग्रामीण भागातील मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो, असे मत व्यक्त केले. वंदना घोडके यांनी सूत्रसंचालन केले. गीतांजली जोशी यांनी आभार मानले.

## अखेर हत्तूरचा बालेकिल्ला शिवसेनेकडेच

**● जिल्हा उपप्रमुख अण्णप्पा सतुबर यांची भूमिका महत्वाची; कार्यकर्त्यांच्या एकजुटीमुळे विजय**

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १४ फेब्रुवारी -**
लाडकी बहीण व भाजपच्या लाटेतही हत्तूरचा बालेकिल्ला ताब्यात ठेवण्यात शिवसेनेला यश आले आहे. जिल्हा प्रमुख अमर पाटील यांची रणनिती व माजी आमदार रतिकांत पाटील यांची व्यूहरचना यामुळे भाजपच्या लाटेतही हत्तूरच्या बालेकिल्यात लक्ष्मीताई पाटील यांना ३४ मतांनी निसटता विजय मिळाला. या विजयामध्ये शिवसेना जिल्हा उपप्रमुख आणप्पा सतुबर यांची भूमिका काही महत्वाची ठरली.



जिल्हाप्रमुख अमर पाटील यांनी २०१७ च्या निवडणूकीत तिरंगी लढतीत हत्तूर जिल्हा परिषद गटावर भगवा फडकविला होता. यावेळी अमर पाटील, अप्पासाहेब पाटील व डॉ. चनगोंडा हविनाळे यांच्या लढतीत अमर पाटील यांनी विजय मिळवून वर्चस्व सिध्द केला होता. यावेळी भाजप व शिवसेना मध्ये लढत होती. भाजपकडून उज्वला हविनाळे व शिवसेनेकडून लक्ष्मीताई पाटील यांच्यामध्ये 'काँटे कि टक्कर' लढत झाली. हविनाळे या माजी सभापती डॉ. चनगोंडा हविनाळे यांच्या सून तर पाटील या शिवसेना जिल्हाप्रमुख अमर पाटील यांच्या मातोश्री आमदार सुभाष देशमुख यांनी ही जागा प्रतिष्ठेची करून विजयासाठी ताकत लावली होती. तर अमर पाटील यांनी अस्तित्वाची लढत म्हणत मतदारांपर्यंत पोहोचले. या दोन्ही उमेदवारांमध्ये विजयासाठी अटीतटीची लढत झाली. मात्र शिवसेनेमधील कार्यकर्त्यांची एकजूट ही या विजयाचे गमक ठरले.

या गटामधील हत्तूर, औराद व आहेरवाडी या गावामध्ये सर्वाधिक मतदार आहेत. त्यामुळे साहजिकच या मतदारांच्या जोरावर जिल्हा परिषद सदस्य निवडून येणार , हे निश्चित असल्याने हत्तूरमध्ये जिल्हा उपप्रमुख आणप्पा सतुबर यांनी शिवसेनेला मताधिक्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला. हत्तूरमध्ये भाजप लाटेची कल्पना असल्यामुळे सतुबर यांनी लाडक्या बहीणी व मतदारांशी संपर्क साधून लक्ष्मीताई पाटील यांना मताधिक्य मिळवून दिला. शिवाय शिवसेनेचा बालेकील्ला ताब्यात ठेवण्यासाठी शिवसैनिक म्हणून मोलाची भूमिका पार पाडली. भाजपच्या नेत्यांनी हत्तूरमध्ये ठिया मारून व लढत प्रतिष्ठेची करून मताधिक्यासाठी प्रयत्न केला. मात्र जिल्हा उपप्रमुख सतुबर यांनी माजी आमदार पाटील व जिल्हाप्रमुख पाटील यांच्या सहकार्याने मताधिक्य वाढविण्यात यश मिळविल्याने हत्तूरमधून लक्ष्मीताई पाटील यांना ३४ मतांनी विजय मिळविणे सोईचे झाले. त्यामुळे भाजप लाटेतही सतुबर व पाटील यांच्या जोडीने मतदारांमध्ये किमया करून हत्तूरचा बालेकिल्ला शिवसेनेच्या ताब्यात ठेवण्यात यश मिळविले.



**लाटेतही धनुष्यबाण चालला :** हत्तूर जिल्हा परिषद गट शिवसेनेचा बालेकिल्ला असतानाही भाजपने ताकत लावून ही निवडणूक प्रतिष्ठेची केली होती. मात्र उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लोक कल्याणकारी कार्य व जिल्हाप्रमुख अमर पाटील यांच्या जनसंपर्कामुळे शिवसेनेला यश मिळाले. भाजप लाटेतही हत्तूरच्या मतदारांनी शिवसेनेला साथ दिली आहे.

**- अण्णप्पा सतुबर, शिवसेना, जिल्हा उपप्रमुख, सोलापूर**

**शिवसैनिकांच्या एकजूटीचा विजय :** हत्तूर व औराद गावामधून शिवसेनेला मताधिक्य मिळाल्याने हत्तूरचा बालेकिल्ला शिवसेनेच्या ताब्यात राहीला आहे. गटामधील सर्व शिवसैनिकांनी जिल्हाप्रमुख अमर पाटील यांच्या नेतृत्वात एकजूटीने प्रयत्न केल्यामुळे विजय मिळाला.

**- योगिराज पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख, दक्षिण सोलापूर**

## बार्शीतील २४८ मतदान केंद्रांवर भाजपाची आघाडी

**● जि.प., पंचायत समिती निवडणुकीत दिसली नाही चुरस**

**तभा वृत्तसेवा । अरुण बळप**
**बार्शी, दि, १४ फेब्रुवारी**
बार्शी तालुक्यातील जिल्हा परिषद निवडणुकीत यंदा पारंपरिक सोपल- राऊत गटातील चुरस दिसून न येता निकाल एकतर्फी लागल्याचे चित्र स्पष्ट झाले. तालुक्यातील १३९ गावांतील २५६ मतदान केंद्रांपैकी तब्बल २४८ केंद्रांवर भाजपच्या विजयी उमेदवारांना मताधिक्य मिळाले तर केवळ आठ मतदान केंद्रांवर महाआघाडीच्या उमेदवारांना लीड मिळवता आला.

सहाही जिल्हा परिषद गटांत भाजपचे उमेदवार साडेपाच ते दहा हजारांच्या फरकाने विजयी झाले. १३० ग्रामपंचायती व १३९ गावे-वाड्यांचा समावेश असलेल्या तालुक्यात गेली तीन दशके निवडणुका आमदार दिलीप सोपल आणि माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या गटात चुरशीने होत आल्या.

लोकसभा निवडणुकीत बार्शी तालुक्यातुन ओमराजे निंबाळकर यांना ५४ हजारांची आघाडी घेतली होती. त्यावेळी ३०९ केंद्रावर लीड होता तर २० केंद्रावर विरोधी अर्चना पाटील यांना लीड मिळाला होता. आता या उलट परिस्थिती झाली आहे. भाजपने ५३ हजारांची आघाडी घेत जवळपास सर्वच आघाडी घेतली आहे. ८ केंद्र विरोधी पक्षांच्या उमेदवारांना लीड मिळाला आहे,

**असे मिळाले मताधिक्य :**शेळगाव गटात अजित पवार गटाच्या तनुजा अडसूळ यांनी शेळगावात ४०२ मतांनी आघाडी घेत महाआघाडीचा सन्मान राखला. त्यांच्याविरुद्धच्या धामणगाव येथील भाजपच्या सोनाली बोधले यांनी आपल्या गावात ५४६ मतांची आघाडी घेत वर्चस्व सिद्ध केले. उपळाई गटातील भाजपचे दीपक वैद्य अन् राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मधुकर वैद्य यांच्यात झालेल्या लढतीत भाजपच्या दीपक वैद्य यांनी गावात ४९५ भला मोठा लीड घेतला. निकालावरून तालुक्यात भाजपची सर्वत्र मजबूत पकड असल्याचे स्पष्ट झाले आहे.

खामगाव (१ बूथ २७), उपळाई (१ बूथ १), आळजापूर (१०), पानगाव (१ बूथ ६१), सासुरे (३), पिंपरी पा. (४), हिंगणी (७०) आणि शेळगाव (३०३) येथील प्रत्येकी एका मतदान केंद्रावर सोपल गटाच्या उमेदवारांना आघाडी मिळाली. उर्वरित बहुतांश केंद्रांवर भाजपने मोठी आघाडी घेतली. पांगरी, पानगाव, उपळाई व उपळे दुमाला या चार गटांत दोन्ही बाजूंचे उमेदवार एकाच गावातील होते. पांगरी गटात कारी गावातील राष्ट्रवादीच्या मीरा विधाते व भाजपच्या रेश्मा डोके या समोरासमोर होत्या. कारी गावात रेश्मा डोके यांनी २५४ मतांची आघाडी घेतली. उपळे दुमाला गटात भालगावच्या मनीषा जाधवर (शिंदेसेना) व भाजपच्या भारती दराडे या एकाच गावातील होत्या; येथे दराडे यांनी १९६ मतांची आघाडी घेतली.

पानगाव गटात माजी सरपंच सुधीर काळे व उपसरपंच नंदकुमार काळे हे दोघेही पानगावचे रहिवासी होते. येथे नंदकुमार काळे यांनी ११३५ मतांची भक्कम आघाडी घेतली. मालवंडी गटात ढोराळेच्या माधुरी काकडे यांनी गावात दोन मतांची आघाडी घेतली, तर भाजपच्या सुजाता डोईफोडे यांनी आपल्या सुर्डी गावात २०९ मतांची आघाडी मिळवली.

### गवळी वस्ती तालीम संघातर्फे मंगळवारी कीर्तन सोहळा

**सोलापूर, दि.१४ फेब्रुवारी-**
गवळी वस्ती तालीम संघ सार्वजनिक शिवजन्मोत्सव व सांस्कृतिक मंडळाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त मंगळवार दिनांक १७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता दमानी नगर येथील हभप आप्पाराव सवाळकर उद्यानात सुप्रसिद्ध कीर्तनकार हभप शितल साबळे-पाटील यांचा कीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती नगरसेविका मृण्मयी गवळी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शिवजयंतीच्या निमिताने आयोजित करण्यात येणाऱ्या व्याख्यानमालेचे हे चौथे वर्ष आहे. या पत्रकार परिषदेला मंडळाचे आधारस्तंभ महादेव गवळी, उत्सव अध्यक्ष सुनील कदम, औदुंबर जगताप, वामन वाघचौरे, हेमंत पिंगळे, शाम गांगर्डे, बाळासाहेब घुले, चंद्रकांत पवार, शेखर कवठेकर, लहू गायकवाड, जगदीश भोसले, विष्णू जगताप, महेश चव्हाण, महेश मुदलियार, संतोष मोरे, बालाजी चराटे, गुरुनाथ शिंदे, संदीप काशीद, अरविंद गवळी, बबलू जगताप, लखन कारंडे, प्रशांत भगरे, अशोक बनसोडे, ईश्वर अहिरे, विजय घुले, सुरज काशीद, गुरु बेंद्रे, जयदीप हळळी, मोहन चटके, शरीफ दखनी आदी उपस्थित होते.

## वेळापुरात एकवटलेल्या सर्वपक्षीय नेत्यांनी खेचून आणला विजय

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.१४ फेब्रुवारी-**
नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद व पं. स. निवडणूक निकालानंतर काही निकाल लक्षात रहाणारे ठरले. राजकीय सामाजिक घडामोडी वर विचार करायला लावणारा निकाल म्हणजे वेळापूर जिल्हा परिषद निवडणुकीत मिनाक्षी मिलिंद सरतापे यांचा दणदणीत झालेला विजय. हा माळशिरस तालुक्यात चर्चेत राहिलेला निकाल मानला जातो.

वेळापूर जिल्हा परिषद गटाची निवडणूक ही संपूर्ण वेळापूर गटात जनतेने व संपूर्ण आरपीआय नेत्यांनी कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शप गट, राष्ट्रवादी काँग्रेस अप गट, शिवसेना एकनाथ शिंदे, शिवसेना उबाठा, शेतकरी संघटना, प्रहार संघटना व इतर अनेक लहान मोठ्या संघटनांनी एकमुखी सशर्त पाठिंबा दिल्यामुळे मिनाक्षी सरतापे यांचा विजय झाला. वास्तविक केंद्रात व राज्यात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट यांची भाजप बरोबर गेल्या आठ वर्षांपासून युती आहे. मात्र केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांना केंद्रात राज्यमंत्री पद दिले असले तरी त्यांच्या पक्षातील नेत्यांना कार्यकर्त्यांना निवडणुकीत कुठेही स्थान दिले जात नाही. निवडणुकीत सन्मानपूर्वक जागा वाटपात कुठेही सामावून घेतले जात नाही. स्थानिक स्वराज्य संस्था असो, लोकसभा, विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे आठवले पक्षाला निवडणुकीत वापरून घेतले जाते पण सत्तेची, लाभाची पदे दिली जात नाहीत. रामदास आठवले यांच्या आदेशानुसार आतापर्यंत कार्यकर्ते नेते भाजपाला निवडणुकीत सहकार्य करत आलेले आहेत.



भाजपाकडे रिपब्लिकन पक्षाला निवडणुकीत योग्य न्याय जागा मिळाल्या पाहिजेत ही माफक अपेक्षा असताना भाजप केवळ वापरा व बाजूला ठेवा या भुमिकेत राहिली आहे. त्यामुळे या सर्वांचा परिपाक असा झाला की रिपब्लिकन पक्षाच्या नेत्यांत व कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड असंतोष व चिड निर्माण झाली. ही बाब रामदास आठवले यांनी भाजपाचे वरिष्ठ सुत्रांकडे वारंवार कळवूनही भाजपाने कसलीही दाद दिली नाही. त्यामुळे नाराज असलेल्या स्थानिक नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी आरपीआयचे वरिष्ठांना कळवून भाजपला निवडणुकीत सहकार्य करायचे नाही व जो समविचारी पक्ष निवडणुकीत योग्य न्याय देऊन जागा देईल त्या पक्षाबरोबर स्थानिक आघाडी करून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. त्याचा चांगला परिणाम व फायदा झाल्याचे चित्र पहायला मिळाले.

यानिमित्ताने रिपब्लिकन ऐक्य दिसून आले. महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी भाजपाच्या विरोधात रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आघाडी करून निवडणूक लढवल्या व यश संपादन केले. माळशिरस तालुक्यात त्याचाच परिणाम म्हणून वेळापूर जिल्हा परिषद गटात आरपीआयचे सर्व नेते कार्यकर्ते मोठ्या हिमतीने ताकदीने एकवटले. आरपीआयचे तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांचा मोठा जनसंपर्क विनम्र स्वभाव तसेच सर्व जाती धर्मातील बहुजन समाजांतील सर्वांशी असलेले त्यांचे मैत्रीचे संबंध यामुळे विजय सोपा गेला. वेळापूर पंचक्रोशीतील सामाजिक प्रश्न नागरी सुविधा मिळवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न यामुळे मिलिंद सरतापे यांच्या पत्नी मिनाक्षी सरतापे यांना वेळापूर जिल्हा परिषद गटात उमेदवारी द्यावी म्हणून सर्वानुमते पसंती मिळाली. त्यानुसार उमेदवाराला प्रचंड मतांनी निवडून आणण्यासाठी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार उत्तमराव जानकर, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व आरपीआयचे नेते, कार्यकर्ते यांनी प्रामाणिक प्रयत्न केले. त्यामुळे वेळापूर जिल्हा परिषद गटात मिनाक्षी सरतापे यांचा मताधिक्याने विजय झाला. माळशिरस तालुक्यात सर्व बौद्ध समाज, सर्व आरपीआयचे नेते, कार्यकर्ते एकवटले. त्यामुळे आरपीआयचे वरिष्ठ पदाधिकारी यांचे काही चालले नाही. मिनाक्षी सरतापे यांचा विजय म्हणजे भाजपला दिलेली चपराक मानली जात आहे. भाजपाला येथे आत्मचिंतन करावे लागणार आहे. यापुढील स्थानिक निवडणूकांतही सर्व पक्षांची आघाडी एकत्रित राहिल्यास भाजपाला तो शह ठरणार आहे.